# तत्वज्ञान

## इयत्ता ११ वी



# भारताचे संविधान

## भाग ४ क

# नागरिकांची मूलभूत कर्तव्ये

**अनुच्छेद ५१ क**

**मूलभूत कर्तव्ये – प्रत्येक भारतीय नागरिकाचे हे कर्तव्य असेल की त्याने –**

(क) प्रत्येक नागरिकाने संविधानाचे पालन करावे. संविधानातील आदर्शांचा, राष्ट्रध्वज व राष्ट्रगीताचा आदर करावा.

(ख) स्वातंत्र्याच्या चळवळीला प्रेरणा देणाऱ्या आदर्शांचे पालन करावे.

(ग) देशाचे सार्वभौमत्व, एकता व अखंडत्व सुरक्षित ठेवण्यासाठी प्रयत्नशील असावे.

(घ) आपल्या देशाचे रक्षण करावे, देशाची सेवा करावी.

(ङ) सर्व प्रकारचे भेद विसरून एकोपा वाढवावा व बंधुत्वाची भावना जोपासावी. स्त्रियांच्या प्रतिष्ठेला कमीपणा आणतील अशा प्रथांचा त्याग करावा.

(च) आपल्या संमिश्र संस्कृतीच्या वारशाचे जतन करावे.

(छ) नैसर्गिक पर्यावरणाचे जतन करावे. सजीव प्राण्यांबद्दल दयाबुद्धी बाळगावी.

(ज) वैज्ञानिक दृष्टी, मानवतावाद आणि जिज्ञासूवृत्ती अंगी बाळगावी.

(झ) सार्वजनिक मालमत्तेचे जतन करावे. हिंसेचा त्याग करावा.

(ञ) देशाची उत्तरोत्तर प्रगती होण्यासाठी व्यक्तिगत व सामूहिक कार्यात उच्चत्वाची पातळी गाठण्याचा प्रयत्न करावा.

(ट) ६ ते १४ वयोगटातील आपल्या पाल्यांना पालकांनी शिक्षणाच्या संधी उपलब्ध करून द्याव्यात.

शासन निर्णय क्रमांक : अभ्यास-२११६/(प्र.क्र.४३/१६) एसडी-४ दिनांक २५.४.२०१६ अन्वये स्थापन करण्यात आलेल्या समन्वय समितीच्या दिनांक २०.०६.२०१९ रोजीच्या बैठकीमध्ये हे पाठ्यपुस्तक सन २०१९-२० या शैक्षणिक वर्षापासून निर्धारित करण्यास मान्यता देण्यात आली आहे.

# तत्वज्ञान

## इयत्ता अकरावी

महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे.

T6N3V5

आपल्या स्मार्टफोनवरील DIKSHA App द्वारे पाठ्यपुस्तकाच्या पहिल्या पृष्ठावरील Q.R. Code द्वारे डिजिटल पाठ्यपुस्तक, त्या पाठासंबंधित अध्ययन-अध्यापनासाठी उपयुक्त दृक्-श्राव्य साहित्य उपलब्ध होईल.

प्रथमावृत्ती : २०१९
पुनर्मुद्रण : ऑक्टोबर २०२१

© महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे ४११ ००४.
महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळाकडे या पुस्तकाचे सर्व हक्क राहतील. या पुस्तकातील कोणताही भाग संचालक, महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ यांच्या लेखी परवानगीशिवाय उद्धृत करता येणार नाही.

**तत्त्वज्ञान विषय समिती**

श्रीमती मृणालिनी वनारसे, अध्यक्ष
डॉ. दीप्ति गंगावणे, सदस्य
डॉ. हरिश्चंद्र नवले, सदस्य
डॉ. शर्मिला वीरकर, सदस्य
प्रा. वर्षा जपे, सदस्य
डॉ. सीमा देशपांडे, सदस्य
डॉ. राजेसाहेब मारडकर, सदस्य
डॉ. श्रीधर आकाशकर, सदस्य
सौ. वर्षा सरोदे, सदस्य सचिव

**तत्त्वज्ञान अभ्यास गट**

डॉ. नागोराव कुंभार
प्रा. शितल येरूळे
प्रा. माधवी कवि
प्रा. ईश्वरअप्पा मठवाले
डॉ. मीनल कातरणीकर
प्रा. अजय शिंगाडे
डॉ. शांताराम गोवर्धन बुटे
डॉ. संतोष ठाकरे
डॉ. सचिन बाबुराव खोकले
प्रा. विजय कारेकर
प्रा. विद्या मिलिंद गारखेडकर
श्रीमती तनुजा येलाले

**लेखक**

डॉ. दीप्ति गंगावणे
श्रीमती मृणालिनी वनारसे

**मुखपृष्ठ व सजावट**

श्री. मुकिम शेख

**अक्षरजुळणी**

डीटीपी विभाग,
बालभारती, पुणे.

**कागद**

७० जी.एस.एम.क्रीमवोव्ह

**मुद्रणादेश**

**मुद्रक**

**संयोजक**

सौ. वर्षा सरोदे
सहायक विशेषाधिकारी, इतिहास व नागरिकशास्त्र
पाठ्यपुस्तक मंडळ, पुणे.

**निर्मिती**

श्री. सच्चितानंद आफळे,
मुख्य निर्मिती अधिकारी
श्री. प्रभाकर परब,
निर्मिती अधिकारी
श्री. शशांक कणिकदळे,
सहायक निर्मिती अधिकारी

**प्रकाशक**

श्री. विवेक उत्तम गोसावी, नियंत्रक
पाठ्यपुस्तक निर्मिती मंडळ,
प्रभादेवी, मुंबई-२५.

# भारताचे संविधान

## उद्देशिका

**आम्ही, भारताचे लोक, भारताचे एक सार्वभौम समाजवादी धर्मनिरपेक्ष लोकशाही गणराज्य** घडविण्याचा व त्याच्या सर्व नागरिकांस:

सामाजिक, आर्थिक व राजनैतिक **न्याय;**

विचार, अभिव्यक्ती, विश्वास, श्रद्धा

व उपासना यांचे **स्वातंत्र्य;**

दर्जाची व संधीची **समानता;**

निश्चितपणे प्राप्त करून देण्याचा

आणि त्या सर्वांमध्ये व्यक्तीची प्रतिष्ठा

व राष्ट्राची एकता आणि एकात्मता

यांचे आश्वासन देणारी **बंधुता**

प्रवर्धित करण्याचा संकल्पपूर्वक निर्धार करून;

**आमच्या संविधानसभेत**

आज दिनांक सव्वीस नोव्हेंबर, १९४९ रोजी

**याद्वारे हे संविधान अंगीकृत आणि अधिनियमित करून स्वत:प्रत अर्पण करीत आहोत.**

## राष्ट्रगीत

जनगणमन–अधिनायक जय हे
भारत–भाग्यविधाता ।
पंजाब, सिंधु, गुजरात, मराठा,
द्राविड, उत्कल, बंग,
विंध्य, हिमाचल, यमुना, गंगा,
उच्छल जलधितरंग,
तव शुभ नामे जागे, तव शुभ आशिस मागे,
गाहे तव जयगाथा,
जनगण मंगलदायक जय हे,
भारत–भाग्यविधाता ।
जय हे, जय हे, जय हे,
जय जय जय, जय हे ।।

## प्रतिज्ञा

भारत माझा देश आहे. सारे भारतीय माझे बांधव आहेत.

माझ्या देशावर माझे प्रेम आहे. माझ्या देशातल्या समृद्ध आणि विविधतेने नटलेल्या परंपरांचा मला अभिमान आहे. त्या परंपरांचा पाईक होण्याची पात्रता माझ्या अंगी यावी म्हणून मी सदैव प्रयत्न करीन.

मी माझ्या पालकांचा, गुरुजनांचा आणि वडीलधाऱ्या माणसांचा मान ठेवीन आणि प्रत्येकाशी सौजन्याने वागेन.

माझा देश आणि माझे देशबांधव यांच्याशी निष्ठा राखण्याची मी प्रतिज्ञा करीत आहे. त्यांचे कल्याण आणि त्यांची समृद्धी ह्यांतच माझे सौख्य सामावले आहे.

# प्रस्तावना

विद्यार्थी मित्रांनो,

या वर्षी तत्त्वज्ञान हा तुमच्यासाठी खूपसा नवीन असलेला विषय तुम्ही निवडला आहे, याबद्दल तुमचे कौतुक! तुम्हांला या विषयाबद्दल खूप उत्सुकता वाटत असेल. तत्त्वज्ञानाला सर्व शास्त्रांची किंवा ज्ञानशाखांची जननी मानले जाते. कला शाखेमध्ये मानवी जीवन, समाज आणि संस्कृती यांचा अनेक अंगांनी अभ्यास केला जातो. या सर्वांच्या जडण घडणीमध्ये तत्त्वज्ञानाचे प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षपणे मोठे योगदान असते. या दृष्टीने पहाता, तत्त्वज्ञानाचा अभ्यास कला शाखेच्या एकूणच अध्ययनासाठी पायाभूत असतो. या पुस्तकाचा एक उद्देश तुम्हांला या विषयाची ओळख व्हावी आणि त्याचे महत्त्व समजावे हा आहे.

तुम्ही हा विषय पहिल्यांदाच शिकणार असल्यामुळे दैनंदिन जीवनातली उदाहरणे घेऊन, शक्य तेवढ्या सोप्या भाषेत हा विषय स्पष्ट करण्यात आला आहे. तत्त्वज्ञान या विषयाचा आवाका खूप मोठा आहे. त्याच्या अनेक शाखा-उपशाखा आहेत. या पुस्तकाच्या पहिल्या पाठात तत्त्वज्ञानाचे स्वरूप तुम्हांला समजावे यासाठी तत्त्वज्ञानाचा अभ्यास विषय, त्यामध्ये विचारले जाणारे मुख्य प्रश्न आणि तत्त्वज्ञानाच्या पद्धती यांची ओळख करून देण्यात आली आहे. 'काय आहे?' 'कळते कसे?' आणि 'त्याचा आपल्या कृतींवर/जगण्यावर काय परिणाम होतो?' या तत्त्वज्ञानातील प्रमुख प्रश्नांवर या पुस्तकात भर देण्यात आला आहे. तत्त्वज्ञानाच्या शाखांशी तुमची ओळख दुसऱ्या पाठात झाल्यावर त्यातील वरील प्रश्नांशी संबंधित असलेल्या तीन शाखांचे, म्हणजे अनुक्रमे सत्तामीमांसा, ज्ञानमीमांसा आणि नीतीमीमांसा यांचे विवेचन नंतरच्या पाठांमध्ये आहे. शेवटच्या पाठात तत्त्वज्ञानाचा विज्ञान आणि तंत्रज्ञानाशी काय आणि कसा संबंध आहे याची चर्चा आजच्या काळातील काही ठळक प्रश्नांच्या संदर्भात केली आहे.

आपण या पुस्तकात तत्त्वज्ञानाच्या जगभरात असलेल्या वेगवेगळ्या परंपरांपैकी भारतीय आणि पाश्चात्य या दोन परंपरांची ओळख करून घेणार आहोत. यामधून तत्त्वज्ञानाचा संस्कृतीशी, ऐतिहासिक कालखंडांशी कसा संबंध असतो हे तुमच्या लक्षात येईल.

११ वी मध्ये ज्या शाखांचा परिचय तुम्हांला होईल, त्यांचा सविस्तर अभ्यास आपण १२ वी मध्ये करू. त्याचबरोबर काही नवीन शाखा, नवे प्रश्न, नवे विचार यांचीही माहिती घेऊ. त्यासंबंधी विचार करू आणि आपल्या सर्वच अभ्यासाला, तसेच जीवनाला एक तात्त्विक बैठक देऊ. या दोन वर्षांमध्ये तुम्हांला या विषयाची गोडी लागेल आणि त्याचा सखोल अभ्यास करण्याची प्रेरणा तुम्हांला मिळेल अशी आशा आहे.

पुणे
दिनांक : २० जून २०१९
भारतीय सौर दिनांक : ३० ज्येष्ठ १९४१

**(डॉ.सुनिल मगर)**
संचालक
महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व
अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे.

## – शिक्षकांसाठी –

अकरावीत प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी 'तत्त्वज्ञान' हा विषय पूर्णपणे नवीन असतो. या विषयाबद्दल त्यांच्या मनात काही वेगळ्या धारणा असतात, त्यामुळे त्यांना या विषयाचे दडपण किंवा भीती वाटते. वस्तुतः रोजच्या जीवनातही तत्त्वज्ञानाशी संबंधित प्रश्नांशी, संकल्पनांशी, विचारांशी त्यांचा संबंध येतच असतो, पण त्या सर्वांच्या तात्त्विक स्वरूपाची जाणीव त्यांना नसते. ही जाणीव त्यांना करून देण्यासाठी तत्त्वज्ञान या विषयाची ओळख अशा पद्धतीने करून द्यायला हवी, की त्यांना या विषयाची गोडी लागेल; त्याचे सर्वांगीण महत्त्व समजेल. याच उद्देशाने या पुस्तकात जाणीवपूर्वक दैनंदिन जीवनातील उदाहरणे घेऊन शक्य तेवढ्या सोप्या भाषेत हा विषय स्पष्ट करण्याचा प्रयत्न केला आहे. तात्त्विक परिभाषेचा वापर जेवढा अपरिहार्य आहे, तेवढाच ठेवला आहे.

हा विषय विद्यार्थी पहिल्यांदाच शिकत असल्यामुळे या विषयाचे स्वरूप, त्याच्या शाखा, उपशाखा, पद्धती त्यामध्ये विचारात घेतले जाणारे प्रश्न आणि संकल्पना यांचा परिचय विद्यार्थ्यांना काही प्रमाणात माहिती या स्वरूपात करून दिला गेला असला तरी निव्वळ माहिती पुरवणे हे या पुस्तकाचे उद्दिष्ट नाही. विद्यार्थ्यांमध्ये तात्त्विक दृष्टिकोन रूजवणे, त्यांना विचार करायला प्रवृत्त करणे, चिकित्सक विचार करण्याची सवय लावणे ही या पुस्तकाची मुख्य उद्दिष्टे आहेत. यासाठी वर्गात विद्यार्थ्यांना प्रश्न विचारण्याची मुभा देणे एवढेच नव्हे, तर त्यासाठी अनुकूल वातावरण तयार करणे याची गरज आहे. यामुळे विद्यार्थ्यांची चिंतनशीलता वाढीस लागेल.

तत्त्वज्ञान हा विषय इतर ज्ञानशाखांशी, तसेच प्रत्यक्ष जीवनाशी कसा जोडलेला आहे यासंबंधीचे मार्गदर्शन विद्यार्थ्यांना मिळाल्यास या विषयाच्या अभ्यासाची गरज त्यांना समजेल. त्या दृष्टीने पुस्तकात तत्त्वज्ञान आणि संस्कृती, तत्त्वज्ञान आणि विज्ञान व तंत्रज्ञान यांच्यातील सहसंबंधांचे विवेचन केले आहे. यामधून आंतरविद्याशाखीय अभ्यासाची ओळखही त्यांना होईल.

पाठांतरापेक्षा आकलन आणि उपयोजन यांच्यावर भर देण्याच्या हेतूने स्वाध्याय, आणि उपक्रमांची रचना केली आहे. पुस्तकातील विषयांशी संबंधित माहिती इतर स्रोतांमधून शोधणे, तिची योग्य मांडणी करता येणे, संवाद-चर्चा, लेखन आणि इतर सृजनशील पद्धतींनी आपले विचार व्यक्त करता येणे यासाठी हे उपक्रम आणि कृती खूप मोलाचे आहेत. त्याचबरोबर केवळ लेखन-वाचन या रूढ पद्धतीच नव्हे, तर प्रत्यक्ष निरीक्षण, चित्रे बघणे, संगीत ऐकणे, वेगवेगळ्या प्रकारचे खेळ खेळणे या प्रकारेही तत्त्वज्ञान शिकता येते, तत्त्वचिंतनातील आनंद घेता येतो हे विद्यार्थ्यांना त्यामधून अनुभवता येईल.

तत्त्वज्ञान या विषयाचा धाक न वाटता त्यामध्ये रुची निर्माण व्हावी, त्याचा अधिक अभ्यास करण्याची इच्छा निर्माण व्हावी या हेतूने या पुस्तकाची विशिष्ट रचना केली आहे. वर्गात शिकता-शिकवताना हा हेतू ध्यानात ठेवल्याने विद्यार्थी व शिक्षक दोघांनाही तत्त्वज्ञानाचा अभ्यास आनंददायी आणि विचारसमृद्ध करणारा ठरेल ही आशा!

| क्र. | घटक | क्षमता |
|---|---|---|
| १. | काय म्हणजे तत्वज्ञान ? कशासाठी तत्वज्ञान ? | • तत्वज्ञान या विषयाचे वैशिष्ट्य स्पष्ट करता येणे.<br>• दैनंदिन भाषेतील तत्वज्ञान शब्दाचा वापर; वैज्ञानिक दृष्टिकोन, कला-अभिव्यक्ती आणि तत्वज्ञानाचा दृष्टिकोन यांतील फरक सांगता येणे.<br>• तत्वज्ञानाचे जीवनात काय महत्त्व आहे ते सांगता येणे.<br>• तत्वज्ञानाचा उपयोग व्यवहारात कुठे कुठे होतो हे सोदाहरण सांगता येणे.<br>• तत्वज्ञानामुळे व्यक्तीच्या कृतींवर/वर्तनावर काय प्रभाव पडतो, हे स्पष्ट करता येणे. |
| २. | आहे काय ? कळते कसे ? करायचे काय ? | • तत्वज्ञानातील मुख्य प्रश्न स्पष्ट करता येणे.<br>• तत्वज्ञानातील प्रश्नांचे मुख्य शाखांनुसार वर्गीकरण करता येणे.<br>• तत्वज्ञानाच्या शाखांचा परस्परसंबंध सांगता येणे.<br>• संस्कृती आणि तत्वज्ञान यांतील सहसंबंध सांगता येणे. |
| ३. | दिसतं तसं नसतं ? | • तत्वज्ञानातील सत्-असत्, नित्य-अनित्य या मुख्य संकल्पना स्पष्ट करता येणे.<br>• ‘सत्’ च्या संदर्भातील वेगवेगळ्या तात्त्विक उपपत्ती स्पष्ट करता येणे.<br>• सत्तामीमांसेतील मुख्य प्रश्न आणि त्या बद्दलच्या तात्त्विक भूमिका समजणे. |
| ४. | जाणण्याविषयी जाणून घेताना | • माहिती, ज्ञान, समजूत यांतील फरक स्पष्ट करता येणे.<br>• वेगवेगळी ज्ञानसाधने सोदाहरण स्पष्ट करता येणे.<br>• ज्ञानसाधनांचे चिकित्सक मूल्यमापन करता येणे.<br>• ज्ञानप्राप्तीची प्रक्रिया लक्षात येणे. |
| ५. | स्वातंत्र्य आणि नीतिनियम | • यांत्रिक क्रिया आणि मानवी कृती यांतील फरक लक्षात येणे.<br>• ऐच्छिक आणि अनैच्छिक कृती यांमधील फरक सांगता येणे.<br>• व्यक्ती आणि समुदायाच्या सहसंबंधाच्या दृष्टीने नीतीनियमांचे काय महत्त्व आहे हे सांगता येणे.<br>• ‘नैतिक मूल्य’ ही संकल्पना स्पष्ट करता येणे.<br>• नीतिशास्त्रातील मूलभूत संकल्पनांचे उपयोजन करता येणे. |
| ६. | विज्ञान, तंत्रज्ञान आणि तत्वज्ञान | • विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या संदर्भात तत्वज्ञानाची भूमिका स्पष्ट करता येणे.<br>• ऊर्जेच्या वाढत्या वापराचा ऐतिहासिक आढावा घेता येणे.<br>• विज्ञान आणि तंत्रज्ञान यांचे आजच्या जीवनातील स्थान जाणून घेणे.<br>• शाश्वत विकास आणि पर्यायी जीवनशैली या कल्पना सोदाहरण स्पष्ट करता येणे. |

# अनुक्रमणिका


| अ.क्र. | पाठाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १. | काय म्हणजे तत्त्वज्ञान ? कशासाठी तत्त्वज्ञान ? | १ |
| २. | आहे काय ? कळते कसे ? करायचे काय ? | १७ |
| ३. | ‘दिसतं तसं नसतं’ | ३१ |
| ४. | जाणण्याविषयी जाणून घेताना | ४० |
| ५. | स्वातंत्र्य आणि नीतिनियम | ५२ |
| ६. | विज्ञान, तंत्रज्ञान आणि तत्त्वज्ञान | ६३ |

# १. काय म्हणजे तत्त्वज्ञान? कशासाठी तत्त्वज्ञान?

१.१ विश्वाबद्दलचे कुतूहल
१.२ तत्त्वज्ञानाची वैशिष्ट्ये आणि व्याप्ती
१.३ तत्त्वज्ञानाच्या पद्धती
१.४ तत्त्वज्ञानाची व्याख्या आणि मूल्य

## प्रस्तावना




आतापर्यंत आपण शाळेत कितीतरी विषय शिकलो, पण 'तत्त्वज्ञान' हा विषय कधीच शिकलो नाही. तरीही कधी ना कधी आपल्या कानावर हा शब्द पडला आहे. कोणीतरी एखाद्या विषयाबद्दल खूप गंभीरपणे, अवघड भाषेत बोलले तर लोक म्हणतात, 'काय तत्त्वज्ञान सांगते आहेस?' कधीतरी कुणी म्हणते, 'तुझे तत्त्वज्ञान तुझ्यापाशीच ठेव, माझे जीवनाबद्दलचे तत्त्वज्ञान वेगळे आहे'. अशा संभाषणांमधून तत्त्वज्ञान म्हणजे नक्की काय याबद्दलच्या काही कल्पना आपल्या मनात निर्माण होतात. त्यावरूनच हा विषय शिकावा की नाही, त्याला काही महत्त्व आहे की नाही, याचे अंदाज आपण बांधतो. एखादा विषय महत्त्वाचा आहे की नाही, त्याचा काय उपयोग असू शकतो, हे कळण्यासाठी त्या विषयाशी आपली चांगली ओळख व्हायला हवी. या पाठात आपण तत्त्वज्ञान या विषयाची ओळख करून घेऊया.

### ज्ञानशाखा

ज्ञानाच्या वेगवेगळ्या क्षेत्रांना किंवा निरनिराळ्या अभ्यास विषयांना विद्याशाखा/ज्ञानशाखा म्हटले जाते. प्रत्येक विद्याशाखेच्या स्वतःच्या विशिष्ट संकल्पना, नियम व सिद्धान्त असतात. ज्ञानशाखांचे ढोबळपणे वर्गीकरण खालीलप्रकारे केले जाते.

### ज्ञानशाखा

- आकारिक शास्त्रे उदा., गणित तर्कशास्त्र
- नैसर्गिक शास्त्रे उदा., भौतिकशास्त्र रसायनशास्त्र जीवशास्त्र
- सामाजिक शास्त्रे उदा., राज्यशास्त्र अर्थशास्त्र
- मानव्यविद्या उदा., भाषा
- ललित कला उदा., नाट्य संगीत
- उपयोजित शास्त्रे उदा., वैद्यकशास्त्र व्यवस्थापनशास्त्र

**विचार करा.**

वरील तक्त्यात तत्त्वज्ञान या विषयाचे स्थान कुठे असावे असे तुम्हाला वाटते?

आपण आज शिकतो, त्या सगळ्या ज्ञानशाखा निर्माण होण्याच्या कितीतरी आधी म्हणजे माणसाच्या हजारो पिढ्यांपासून त्याला त्याच्या भोवतीच्या जगाबद्दल खूप कुतूहल वाटत आले आहे. या जगाचे ज्ञान मिळवण्यासाठी माणूस सतत धडपडत असतो. तसे तर प्रत्येक सजीवालाच आपला जीव टिकवून धरण्यासाठी स्वतःबद्दल आणि जगाबद्दल काहीतरी ठाऊक असावेच लागते. जीवन जगण्याच्या खटाटोपातच माणूस बरेच काही शिकला. पण त्याचा

एक गुणविशेष असा की, त्याला जगाबद्दल वाटणारे कुतूहल मूलभूत गरजा भागवण्याच्याही पलीकडचे होते.

रात्री आकाशात दिसणाऱ्या चांदण्या दिवसा का दिसत नाहीत? काही जीव सरपटतात, काही चालतात, काही उडतात असे का? प्राणी मरतात म्हणजे नक्की काय होते? प्रश्न, प्रश्न आणि प्रश्न. माणसाला असे असंख्य प्रश्न पडत राहिले आणि त्या प्रश्नांच्या उत्तरांचा शोध त्याने हाती घेतला. प्राचीन काळचा मानव एखाद्या अगदी लहान, नुकत्याच बोलू लागलेल्या बाळाप्रमाणे होता. बाळाचे डोळे जसे सभोवतालच्या प्रत्येक वस्तूबद्दलच्या उत्सुकतेने भरलेले असतात, तशीच निखळ उत्सुकता या मानवाला वाटत होती. त्यामधूनच 'हे काय आहे'? 'ते तसे का आहे'? 'ते का बदलते'? या प्रकारचे; प्रत्येक निर्जीव किंवा सजीव गोष्टींबद्दल विचारले जाऊ शकणारे प्रश्न निर्माण झाले. काळाच्या ओघात माणसाच्या बुद्धीचा, विचारक्षमतेचा, भाषेचा विकास होत गेला.

**कुतूहलाच्या विविध वाटा**

१. **पुराकथा**
२. **धर्म**
३. **तत्त्वज्ञान**
४. **विज्ञान**
५. **कला**

विकासाच्या वेगवेगळ्या अवस्थांमध्ये माणसाने या प्रश्नांची वेगवेगळ्या स्वरूपाची उत्तरे शोधली. त्यांतील काही उत्तरे नंतरच्या काळात नाकारली गेली, तर काही आजही टिकून राहिली आहेत.

**तुम्हाला माहित आहे का?**

पुराकथा (Mythology), धर्मचिंतन, तत्त्वचिंतन, विज्ञान, कलाव्यवहार अशा अनेक रूपांमध्ये माणसाच्या चौकस बुद्धीचा आणि त्यामधून त्याला जगाबद्दल जे वाटले, त्याचा आविष्कार झाला. माणसाचा विश्वाशी, निसर्गाशी, इतर माणसांशी काय संबंध आहे, त्याचा अर्थ लावण्याच्या या तऱ्हा होत्या. अतिशय सर्जनशील कल्पनाशक्तीचा वापर करून, अनुभवाला येणाऱ्या परंतु चटकन स्पष्ट न होणाऱ्या घटितांचा उलगडा करण्यासाठी प्रत्येक संस्कृतीमध्ये कथा निर्माण झाल्या.

पुराकथा म्हणजे पूर्वीच्या काळी मानवात प्रचलित असलेल्या गोष्टी किंवा कल्पित कथा. या कथा एका पिढीतून दुसऱ्या पिढीकडे संक्रमित होत राहतात. सहसा या कथांमध्ये आजूबाजूला दिसणाऱ्या, अनुभवाला येणाऱ्या गोष्टींचे किंवा घटितांचे स्पष्टीकरण देवता, असुर, यक्ष अशा अतिमानवी जीवांच्या संदर्भात दिलेले असते. या कथांमधून कर्मकांड देखील सूचित केले जाते. उदाहरणार्थ, एखाद्या वटवृक्षावर देवतेचा वास असतो, अशी प्राचीन धारणा असते. त्यामुळे त्या वृक्षाला धक्का लावायचा नाही किंवा त्याचे लाकूड हवे असल्यास आधी देवतेची प्रार्थना करायची, तिची आज्ञा घेऊन मगच त्या वृक्षावर कुऱ्हाड चालवायची. अशा प्रथा काही आदिम समूहांमध्ये आजही टिकून असलेल्या दिसतात. आजच्या काळात या कथा अभ्यासताना, या कथा का बरं निर्माण झाल्या असाव्यात? त्यांच्या निर्मितीमागे काही विचार अथवा तत्त्व असावे का? असा प्रश्न सहजच पडतो. हा विचार अथवा गोष्टीमागचं तत्त्व विविध तऱ्हांनी समजावून घेणं शक्य असतं. जगभरात अशा प्रकारच्या पुराकथा आढळतात. त्यांतील दोन अतिशय भिन्न भूभागांतील कथा आपण संक्षिप्त रूपात बघू.

**चला वाचूया.**

**थॉरची कथा**

युरोप खंडाच्या उत्तरेला जे देश आहेत (म्हणजे उदा., स्वीडन, नॉर्वे, डेन्मार्क इत्यादी) तिथे 'थॉर' या लढवय्या देवाची कथा प्रचलित आहे. (या कथेवर आधारित एक गाजलेला चित्रपट देखील आहे.) इंद्राचे जसे वज्र तसे थॉरच्या हातात नेहमी हातोडा दाखवला जातो. दोन हजार वर्षांपूर्वी या प्रदेशात राहणाऱ्या प्राचीन जमातींची अशी समजूत होती की थॉर आकाशातून आपल्या रथातून हिंडतो. त्याच्या रथाला दोन बकऱ्या जोडलेल्या असतात. त्याचा हातोडा तो फिरवतो तेव्हा आपल्याला गडगडाट ऐकू येतो आणि विजा चमकताना दिसतात. गडगडाट म्हणजे थॉरची गर्जनाच! गडगडाट ऐकू आला आणि विजा चमकताना दिसल्या म्हणजे पाऊस येतो. पाऊस तर सुफलतेसाठी फारच महत्त्वाचा. म्हणून सुफलनासाठी थॉरची आराधना केली जाते.

**चला वाचूया.**

**इंद्रवृत्र कथा**

प्राचीन काळी इंद्र ही एक अत्यंत महत्त्वाची देवता होती असे ऋग्वेदातील उल्लेखांवरून दिसते. पाऊस पडावा म्हणून इंद्राची पूजा होत असे. त्याचा मुख्य शत्रू वृत्र होय. वृत्रनाशाच्या पराक्रमावर रचलेली पुष्कळ सूक्ते ऋग्वेदात आहेत. इंद्रवृत्र कथेत वृत्र हा एक अक्राळविक्राळ राक्षस कल्पून त्याची तुलना काळ्या मेघाशी केली आहे. वृत्र हा दानव जलप्रवाह अडवतो आणि अनावृष्टी व दुर्भिक्ष निर्माण करतो. इंद्र आपल्या वज्राने त्याचे पोट फाडतो आणि त्यात अडकून पडलेले पाणी धो धो वाहू लागते.

## १.१ विश्वाबद्दलचे कुतूहल

या दोन्ही कथांतून आपल्याला दिसून येते की पाऊस पडणे, विजा चमकणे, गडगडाट होणे या सगळ्यांचा अर्थ लावणे हा प्रयत्न या कथांतून केलेला आहे. पाण्याचे महत्त्व दोन्ही मिथकांत दिसून येते. पाणी पडले तरच शेती सुफळ होणार, सर्वांना प्यायला पाणी मिळणार आणि आनंदीआनंद होणार म्हणून पावसाची देवता असावी असे त्याकाळच्या समूहांस वाटले असण्याची शक्यता आहे.

या कथांचे मूळ याच दृश्य जगात असले, तरी त्यामधून एक काल्पनिक जगही आकाराला येते. या कथांमधून भौतिक जगाच्या पलीकडच्या शक्ती किंवा जीव या जगातल्या घटना नियंत्रित करतात, माणसांना त्यांच्या कृत्यांची बक्षिसे देतात किंवा त्यांना शिक्षा करतात, अशा समजुती प्रचलित झाल्या. त्या शक्तींना शांत किंवा खुष ठेवण्यासाठी वेगवेगळ्या विधींचा, कर्मकांडाचा प्रयोग केला जाऊ लागला.

**चला बोलूया.**

वर्गात पुराकथांचे कथाकथन करा व त्यावर चर्चा करा.

या जगाचे निरीक्षण करताना एका टप्प्यावर माणसाच्या असे लक्षात आले, की जगात घडणाऱ्या घटना कशाही घडत नाहीत. त्यांचा एकमेकांशी संबंध असतो, त्या विशिष्ट क्रमाने घडतात, उदाहरणार्थ, आपण ज्या हवामानात राहतो तिथे उन्हाळा, पावसाळा, हिवाळा हे ऋतू याच क्रमाने येत असतात. पाणी आग विझवू शकते, तर उन्हाने पाण्याची वाफ होते. यामधून त्याच्या असे लक्षात आले, की या जगात एक प्रकारची व्यवस्था आहे. कशामधून काय निर्माण होते, कसे निर्माण होते, याचे नियम आहेत. माणसांच्या जगात असलेले नियम कोणीतरी (म्हणजे कुठल्या तरी माणसांनीच) तयार केलेले असतात. साहजिकच काही विचारवंतांना वाटले की, निसर्गात जे नियम, जी व्यवस्था दिसते ती देखील कुणीतरी निर्माण केलेली असणार.

कदाचित हे सगळे विश्वच कोणीतरी निर्माण केले आहे. यासाठी लागणारी शक्ती अर्थातच प्रचंड, खरे तर अमर्याद असायला हवी. अशांसारख्या कल्पनांमधून 'ईश्वर' संकल्पना साकार व्हायला लागली. ईश्वराचा आणि मानवाचा संबंध काय आहे, काय असायला हवा यांविषयीच्या विचारांनी धर्मचिंतनाचा पाया घातला. या प्रकारच्या चिंतनात कल्पनेबरोबरच बुध्दीचा उपयोग केला गेला. सहसा या दोन्हींच्या जोडीला धर्मचिंतनात श्रद्धेवर खूप भर दिला गेला. या दृश्य जगापलीकडची पारलौकिक शक्ती आणि त्या शक्तीचे स्वरूप ज्यांना समजले आहे, अशा अलौकिक व्यक्तींवर आणि त्यांच्या शब्दांवर श्रद्धा ठेवण्याची आवश्यकता धर्मांनी सांगितली.

**करून पहा.**

खालील बाबींची विविध उदाहरणे शोधा व त्यावर चर्चा करा.

- कल्पनेचा वापर
- बुध्दीचा वापर
- अंधश्रद्धा

जगाबद्दल माणसाला जे समजत होते, जाणवत होते ते त्याच्या जगण्यात वेगवेगळ्या पद्धतींनी व्यक्त होत होते. जगातील वस्तू, घटना यांचे गुणधर्म, एकमेकांशी असलेले संबंध यांबरोबरच माणसाला त्यांच्यामध्ये सौंदर्यसुद्धा जाणवत होते. ते सौंदर्य त्याला मोहित करत होते आणि सौंदर्याची निर्मिती करण्याची प्रेरणाही देत होते. यातूनच माणसाने संगीत, चित्र, नृत्य अशा अनेक कला विकसित केल्या.



भीमबेटका येथील अश्मयुगीन गुहाचित्र

प्राचीन भारतीय साहित्यात मानव आणि कला यांचा विचार फार पूर्वीपासून केल्याचे आढळून येते. कलेबाबतच्या विचारांचा परिपोष कसा झाला होता हे दर्शविणारे उदाहरण.

**विष्णुधर्मोत्तर पुराण**

खंड तिसरा, अध्याय दुसरा

वज्र राजा-मार्कंडेय ऋषी यांच्यातील संवाद

राजा – मला प्रतिमा बनवायची आहे.

ऋषी – ज्याला चित्राचे ज्ञान (चित्रसूत्र ज्ञात) असते त्यालाच प्रतिमा लक्षण (प्रतिमा कशी बनवायची ते) सांगता येते.

राजा – मग तुम्ही मला चित्रसूत्र शिकवा.

ऋषी – जोवर तुला नृत्त (नृत्यातील एक तंत्र) येत नाही तोवर तुला चित्रसुद्धा शिकवू शकत नाही.

राजा – मग तुम्ही मला नृत्त शिकवा.

ऋषी – जोवर तुला एखादे वाद्य वाजवता येत नाही (आतोद्य) तोवर तुला नृत्त देखील शिकवता येणार नाही.

राजा – मग तुम्ही मला वाद्य शिकवा.

ऋषी – त्यासाठी तुला आधी गायन-संगीत शिकावे लागेल.

राजा – मग तुम्ही मला गायन शिकवा.

ऋषी – गायन, संगीत, संस्कृत आणि प्राकृत अशा दोन भाषांमधील असते. ते यायचं तर तुला आधी स्थानिक भाषा याव्या लागतील.

राजा – मग तुम्ही मला भाषा शिकवा.

ऋषी – त्यासाठी तुला व्याकरण शिकण्याची आवश्यकता आहे.

(अशा तऱ्हेने हा संवाद कलांमधील सहसंबंध किंवा परस्परपूरकता सूचित करतो.)

कलेचे एक महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे कुठल्याही व्यावहारिक उपयोगाचा विचारही न करता कलेमधून मिळणाऱ्या आनंदात आपण रममाण होऊ शकतो. कलाकृती निर्माण करणारा आणि त्याचा आस्वाद घेणारा या दोघांनाही कलेतून आनंद मिळतो. कलाविष्कारामध्ये

कल्पना, बुद्धी यांप्रमाणेच सृजनशक्तीची (creativity) आवश्यकता असते.

विश्वाबद्दलच्या आपल्या औत्सुक्यातून जन्म घेतलेल्या प्रश्नांना माणसाने दिलेल्या प्रतिसादांपैकी पुराकथा, धर्मचिंतन आणि कला या तिन्हींमध्ये बुध्दीला स्थान असते हे खरेच, पण या प्रश्नांना तत्त्वज्ञान आणि विज्ञान जी उत्तरे देतात, त्यांचा मात्र बुध्दी हाच खऱ्या अर्थाने पाया असतो. याचा अर्थ असा नाही की, यांमध्ये कल्पनाशक्तीला वावच नसतो. ज्या काळात निरीक्षणे आणि प्रयोग यांना खूप मर्यादा होत्या, त्या काळात कल्पनेच्या बळावरच अनेक उत्तरे मिळवण्याचा प्रयत्न चिंतकांनी केला. मात्र या कल्पनेवर बुद्धीचा अंकुश होता. तर्काच्या आधारावर टिकू शकणाऱ्या कल्पनांनाच तत्त्वचिंतनात स्थान मिळाले. या जगात घडणाऱ्या घटनांना दुसऱ्या कुठल्या जगातील नव्हे, तर याच जगातल्या घटना कारणीभूत आहेत, हे लक्षात यायला लागले.

नद्यांना पूर येतो, तो कुठल्या देवाच्या कोपामुळे नाही, तर नदीच्या पाणलोट क्षेत्रात कुठेतरी खूप जास्त पाऊस पडल्यामुळे, यांसारखे कार्यकारणसंबंध लक्षात यायला लागले. द्रवरूप असणारे पाणीच वाफ झाले की, वायुरूप धारण करते, तर गोठून बर्फ झाले की, घनरूपात येते. अशा गमती लक्षात यायला लागल्या. सुरूवातीच्या काळात हाताला लागलेल्या या तथ्यांमधून तत्त्वचिंतनाची सुरूवात झाली. विश्वात अनेक तऱ्हेच्या, वेगवेगळे गुणधर्म असलेल्या वस्तू असल्या तरी या अनेकतेच्या, विविधतेच्या मुळाशी काही समानता आहे हे तत्त्वज्ञांच्या लक्षात आले. आपल्या डोळ्यांना आणि इतर ज्ञानेंद्रियांना जे अनुभवाला येते, त्या दृश्य, मूर्त जगापलीकडेही न दिसणारे, न जाणवणारे, अदृश्य, अमूर्त असे काहीतरी असू शकेल, याची जाणीव झाली. त्या अमूर्त तत्त्वांचा शोध सुरू झाला.

तत्त्वज्ञानाच्या अगदी सुरूवातीच्या काळातील तत्त्वज्ञांना विश्वाचे मूलतत्त्व म्हणजे ज्या मूळ घटकापासून विश्वाची उत्पत्ती झाली, ते तत्त्व काय असेल याबद्दल खूप कुतूहल होते. या तत्त्वांची संख्या किती आहे, त्यांच्यामध्ये कुठल्या प्रकारच्या प्रक्रिया होऊन हे विविधतेने भरलेले जग आकाराला आले, अशा प्रकारचे प्रश्न त्यांना पडले. इथे आपण सॉक्रेटिसपूर्वीच्या ग्रीक तत्त्वज्ञांनी विश्वाचे मूलतत्त्व कोणते या प्रश्नाला कोणती उत्तरे दिली आहेत त्याची नोंद घेऊया.

| **तत्त्वज्ञ** | **मूलतत्त्व** |
|---|---|
| थेलिस | पाणी/जल |
| अनॅक्सिमॅन्डर | अपायरॉन/असीम |
| अनॉक्सिमिनस | हवा/वायू |
| पायथागोरस | संख्या |
| पारमेनिडिस | असतेपण/सत् |
| हेरॅक्लिटस | अग्नि |
| अनॅक्सॅगोरस | नाऊस |
| एम्पॅडोक्लिस | चार महाभूते - पृथ्वी, आप (जल), तेज (अग्नि), वायू |

ही तत्त्वे आणि अनुभवाला येणारे जग यांचा संबंध काय आहे? या जगात सतत बदल होताना दिसतात, पण कधीच न बदलणारे असे काही असेल का? जगात बदल का होतात? कसे होतात? या सगळ्या प्रश्नांवर ऊहापोह सुरू झाला. त्यामधून जी उत्तरे मिळाली, त्याला तत्त्वज्ञान म्हटले जाते. जगाचा अनुभव आणि बुद्धीच्या बळावर, तर्काच्या चौकटीत त्याची लावलेली संगती, त्यामधून माणसाच्या एकूण जगण्याचा जाणवणारा अर्थ, कसे जगावे याविषयी समजलेली तत्त्वे हे सगळे तत्त्वज्ञानामध्ये अभ्यासले जाते.

तसे पाहिले तर, विज्ञानाची उभारणी ही अनुभव आणि बुद्धी याच दोन स्तंभांवर होत असते. आज ज्यांना आपण विज्ञान म्हणून ओळखतो, अशा भौतिक विज्ञान, रसायन विज्ञान, भूविज्ञान, जैवविज्ञान

यांसारख्या ज्ञानशाखा आधुनिक काळात निर्माण झाल्या. हे आधुनिक विज्ञान आपल्या ज्ञानेंद्रियांच्या आवाक्यात न येणाऱ्या गोष्टी शोधण्यासाठी, समजून घेण्यासाठी अनेक साधनांचा, उपकरणांचा उपयोग करते. या साधनांमुळे आपल्या ज्ञान मिळवण्याच्या क्षमता कित्येक पटीने वाढतात. अत्यंत सूक्ष्मजीव आपण सूक्ष्मदर्शकामुळे बघू शकतो, तर दुर्बिणीतून दूरच्या वस्तू बघू शकतो, ते त्याच वाढलेल्या शक्तीमुळे. या साधनांचा वापर करून केलेली निरीक्षणे, प्रयोग हे विज्ञानाच्या पद्धतीचे वैशिष्ट्य आहे. तत्वज्ञान आणि विज्ञान यांत विचारले जाणारे प्रश्न हे बऱ्याच प्रमाणात सारखे असले, तरी उत्तरांचा शोध घेताना तत्वज्ञान 'बुद्धी' याच साधनाचा वापर करते, तर विज्ञान बुद्धीबरोबरच इतर अनेक भौतिक साधनांचा आणि प्रगत तंत्रज्ञानाचा उपयोग करते. हे प्रश्न मुळात तत्वज्ञानात विचारले गेले आणि त्या प्रश्नांचे बोट धरून विज्ञानाने त्यांची उत्तरे आपल्या पद्धतीने शोधली. म्हणून तत्वज्ञानाला सर्व विज्ञानांचे उगमस्थान मानले जाते. जसजशी उत्तरे सापडत गेली, तसतशा विज्ञानाच्या निरनिराळ्या शाखा विकसित होत गेल्या. विश्वाचे आणि माणसाचे स्वरूप अधिकाधिक स्पष्ट होऊ लागले.

## १.२ तत्वज्ञानाची वैशिष्ट्ये आणि व्याप्ती

विज्ञानाच्या वैशिष्ट्यपूर्ण पद्धतीमुळे तत्वज्ञानाने निर्माण केलेल्या अनेक प्रश्नांची उत्तरे मिळाली, हे खरे असले तरी आजही प्रश्न शिल्लक आहेतच.

**चला शोधूया!**

विज्ञानाची नवी क्षितिजे कोणती?

विश्वाबद्दल, त्याच्या मूळ स्वरूपाबद्दल अजून सगळे ज्ञान प्राप्त झालेले नाही. तत्वज्ञानाला या प्रश्नांमध्ये तर रस आहेच. त्याखेरीज जे प्रश्न विज्ञानाच्या कक्षेत येत नाहीत, अशा अनेक महत्त्वाच्या प्रश्नांचा विचार तत्वज्ञानात केला जातो. उदाहरणार्थ 'ज्ञान' हाच तत्वज्ञानात एक ज्ञानविषय होतो. आपल्याला ज्ञान कसे होते? ज्ञान झाले आहे याचे ज्ञान कसे होते? मुळात 'ज्ञान' म्हणजे काय? निव्वळ माहिती की आणखी काही? यांसारखे अनेक प्रश्न तत्वज्ञान ज्ञानासंबंधी विचारते. विज्ञानाला फक्त तथ्यांमध्ये रस असतो. पण तत्वज्ञानाच्या दृष्टीने तथ्यांएवढीच मूल्यांची, तत्वांची, कल्पनांची व संकल्पनांची चर्चा महत्त्वाची असते. तथ्ये 'काय आहे' याचे वर्णन करतात, तर जे आहे ते योग्य आहे की नाही, ते कसे असावे यांचा विचार मूल्यांच्या आधारे करावा लागतो. इंद्रधनुष्य का दिसते? याचे स्पष्टीकरण विज्ञान करते, पण ते सुंदर दिसते असे म्हणताना सौंदर्य म्हणजे काय, सौंदर्याचे निकष काय असतात? कलेमधून सौंदर्यनिर्मिती होते का? या प्रश्नांचा विचार मात्र विज्ञानात नाही, तर तत्वज्ञानात होतो. माणूस खोटे का बोलतो याचे स्पष्टीकरण मानसशास्त्र करते, पण खोटे बोलणे चांगले की वाईट, योग्य की अयोग्य याची चर्चा मात्र तत्वज्ञानात होते. त्याचप्रमाणे अनेक प्रसंगांत आपले मत बरोबर आहे हे सांगताना जे युक्तिवाद माणूस करतो, ते बरोबर की चूक याचे परीक्षण तत्वज्ञान करते.

व्यापक दृष्टीने पहाता असे म्हटले जाते की, तत्वज्ञान चार प्रकारच्या संबंधांचा अभ्यास करते. ते चार संबंध म्हणजे (१) माणूस आणि निसर्ग यांचा संबंध (२) माणूस आणि समाज यांचा संबंध (३) दृश्य जगाच्या पलीकडे जर काही अस्तित्व असेल, तर त्या अस्तित्वाशी असलेला संबंध आणि (४) माणसाचा स्वतःशी असलेला संबंध. एका अर्थी तत्वचिंतनात माणसाचा विचार केंद्रस्थानी आहे. आपल्यामध्ये माणूस म्हणून कुठल्या क्षमता, कुठली गुणवैशिष्ट्ये आहेत? आपल्या मर्यादा कोणत्या? आपल्या क्षमतांचा पूर्ण विकास होऊन एक सुखी, सफल जीवन आपल्याला कसे जगता येईल हे प्रश्न तत्वज्ञानात महत्त्वाचे मानले गेले आहेत.

## १.३ तत्वज्ञानाच्या पद्धती

तसे पहायला गेले तर, तत्त्वज्ञान या विषयाचा आवाका खूपच मोठा आहे. पण थोडक्यात सांगायचे झाले तर तत्त्वज्ञान जे तीन मुख्य प्रश्न विचारते, ते म्हणजे,

- 'काय आहे?'
- 'जे आहे, ते आपल्याला कसे कळते?' आणि
- 'जे आपल्याला कळते, त्याचा आपल्या जगण्यावर, वागण्यावर काय आणि कसा परिणाम होतो?'

या आणि अशा अनेक प्रश्नांचा सखोल आणि पद्धतशीर विचार तत्त्वज्ञानात केला जातो. चिकित्सा हा तत्त्वज्ञानाच्या पद्धतीचा गाभा आहे. चिकित्सा करणे म्हणजे आपल्यापुढे जे मत, विचार किंवा संकल्पना येते, ती जशीच्या तशी मान्य न करता त्याबद्दल वेगवेगळे प्रश्न विचारून ती नीट समजून घेणे आणि त्याचे परीक्षण करणे. उदाहरणार्थ, लोकशाही या संकल्पनेची चिकित्सा करायची असेल तर तिचा अर्थ, प्रकार, इतिहास, स्वरूप सगळे समजून घेतले पाहिजे. नंतर ती पद्धती योग्य आहे का याचे परीक्षण केले पाहिजे. अशी चिकित्सा करण्यासाठी तत्त्वज्ञान बहुतेक वेळा संकल्पनांचे विश्लेषण करते. म्हणजे त्या संकल्पनेचे निरनिराळे घटक आणि त्यांचा एकमेकांशी असलेला संबंध यांचा अभ्यास करते. 'लोकशाही' या संकल्पनेत 'लोक' आणि 'राज्य' या संकल्पना अंतर्भूत आहेत. त्यामुळे 'लोकशाही' ही संकल्पना समजून घेताना लोक म्हणजे नक्की कोण? राज्य म्हणजे काय? राज्यसंस्था म्हणजे काय? 'लोकांचे राज्य' याचा अर्थ काय, हे अभ्यासावे लागते.

**चला बोलूया!**

'लोकशाही' या विषयावर गटचर्चा करा.

तत्वज्ञानाचे पारंपरिक उद्दिष्ट कुठलाही विषय संपूर्णपणे समजून घेण्याचे असते. त्यासाठी तो विषय मुळापासून अभ्यासावा लागतो. त्याचप्रमाणे त्या विषयाला असणाऱ्या अनेक बाजूही समजून घ्याव्या लागतात. हे सगळे करताना चिकित्सक दृष्टिकोन कायम राखायचा असतो. हे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी तत्त्वज्ञानाने अनेक वैशिष्ट्यपूर्ण पद्धतींचा उपयोग केला आहे. आपण आधी पाहिल्याप्रमाणे तत्त्वज्ञान श्रद्धेवर विसंबत नाही, कल्पनेला अनिर्बंध भराऱ्याही मारू देत नाही आणि अनुभवावर आधारित वैज्ञानिक पद्धतीही वापरत नाही. बुध्दी, विशेषतः तर्कबुध्दी हे तत्त्वज्ञानाचे प्रमुख साधन आहे. तत्त्वज्ञानाच्या पद्धती या साधनाचा कार्यक्षम वापर कसा केला जाऊ शकतो, याचे मार्गदर्शन करतात.

**विश्लेषण पद्धती :** तर्काच्या आधारे विचार, कल्पना, संकल्पना, सिद्धान्त, उदाहरणे यांचे विश्लेषण करणे ही तत्त्वज्ञानाची प्राचीन काळापासून प्रचलित असलेली पद्धत आहे. विश्लेषण करणे म्हणजे एखादे संयुग ज्या घटकांचे बनले आहे, ते घटक त्या संयुगाचे पृथक्करण करून ओळखणे, त्यांचे स्वरूप समजून घेणे. रसायनशास्त्रात तुम्ही रासायनिक संयुगांचे विश्लेषण आणि त्याचे महत्त्व शिकला आहातच. तत्त्वज्ञानाला विश्लेषण पद्धती वापरण्यासाठी भौतिक विज्ञानांप्रमाणे प्रयोगशाळांची गरज नसते. तत्त्वज्ञान काही भौतिक पदार्थांचे विश्लेषण करत नाही. ते अमूर्त गोष्टींचे विश्लेषण करते. त्यासाठी लागणारी उपकरणे ही तत्त्वज्ञाच्या मेंदूतच उपलब्ध असतात. एका अर्थाने आपला मेंदू हीच आपल्यासाठी २४ x ७ एवढा वेळ उपलब्ध असलेली प्रयोगशाळाच असते. आपल्या समोर येणारी माहिती, मते, समजुती या सगळ्यांचा विचार इथे चालू असतो. जेव्हा जाणीवपूर्वक आपण या गोष्टींचे मूळ घटक आणि त्यांची रचना शोधायचा प्रयत्न करत असतो, तेव्हा आपण सगळे विश्लेषण पद्धतीच वापरत असतो. उदा., 'माणूस' हा शब्द कुठल्याही घटक शब्दांमधून तयार होत नाही. पण

त्या शब्दातून ज्या संकल्पनेचा निर्देश होतो, ती आपल्याला सर्वसाधारणपणे समजते. तिचे विश्लेषण इतर घटक संकल्पनांमध्ये करता येऊ शकते.

**चला करूया!**

संकल्पना चित्र (concept map) तयार करा.
१.मूर्त २.अमूर्त ३.माणूस

माणूस हा असा दोन पायांचा जीव असतो, जो बुध्दीशील आणि समाजशील असतो. याप्रकारे हे विश्लेषण करता येते. तुमच्या हे लक्षात आलेच असेल, की 'माणूस' या संकल्पनेची ही व्याख्या आहे. प्राचीन ग्रीक तत्त्वज्ञ सॉक्रेटिसने अशी विश्लेषण पद्धती वापरून संकल्पनांच्या काटेकोर व्याख्या करण्याच्या दिशेने महत्त्वाचे पाऊल उचलले.

आपल्या संकल्पनांच्या आकलनात सुस्पष्टता आल्याखेरीज त्यांची व्याख्या करता येत नाही. ही सुस्पष्टता, आखीव-रेखीवपणा आणण्याचे कार्य विश्लेषण पद्धती करते. यामुळे आपल्या विचारांमधील संदिग्धता, गोंधळ दूर होतात. तत्त्वज्ञांसाठी ही पद्धती नेहमीच महत्त्वाची असली तरी विसाव्या शतकात पाश्चात्त्य तत्त्वपरंपरेत 'विश्लेषणवादी तत्त्वज्ञान' नावाचा जो विचार प्रवाह निर्माण झाला,

**माहीत आहे का तुम्हाला?**


ॲकॅडमी ऑफ अथेन्स येथील सॉक्रेटिसचा पुतळा

**सॉक्रेटिस** – अथेन्समध्ये इसवी सन पूर्व ४७० मध्ये एका सामान्य कुटुंबात जन्माला आलेल्या सॉक्रेटिस या तत्त्वज्ञाला 'पाश्चात्त्य तत्त्वज्ञानाचा जनक' म्हणून ओळखले जाते. ग्रीसमध्ये सॉक्रेटिसपूर्वीही तत्त्वचिंतनाला प्रारंभ झाला होता. मात्र, सॉक्रेटिसने त्याला एक निर्णायक वळण दिले. त्यामुळे त्याला हे बिरूद मिळाले. सॉक्रेटिसचे व्यक्तिमत्त्व अनाकर्षक असले तरी त्याच्या बुद्धीची प्रखरता आणि त्याची चारित्र्य संपन्नता विलक्षण प्रभावी होती. सॉक्रेटिसला विश्वाच्या उत्पत्तीविषयक प्रश्नांमध्ये रस नव्हता. माणसाचे वैयक्तिक आणि सामाजिक जीवन कसे असायला हवे हा प्रश्न त्याच्या तत्त्वचिंतनात सगळ्यांत महत्त्वाचा आहे. सत्याचा आणि सार्वत्रिक व सार्वकालिक नीतिमूल्यांचा शोध घेऊन त्यानुसार जीवन जगणे हे त्याच्या तत्त्वचिंतनाचे उद्‌दिष्ट होते. अतिशय निर्भयतेने, चिकाटीने, व्यावहारिक फायद्या-तोट्याचा विचार न करता त्याने या उद्‌दिष्टाचा पाठपुरावा आयुष्यभर केला, एवढेच नव्हे तर सत्यशोधनासाठी त्याने मृत्यूदंडही शांतपणे स्वीकारला. सद्गुण, न्याय, धाडस, संयम यांसारख्या संकल्पनांचे त्याच्या काळात जे आकलन होते, त्याबाबत सतत प्रश्न विचारून त्याने त्यांचे चिकित्सक परीक्षण केले. समाजाच्या सर्व थरांमधील लोकांना निर्भीडपणे प्रश्न विचारत राहण्याच्या त्याच्या पद्धतीमुळे बरेच लोक दुखावले गेले. तो तरुणांना बिघडवतो आणि राज्यसंस्थेने मानलेल्या देवांना नाकारतो असे आरोप त्याच्यावर ठेवून त्याला विष पाजून मृत्यू देण्याची शिक्षा ठोठावण्यात आली. न्यायालयाकडे दयेची भीक न मागता, कुठलाही तडजोडीचा मार्ग न स्वीकारता, तसेच तुरुंगातून सुरक्षितपणे निसटून जाणे शक्य असूनही तसे न करता सॉक्रेटिसने शांतपणे मृत्यू स्वीकारला. '**ज्याचे परीक्षण केलेले नाही, असे जीवन जगण्याच्या योग्यतेचे नाही**' हे त्याचे वचन सुप्रसिद्ध आहे. विचार, भाषण, कृती या सगळ्यांमधील एकवाक्यता त्याच्या जीवनात दिसून येते. सत्यावरची प्रखर निष्ठा, तत्त्वज्ञानाविषयी विलक्षण प्रेम आणि असामान्य नैतिक धैर्य यांसाठी सॉक्रेटिसचे स्मरण आपल्याला कायम राहील.

त्याने तर विश्लेषण हे तत्त्वज्ञानाचे एकमेव कार्य आहे, असे मत मांडले.

**संवाद पद्धती :** सगळ्याच सर्वसाधारण माणसांना बुद्धीची निसर्गदत्त देणगी मिळालेली असते. पण प्रत्येकाच्या बुद्धीच्या आपापल्या मर्यादा असतात. प्रत्येकाची बुद्धी सर्वच क्षेत्रांत सारख्या कार्यक्षमतेने बहुधा काम करत नाही. कुणाची बुद्धी गणितात तल्लख असते तर कुणाची भाषा विषयात. कोणी तिचा जास्त वापर क्रीडाक्षेत्रात करते तर कोणी कलाक्षेत्रात. आपल्या बुद्धीच्या विकासावर आपल्या सामाजिक-सांस्कृतिक पर्यावरणाचाही खूप मोठा परिणाम होत असतो. साहजिकच एखाद्या विषयाचा सांगोपांग अभ्यास एकाच व्यक्तीला करता येतोच असे नाही. काही माणसांनी एकत्र येऊन केलेला विचार अधिक फलदायी ठरतो, कारण एकाच वेळी त्या विषयाचे अनेक पैलू लक्षात येऊ शकतात. तसेच त्या विषयाबद्दलचे वेगवेगळे दृष्टिकोन समजल्यामुळे आपला विचार अधिक समावेशक आणि संतुलित होतो. अनुभवाधिष्ठित निरीक्षणे, प्रयोग, पडताळा पद्धती इत्यादी उपयोगात न आणणाऱ्या तत्त्वज्ञानासारख्या विषयासाठी अशा समूहाने वापरण्याच्या पद्धतींचे महत्त्व जास्तच आहे. या वापरामुळे व्यक्तिगत मते, पूर्वग्रह यांचा अवाजवी प्रभाव तत्त्वचिंतनावर राहत नाही.

भारतीय आणि पाश्चात्त्य या दोन्ही परंपरांमध्ये प्राचीन काळी 'संवाद' या पद्धतीचा यामुळेच लक्षणीय वापर झालेला दिसतो. प्राचीन भारतात गुरूजवळ बसून ज्ञान ग्रहण करण्याची पद्धत होती. या काळात ज्ञान देण्या-घेण्याचे साधन मुख्यतः गुरू-शिष्य संवाद हे होते. शिष्याने विचारलेल्या शंका, प्रश्न, उपप्रश्न यांना उत्तरे देऊन गुरू शिष्याला ज्ञान मिळवण्यासाठी मदत करत असत. भारतीय तत्त्वज्ञानाच्या दृष्टीने अतिशय महत्त्वाचे ग्रंथ म्हणजे उपनिषदे. अनेक उपनिषदांमध्ये आपल्याला संवादरूपाने तत्त्वज्ञान मांडलेले दिसते. उदाहरणार्थ, **छांदोग्य उपनिषदातील श्वेतकेतू-उद्दालक** संवाद तर **बृहदारण्यक** उपनिषदातील या **याज्ञवल्क्य-मैत्रेयी** संवाद. बौद्ध विचार परंपरेत **'मिलिंदपन्ह'** (मिलिंदप्रश्न) हा असाच संवादामधून बौद्ध तत्त्वज्ञानाची मांडणी करणारा ग्रंथ आहे. भगवद्गीता हा ग्रंथही कृष्ण आणि अर्जुनाच्या संवाद रूपात आहे.

**छांदोग्य उपनिषद खंड - १३**

उद्दालक म्हणाला, हे मीठ (आज) पाण्यात टाकून ठेव आणि (उद्या) सकाळी माझ्याकडे ये. श्वेतकेतूने त्याप्रमाणे केले. पिता त्याला म्हणाला, रात्री जे मीठ तू उदकात टाकलेस ते काढ. श्वेतकेतू हात घालून पाहू लागला पण ते त्याला सापडले नाही.

१. कारण ते उदकात लुप्त झाले होते. पिता म्हणाला, आता त्या उदकापैकी वरच्या भागातले थोडे घेऊन आचमन कर. (मुलाने त्याप्रमाणे केले). "कसे आहे?" "खारट आहे." "मध्य भागातले घेऊन आचमन कर. कसे आहे?" "खारट आहे." "खालच्या भागातले घेऊन आचमन कर. कसे आहे?" "खारट आहे." "आता ते उदक टाकून दे आणि मजकडे ये." श्वेतकेतू ते उदक टाकून "ते लवण उदकात टाकले म्हणजे नेहमी रहाते" असे म्हणत पित्याकडे आला. पिता त्याला म्हणाला, बाळा, याच (तेज, उदक, अन्न इत्यादीकांच्या कार्यरूपी) शरीरामध्ये सत् आहे. (पण) ते तुला दिसत नाही तरी ते येथेच आहे.

२. या प्रजा ज्याच्यामध्ये प्रवेश करून पुन्हा प्रकट होतात ते सत् अणुप्रमाण आहे ते या सर्वांचा आत्मा आहे. ते सत्य आहे तोच आत्मा आहे. श्वेतकेतो, तो तू आहेस.

पाश्चात्त्य परंपरेत सॉक्रेटिसने संवाद-पद्धती अत्यंत प्रभावीपणे उपयोगात आणली आहे. या

संवादांमध्ये सॉक्रेटिस निरनिराळ्या विषयांसंबंधी, संकल्पनांसंबंधी संवादात सहभागी असणाऱ्यांना प्रश्न विचारत असे. 'सद्‌गुण म्हणजे काय'? 'न्याय म्हणजे काय'? अशा वरकरणी साध्या दिसणाऱ्या प्रश्नांची उत्तरे द्यायला या व्यक्ती आत्मविश्वासाने पुढे सरसावत. त्यांनी दिलेल्या उत्तरांची चिकित्सा करून सॉक्रेटिस त्यांना त्यातील त्रुटी दाखवून देई. त्यांना अधिक विचार करायला भाग पाडे. या प्रक्रियेतून त्या व्यक्तींना आपल्या अज्ञानाची किंवा ज्ञानाच्या अपुरेपणाची जाणीव होई. वैचारिक गोंधळातून वैचारिक स्पष्टतेकडे प्रवास सुरू होणे हे महत्त्वाचे कार्य त्यामधून साधले जाई. सॉक्रेटिसचा शिष्य प्लेटो यानेही संवाद पद्‌धती वापरली. त्याने आपले तत्त्वचिंतन निबंधांच्या रूपात न मांडता लिखित संवादाच्या रूपात मांडले.

**चला करूया!**

- संवादासाठी विषयाची निवड करा.
- विद्यार्थ्यांना गुरू-शिष्य अशा भूमिका द्या.
- वर्गात या संवादाचे नाट्यीकरण सादर करा.

**वाद पद्‌धती :** संवाद पद्‌धतीबरोबरच भारतीय परंपरेने 'वाद' पद्‌धतीचाही उपयोग केला. वाद म्हणजे भांडण नव्हे बरं का! वाद ही भारतीयांनी सत्यशोधनासाठी वापरलेली एक महत्त्वाची, मान्यताप्राप्त पद्‌धती होती. वादसभा भरवून या पद्‌धतीने विचार मंथन केले जात असे. एखाद्या विषयावर दोन विरुद्‌ध मते असणाऱ्यांनी केलेली चर्चा असे वादाचे स्वरूप असे. सर्वप्रथम वादाचा नेमका विषय काय ते निश्चित केले जाई. त्यानंतर 'वादी' म्हणजे त्या विषयावरचे आपले मत पहिल्यांदा मांडणारा तत्त्वज्ञ आपला पक्ष म्हणजे बाजू स्पष्ट करे. त्यानंतर त्या बाजूच्या विरोधी मत असणारा प्रतिवादी; वादीचे म्हणणे खोडून काढायचा प्रयत्न करी आणि मग स्वतःचे मत मांडे. वादी आणि प्रतिवादी एकमेकांच्या मताचे चिकित्सक परीक्षण करत. वाद ऐकायला आलेल्या श्रोत्यांनाही 'प्राश्निक' म्हणून प्रश्न विचारता येत. सभेच्या सगळ्या कामकाजावर अध्यक्षांची, सभापतींची देखरेख असे. ज्या पक्षाची बाजू तार्किकदृष्ट्या जास्त बळकट, त्या पक्षाला विजेता घोषित केले जाई. या वादसभेचे स्वरूप वरवर पाहता तुम्ही ज्यात भाग घेत असता त्या वादविवाद स्पर्धेसारखे वाटले तरी ते त्यापेक्षा वेगळे होते. वादाचे उद्‌दिष्ट चर्चाविषयाबद्‌दलचे सत्य एकमेकांबरोबर केलेल्या चर्चेमधून शोधून काढणे हे असे. वादी किंवा प्रतिवादीला दुसऱ्या पक्षाचे मत पटले तर ते तसे मोकळेपणे मान्य करत. त्यात कमीपणा मानत नसत. आपण केलेल्या युक्तिवादात चूक असेल, असत्य पुरावा दिला गेला असेल तर तो परत घेत. त्याचप्रमाणे दोनही बाजूंना अधिक तयारी करून पुन्हा वादसभेत चर्चा करण्याचीही मुभा असे.

**वादे-वादे जायते तत्त्वबोधः।**
परस्परविरोधी मते असणाऱ्यांनी एकमेकांशी खुल्या मनाने चर्चा केल्यास, सर्वांना तत्त्वाचे ज्ञान होते. (संदर्भः- रंभा-शुक संवाद)

**सांगा पाहू?**

तुमच्या शाळेत कोणकोणत्या विषयांवर वादविवाद स्पर्धा आयोजित केल्या होत्या?

तुम्हाला कोणत्या विषयावर वादविवाद स्पर्धेत बोलण्यास आवडेल?

ज्ञानप्राप्तीसाठी एवढ्या खुल्या वातावरणाचे महत्त्व प्राचीन भारतीय परंपरेने ओळखले होते. अर्थात काही व्यक्ती स्पर्धेप्रमाणे जिंकायच्या ईर्षेने वादात उतरत. त्यांना सत्य शोधण्यापेक्षाही विरुद्‌ध पक्षाला हरवण्यात रस असे. अशा हार-जितीच्या उद्‌देशाने होणाऱ्या चर्चेला 'जल्प' म्हटले जाई. कधी-कधी तर निव्वळ वादासाठी वाद घातला जाई. आपले मत न मांडता प्रतिपक्षाच्या मताविरुद्‌ध युक्तिवाद मांडण्याचाच आनंद काही व्यक्ती घेत. या प्रकारच्या चर्चेला 'वितंड' म्हटले जाई. खऱ्याखुऱ्या वादात मात्र 'सत्य' हेच एकमेव उद्‌दिष्ट असे.

## सॉक्रेटिस–क्रिटो संवाद

**पार्श्वभूमी:** सॉक्रेटिसला मृत्यूची शिक्षा फर्मावल्यानंतर, तिची अंमलबजावणी होईपर्यंत सॉक्रेटिसला तुरुंगात ठेवण्यात आले होते. शिक्षेची अंमलबजावणी ज्या दिवशी होण्याची शक्यता होती, तिच्या आदल्या रात्री त्याचा मित्र व शिष्य क्रिटो त्याला भेटायला तुरुंगात आला. तुरुंगातून सॉक्रेटिसला निसटून कसे जाता येईल याची त्याने योजना तयार केली होती. सॉक्रेटिसचा या योजनेला विरोध होता. या वेळी झालेल्या संवादाचा काही भाग पुढे दिला आहे. क्रिटोने असे मत व्यक्त केले की, 'मला शक्य असून मी सॉक्रेटिसला पळून जायला मदत केली नाही हे कळले, तर आपल्याला दोघांना ओळखणारे अनेक जण मला दूषणे देतील.' सॉक्रेटिसचा मुद्दा असा आहे की, ज्याप्रमाणे शरीरस्वास्थ्यासाठी आपण डॉक्टर किंवा प्रशिक्षक यांचेच मत विचारात घेतो, त्याचप्रमाणे न्याय/अन्याय यासंबंधी आपण सर्वांचे नाही, तर फक्त जाणकारांचे मत विचारात घेतले पाहिजे.

**सॉक्रेटिस:** म्हणून क्रिटो, न्याय आणि अन्याय, तिरस्करणीय आणि आदरणीय, चांगले आणि वाईट या संबंधीच्या ज्या प्रश्नांची तपासणी आपण आता करतो आहोत, त्यासंबंधी अनेकांचे जे मत आहे त्याचे अनुकरण करून आपण त्यांचे भय बाळगले पाहिजे का? का इतर सर्व लोकांपेक्षा, ज्याला या गोष्टींची जाण आहे (जर असा कोणी असेल तर) त्याच्यासमोर आपल्याला शरम आणि भय वाटले पाहिजे? कारण आपण त्याचे अनुसरण केले नाही, तर आपण म्हणत असू त्याप्रमाणे, आपल्यामधला तो अंश, ज्यामध्ये न्यायाने सुधारणा होते आणि जो अन्यायाने असमर्थ होतो त्याला आपण बाधित आणि पंगू करू. का असे होणार नाही?

**क्रिटो:** नाही सॉक्रेटिस, मी तुझ्याशी सहमत आहे.

**सॉक्रेटिस:** आता, जर अज्ञानी लोकांचे ऐकून आपल्यातला आरोग्याने सुधारणारा आणि रोगाने बाधित होणारा अंश आपण असमर्थ करून टाकला, तर तो भाग बाधित असताना आपले आयुष्य जगण्याच्या योग्यतेचे असेल का? तो (भाग) म्हणजे शरीर, हो की नाही?

**क्रिटो:** हो.

**सॉक्रेटिस:** बाधित आणि पंगू शरीराबरोबर जीवन जगण्याच्या योग्यतेचे असते का?

**क्रिटो:** नाही, निश्चितच नाही.

**सॉक्रेटिस:** मग आपला जो अंश अन्यायामुळे पंगू होतो आणि न्यायामुळे ज्याला लाभ होतो, तो भाग बाधित झाला तर जीवन जगण्याच्या योग्यतेचे असते का? का आपण असा विचार करतो आहोत की हा न्याय–अन्यायाशी संबंधित भाग, तो जो काही असेल तो, शरीरापेक्षा कमी महत्त्वाचा आहे?

**क्रिटो:** नाही, नक्कीच नाही.

**सॉक्रेटिस:** पण जास्त मौल्यवान?

**क्रिटो:** होय, खूपच जास्त.

**सॉक्रेटिस:** मग माझ्या सन्मित्रा, आपण अनेकजण आपल्याबद्दल काय म्हणतील याचा एवढा विचार करता कामा नये. आपण याचा विचार केला पाहिजे की, ज्या एकाला न्याय आणि अन्यायाचे ज्ञान आहे तो आणि स्वतः सत्य आपल्याबद्दल काय म्हणेल? आणि म्हणून; न्याय, मान, चांगुलपणा आणि त्याविरोधी (गुणधर्म) यांच्यासंबंधात बहुसंख्य लोकांचे मत लक्षात घेण्याचे जे आव्हान तू करतोस, तेच मुळात चुकीचे आहे.

**चला पाहूया!**

- दूरचित्रवाणीवरील वाहिन्यांवर बातम्यांदरम्यान होणाऱ्या चर्चा पहा.
- त्या चर्चांचे वाद, जल्प, वितंड असे स्वरूप ओळखून वर्गीकरण करा.

**खंडन–मंडन पद्धती :** 'खंडन-मंडन' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या पद्धतीतही विरोधी मतांची आदरपूर्वक दखल घेण्याची भारतीय परंपरा प्रतिबिंबित झाली आहे. या पद्धतीनुसार ग्रंथलेखनात प्रथम प्रतिपक्षाचे म्हणजे विरोधी मत व्यवस्थितपणे मांडले जात असे. याला **'पूर्वपक्ष'** असे म्हणत. योग्य युक्तिवादाच्या आधारे हे मत खोडून काढणे या पुढच्या पायरीला **'खंडन'** म्हटले जाई. त्यानंतर **'उत्तरपक्ष'** या टप्प्यावर स्वतःचे मत मांडून त्याचे समर्थन युक्तिवादांच्या आधारे केले जाई. सरतेशेवटी जो अंतिम निष्कर्ष मांडला जाई त्याला **'सिद्धान्त'** म्हणून ओळखले जात असे.

**माहीत आहे का तुम्हांला?**



रेने देकार्त

**संशय पद्धती:** आधुनिक पाश्चात्त्य तत्त्वज्ञानात फ्रेंच तत्त्वज्ञ रेने देकार्त याने संशय पद्धती उपयोगात आणली. 'संशय' या शब्दाकडे आपण बहुतेक वेळा काहीशा नकारात्मक दृष्टीने बघतो. संशयी असणे चांगले मानले जात नाही. इथे हे लक्षात ठेवायला हवे की, तत्त्वज्ञानाच्या संदर्भात संशय या शब्दाची नकारात्मक अर्थच्छटा अभिप्रेत नाही. हा संशय कुठल्याही व्यक्तीबद्दलचा नसतो. तत्वचर्चेत संशय घेतला जातो, तो जे काही ज्ञान म्हणून मांडले जाते त्यावर किंवा त्यासाठी दिलेल्या युक्तिवादांवर! देकार्तच्या काळावर 'संशयवादी' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या तत्वचिंतकांचा प्रभाव होता. हे चिंतक कुठल्याही काळात, सर्व ठिकाणी निःसंशयपणे सत्य असलेल्या ज्ञानाची शक्यताच नाकारीत. गणित, भूमिती आणि विज्ञानाचा अभ्यासक असलेल्या देकार्तला मात्र असे ज्ञान शक्य असते अशी खात्री होती. ही शक्यता सिद्ध करण्यासाठी देकार्तने संशय पद्धती अवलंबली. या पद्धतीने त्याने हे तपासायला सुरुवात केली की ज्यावर शंकाच घेता येणार नाही, संशय घेणे शक्यच होणार नाही, असे काही सत्य सापडू शकते का? तोपर्यंतच्या आयुष्यात अनुभवाला आलेल्या, शिक्षणक्रमात शिकलेल्या सर्व सत्यांबद्दल शंका घेता येते का हे पाहाताना त्याला असे लक्षात आले की, या सर्व सत्यांबद्दल एवढेच काय, तर जगाच्या अस्तित्वाबद्दलही संशय घेणे, शंका निर्माण करणे शक्य आहे. मात्र या प्रवासात अखेर त्याला ज्यावर खरोखरच संशय घेता येणे शक्यच नाही असे एक सत्य गवसले. ते सत्य म्हणजे, 'मी विचार करतो, (म्हणजे) मी आहे.' 'I think therefore I am' (English) 'Cogito ergo sum' (Latin). त्याच्या असे लक्षात आले की, इतर कशावरही संशय घेतला तरी संशय घेणाऱ्याच्या अस्तित्वावर संशय घेणे अशक्य आहे. संशय घेण्यातच संशय घेणाऱ्याचे अस्तित्व एका तऱ्हेने सिद्ध होते. अशा इतर सत्यांचा शोध घेऊन ज्ञानाचा पाया भक्कम करण्याचा प्रयत्न देकार्तने केला.

तत्वज्ञानाच्या इतिहासात संशयवाद्यांनी निर्माण केलेल्या संशयांमुळे तत्वज्ञानाच्या विकासासाठी खूप मोठा हातभार लावला आहे. शंका उपस्थित करण्याची वृत्ती आणि प्रश्न विचारण्याची सवय चिकित्सक विचार करण्यासाठी आपल्याला प्रवृत्त करते. कुठल्याही अनुभवावर, विचारांवर, मतांवर डोळे झाकून विश्वास ठेवण्याचा भाबडेपणा आपली फसगत करू शकतो. त्यामुळे योग्य वेळी, योग्य ते संशय/शंका उपस्थित करणे हे ज्ञानप्राप्तीसाठी आवश्यकच असते.

**पूर्वपक्ष ⟶ खंडन ⟶ उत्तरपक्ष ⟶ सिद्धान्त**

दोन विरोधी मतांच्या विचार संघर्षातून तिसरा अधिक योग्य, प्रगत विचार विकसित करण्याची पद्धती पाश्चात्त्य परंपरेतही वापरली गेली. तिला '**द्वंद्वविकास पद्धती**' असे नाव आहे.

**सांगा पाहू.**

१. तुम्हाला पडलेल्या प्रश्नांची उत्तरे शोधण्यासाठी तुम्ही कोणकोणत्या मार्गांचा अवलंब करता?
२. तुम्हाला सर्वच प्रश्नांची उत्तरे मिळतात का?
३. ती उत्तरे खरी की खोटी याची तपासणी करता का?
४. मिळालेल्या उत्तराने तुमचे समाधान होते का?

तत्त्वज्ञान ज्या विषयांचा अभ्यास करते, ज्या प्रश्नांबद्दल विचार करते, त्या प्रश्नांना सहसा गणित किंवा विज्ञानाप्रमाणे एकच एक उत्तर नसते. त्या प्रश्नांना वेगवेगळी उत्तरे असू शकतात. यांतील कुठलेही उत्तर अभ्यास न करताच नाकारले जात नाही. प्रत्येक उत्तराची चिकित्सा केली जाते, इतर उत्तरांशी तुलना केली जाते. ही विचारप्रक्रिया कायम चालू राहते. काळानुसार, परिस्थितीनुसार प्रश्नांचे स्वरूप बदलते, तसे उत्तरांचेही. त्यामुळे आपल्याला मिळालेले उत्तर हेच योग्य आणि अंतिम असे मानता येत नाही. तसे मानले, तर तत्त्वज्ञानाचा विकासच खुंटेल.

**चला बोलूया.**

तुम्हाला कदाचित असा प्रश्न पडू शकेल की काय हरकत आहे तत्त्वज्ञानाचा विकास खुंटला तर? विज्ञान आपल्याला विश्वाचे रहस्य उलगडून सांगते आहे. तंत्रज्ञान जीवन आरामदायक, सुखकर करते आहे. मग आपल्याला तत्त्वज्ञानाची जरूरच काय आहे?

## १.४ तत्त्वज्ञानाच्या व्याख्या आणि मूल्य

आपण जर तत्त्वज्ञानाच्या प्रचलित व्याख्या थोडक्यात पाहिल्या तर 'तत्त्वज्ञानाची जरूर काय?' या प्रश्नाचे उत्तर आपल्याला चटकन समजेल. भारतीय विचारपरंपरेचा इतिहास पाहिला, तर असे लक्षात येते की ब्रिटिश भारतात आल्यानंतरच्या काळात 'Philosophy' या इंग्लिश शब्दाला पर्याय म्हणून 'तत्त्वज्ञान' हा शब्द एकूणच तत्त्वचिंतनासाठी उपयोगात आणला गेला. 'तत्त्वज्ञान' या शब्दाचा अर्थ 'तत्त्वाचे ज्ञान' असा आहे. 'तत्त्व' या शब्दाचा अर्थ खूप व्यापक आहे. एका अर्थी तत्त्व म्हणजे जे काही अस्तित्वात आहे, त्या सगळ्या दृश्य विश्वाच्या मुळाशी असणारे पण अमूर्त असे अस्तित्व. ते बुद्धीला समजते, पण इंद्रियांच्या अनुभवाला येत नाही. एकाच प्रकारच्या अनेक वस्तूंमध्येही एक 'सारतत्त्व' (essence) असते असे मानले जाते. उदाहरणार्थ, वृक्ष अनेक तऱ्हांचे, आकारांचे असतात, पण त्यांना 'वृक्ष' असे एकच नाव दिले जाते, ते त्यांच्यामध्ये असलेल्या 'वृक्षत्व' या सारतत्त्वामुळे.

**चला करूया!**

'सारतत्त्व' यावर संकल्पना चित्र तयार करा.

तत्त्वज्ञान अनुभवाला येणाऱ्या सर्व गोष्टींच्या पलीकडे काही अमूर्त तत्त्व आहे का याचा शोध घेते. भारतीय परंपरेत तत्त्वज्ञानाच्या ज्या निरनिराळ्या प्रणाली विकसित झाल्या, त्यांना 'दर्शन' असे म्हटले जाते. या 'दर्शन' शब्दातूनही जीवनाच्या सर्व अंगांचे समग्रतेने झालेले आकलन हाच अर्थ सूचित केला जातो. अशी अनेक दर्शने या परंपरेत निर्माण झाली आहेत.

तत्त्वज्ञानाला इंग्रजीमध्ये Philosophy असा मूळ ग्रीक भाषेतून आलेला शब्द वापरतात. या शब्दातील Philo म्हणजे प्रेम आणि Sophia म्हणजे शहाणपण. त्यामुळे Philosophy म्हणजे शहाणपणाचे प्रेम. शहाणपण म्हणजे बुद्धी नव्हे.

बुद्‌धी हे ज्ञानाचे साधन आहे. शहाणपण म्हणजे ज्ञानही नव्हे. बुध्दीमान किंवा खूप ज्ञान असलेली माणसेही शहाणी असतातच असे नाही. विनाशकारी शस्त्रे तयार करण्यासाठी खूप बुद्‌धीची आणि ज्ञानाची गरज असते. पण असे करणे शहाणपणाचे ठरत नाही. शहाणपण आपल्या वागण्याशी, कृतींशी संबंधित असते. शहाणपणात परिस्थितीचे भान असते, नीतिमत्तेची जाण असते. तत्त्वज्ञ असे शहाणपण मिळवायला धडपडतात. आपले स्वतःचे, आपल्या कुटुंबाचे, समाजाचे आणि सगळ्याच सृष्टीचे जीवन चांगले, सुंदर करण्यासाठी असे शहाणपण गरजेचे नाही, असे कुठला 'शहाणा' म्हणेल?

**चला लिहूया!**

काही तत्त्वचिंतकांनी/तत्त्वज्ञांनी केलेल्या तत्त्वज्ञानाच्या व्याख्या खाली दिल्या आहेत, अशा अन्य तत्त्वज्ञांनी केलेल्या व्याख्या शोधून लिहा.

(१) तत्त्वज्ञान हे कुतुहलाचे अपत्य आहे. – प्लेटो

(२) (आजवर) तत्त्वज्ञांनी जगाचा विविध प्रकारांनी अर्थ लावला आहे. परंतु, खरा मुद्‌दा जग बदलण्याचा आहे. – कार्ल मार्क्स

(३) विचार तार्किकदृष्ट्या सुस्पष्ट करणे हे तत्त्वज्ञानाचे उद्‌दिष्ट असते. तत्त्वज्ञान म्हणजे काही सिद्‌धान्तांचा संग्रह नव्हे, ती एक कृती आहे. – लुडविग विटगेनस्टाईन

(४) तत्त्वज्ञान परिचित वस्तूंमधील अपरिचित बाजू दाखवून आपली जिज्ञासेची जाणीव जिवंत ठेवते. – बर्ट्रांड रसेल

सुरूवातीला पाहिलेल्या व्याख्या या 'तत्त्वज्ञान' आणि 'Philosophy' या शब्दांचा उगम कुठल्या मूळ शब्दांमधून होतो, ते पाहून त्याआधारे मांडलेल्या आहेत. त्यापलीकडे जाऊन तत्त्वज्ञानाच्या काही व्याख्या सांगितल्या गेल्या आहेत. अशा एका व्याख्येनुसार तत्त्वज्ञान हा सर्व विश्वाचा, जीवनाचा साकल्याने किंवा समग्रतेने; विचार, अभ्यास करणारा विषय आहे. जीवनाचे कुठलेही क्षेत्र या अभ्यासाला वर्ज्य नाही. सहसा विज्ञानाच्या विशिष्ट शाखा, जगाच्या ठराविक विशिष्ट पैलूंचा अभ्यास करतात. सामाजिक विज्ञान समाजाचा अभ्यास करते, तर जैवविज्ञान सजीवांचा अभ्यास करते. भौतिक विज्ञान जड-द्रव्याचा (matter) अभ्यास करते. तत्त्वज्ञानाला मात्र जे जे अस्तित्वात आहे ते सगळेच संपूर्णपणे समजून घ्यायचे असते. यासाठी विज्ञान जी गृहीते मान्य करते, त्यांच्याबद्‌दलही तत्त्वज्ञान प्रश्न निर्माण करते. तत्त्वज्ञान म्हणजे बुद्‌धीचा चिकित्सक वापर करून घेतलेला शोध ही व्याख्या तत्त्वज्ञानाचे हे कार्य अधोरेखित करते. विज्ञान कितीही प्रगत असले तरी काही विधाने सत्यच आहेत, असे गृहीत धरूनच ते पुढे जात असते, म्हणजे त्या विधानाविषयी शंका किंवा प्रश्न उपस्थित करत नाही. गृहीतांचे काम एखाद्या इमारतीच्या पायाप्रमाणे असते. पायाच्या आधारेच इमारत उभी असते. इमारत कितीही सुंदर असली, भक्कम वाटली तरी तिचा पाया कमकुवत असेल तर छोट्या कारणानेही डळमळतो आणि पूर्ण इमारतच खचू शकते. त्यामुळेच जी गृहीते मानून विज्ञानाचा डोलारा उभा राहतो, त्या गृहीतांचीही तपासणी करणे तत्त्वज्ञान आवश्यक मानते.

वरवर पाहता, तत्त्वज्ञान हा विषय अवघड वाटला, तरी खरे तर त्यासाठी लागणारी साधनसामग्री तर आपल्या सगळ्यांकडेच आहे. आपण सगळेच बुद्‌धी असलेले, प्रगत जाणीव असलेले प्राणी आहोत. आपल्या अवती-भवती काय आहे, काय-काय घडते यांबद्‌दल आपल्याला खूप कुतूहल वाटत असते. आपल्या जीवनाचे ध्येय काय असावे? आपण सुखी कसे होऊ? सुख म्हणजे काय? चांगले जीवन म्हणजे काय असे प्रश्न आपल्यालाही पडतात आणि आपल्या परीने आपण त्यांची उत्तरे शोधतो, मिळालेली उत्तरे तपासूनही बघतो. उत्तरे

मिळण्याइतकेच प्रश्न विचारणे महत्त्वाचे असते. कारण प्रश्नच विचारले नाहीत, तर उत्तरे कशाची शोधणार? आपल्या प्रश्न विचारण्याच्या, उत्तरे शोधण्याच्या उपजत प्रवृत्तीला तत्त्वज्ञानाचा अभ्यास शिस्त लावतो. आपल्याच प्रश्नांचा अर्थ आपल्याला नीट समजावून सांगून उत्तरे शोधण्याची दिशा दाखवतो. तत्त्वज्ञानात चिकित्सेवर जो भर असतो, त्यामुळे विचार न करता, परीक्षण न करता कुठलेही मत किंवा तत्त्व आपण स्वीकारत नाही. त्यामुळे आपली दिशाभूल होणे टळते. स्वतःचे मत अभ्यास करुनच मांडावे आणि इतरांच्या मतांचा आदरपूर्वक विचार करून मगच त्याबद्दल बोलावे हे भान आपल्याला तत्त्वज्ञान देते. बौद्धिक आळस आणि बौद्धिक अरेरावी अथवा उर्मटपणा हे दोन्ही अत्यंत धोकादायक असतात. ते टाळण्याचे सामर्थ्य तत्त्वज्ञान देते. या सगळ्यांचा परिणाम अर्थातच वैयक्तिक आणि सामाजिक पातळीवर जगताना होतो. आपले निसर्गाशी, समाजाशी आणि स्वतःशीही काय प्रकारचे नाते असते याचे भानही तत्त्वज्ञान देते. तसेच ते कसे असावे यासंबंधी मोलाचे मार्गदर्शनही त्यातून मिळते. या सगळ्यांमुळे चांगले जीवन जगण्याच्या आपल्या धडपडीत तत्त्वज्ञान आपल्याला अत्यंत मोलाची मदत करते.

चला, तर मग आपण आणखी अभ्यास करूया तत्त्वज्ञानाचा!

## शब्दसूची

पुराकथा – Mythology
व्यवस्था – Order / System
सृजनशक्ती – Creativity
तथ्ये – Facts
संवाद – dialogue
वाद – debate
अमूर्त – abstract
तत्त्व – Principle
सारतत्त्व – Essence
जडद्रव्य – Matter/material substance
विश्लेषण– Analysis
विश्लेषणवादी – Analytic
वाद पद्धती – Method of debate
युक्तिवाद – Argument
द्वंद्वविकास पद्धती – Method of dialectics

## स्वाध्याय

**प्र.१ कंसातील योग्य पर्याय निवडून पुढील विधाने पूर्ण करा.**

(अ) थेलिसच्या मते........... हे अंतिम तत्त्व आहे. (वायू, पाणी, संख्या)

(ब) विज्ञानाची उभारणी ............ आणि ............ या दोन स्तंभावर होते. (अनुभव, कथा, बुद्धी, श्रद्धा)

(क) भारतीय आणि पाश्चात्त्य या दोन्ही परंपरांमध्ये ............ या पद्धतींचा वापर झाला. (खंडन-मंडन, संवाद, विश्लेषण)

(ड) ॲनक्सिमिनस च्या मते ............ हे अंतिम तत्त्व आहे. (असीम, अणू, वायू)

(इ) एकाच प्रकारच्या अनेक वस्तूंमध्ये एक समान तत्त्व असते, त्याला ............ असे म्हणतात. (विशिष्ट, तत्त्व, सारतत्त्व)

(फ) हार-जितीच्या उद्देशाने होणाऱ्या चर्चेला ............ असे म्हणतात. (जल्प, वाद, वितंड)

**प्र.२ गटातील वेगळा शब्द/जोडी ओळखून लिहा.**

(अ) संवाद, वाद, विश्लेषण, मूल्यमापन.

(ब) अग्नी, पाणी, पर्वत, वायू.

(क) शिष्य, वादी, प्राश्निक, प्रतिवादी.

**प्र.३ खालील शब्दसमूहासाठी वापरण्यात येणाऱ्या तत्वज्ञानातील पारिभाषिक संज्ञा लिहा.**

(अ) मत न मांडता प्रतिपक्षाच्या मताविरुद्ध केलेला युक्तिवाद.

(ब) दोन विरोधी मतांच्या विचारसंघर्षातून तिसरा अधिक योग्य व प्रगत विचार मांडण्याची पद्धती.

(क) संकल्पनांचे विश्लेषण करण्याची पद्धत.

(ड) मत, विचार, संकल्पना यांचे परीक्षण आणि मूल्यमापन.

(इ) ज्यात केवळ ज्ञान किंवा बुद्धी नसून नीतिमत्तेचीही जाण असते ते.


**प्र.४ फरक स्पष्ट करा.**

(अ) तत्वज्ञान आणि विज्ञान.


(ब) वाद आणि जल्प

**प्र.५ संकल्पना चित्र/तक्ता/ओघतक्ता पूर्ण करा.**


(अ) खंडनमंडन प्रक्रिया



(ब)




(क)




**प्र.६ टीपा लिहा.**

(अ) तत्वज्ञानाची वैशिष्ट्ये

(ब) विश्लेषण पद्धती

(क) संवाद पद्धती

**प्र.७ पुढील प्रश्नांची २० ते २५ शब्दांमध्ये उत्तरे लिहा.**

(अ) तत्वज्ञान म्हणजे काय?

(ब) द्वंद्वविकास पद्धती म्हणजे काय?

(क) सारतत्व म्हणजे काय?

(ड) शहाणपणामध्ये काय अंतर्भूत आहे?

(इ) कोणत्या गोष्टींवर श्रद्धा ठेवावी असे धर्म सांगतो?

(फ) कलेची वैशिष्ट्ये काय आहेत?

(ग) माणसाच्या चौकस बुद्धीचा आविष्कार कशा प्रकारे होतो?

**प्र.८ खालील विधानांचे उदाहरणासहित स्पष्टीकरण करा.**

(अ) ज्ञान मिळवण्यासाठी विज्ञान अनेक उपकरणांचा उपयोग करते.

(ब) चिकित्सा हा तत्वचिंतनाचा गाभा आहे.

**प्र.९ दीर्घोत्तरी प्रश्न.**

(अ) तत्वज्ञानाचे स्वरूप व्याख्यांच्या आधारे स्पष्ट करा.

(ब) तत्वज्ञानाच्या विविध पद्धती सांगून कोणत्याही दोन पद्धती स्पष्ट करा.

(क) विश्लेषण पद्धती स्पष्ट करून मैत्री/धर्म/समाज/सौंदर्य/श्रद्धा ही संकल्पना स्पष्ट करा.

**प्र.१० खालील तात्त्विक संकल्पना/समस्या/प्रसंग यांना उद्देशून संवाद लिहा.**

(अ) श्रद्धा आणि अंधश्रद्धा

(ब) न्याय म्हणजे काय?

(क) सद्गुण म्हणजे काय?

**उपक्रम**

तुमच्या शाळा/महाविद्यालयात शिक्षक दिनी गुरू-शिष्य संवादाचे नाट्यीकरण सादर करा. या निमित्ताने संवाद या तत्वज्ञान पद्धतीची ओळख तुमच्या सहाध्यायींना करून द्या.

***

# २. आहे काय? कळते कसे? करायचे काय?

२.१ तत्वज्ञान आणि संस्कृती
२.२ तत्वज्ञानाच्या मुख्य शाखा
२.३ भारतीय तत्वज्ञानाचे स्वरूप

**प्रस्तावना**

गणित, भूमिती, भौतिकशास्त्र अशा ज्या ज्ञानशाखांचे शिक्षण आपण घेतो, त्यांचा अभ्यासविषय; म्हणजे त्यामधील तत्त्वे, सिध्दान्त, संकल्पना इत्यादी देश, समाज, संस्कृती यांच्यानुसार बदलत नाहीत. त्रिकोणाच्या तीन कोनांची बेरीज भारतात जशी १८०° च असते, तशीच थायलंडमध्ये, मेक्सिकोत आणि फ्रान्समध्येही १८०° च असते. गुरुत्वाकर्षणाचा नियम सगळीकडे तोच असतो. तत्त्वज्ञानाचे एक वैशिष्ट्य म्हणजे त्याचे रूप ज्या समाजात, संस्कृतीत ते जन्म घेते, त्यानुसार काहीसे बदलते.

**चला पाहूया!**

काही चित्रे पाहू ज्यातून अनेक अर्थ उमगू शकतात.

म्हणूनच तत्वज्ञानाचा अभ्यास करताना भारतीय, पाश्चात्त्य, आफ्रिकन, चिनी तत्वज्ञान असे त्याचे वेगवेगळे प्रकार समोर येतात. ज्याप्रमाणे संगीताला वैश्विक भाषा म्हटले जाते, पण संगीत काळ, प्रदेश, संस्कृतीनुसार बदलते, त्याप्रमाणे! माणसाच्या उपजत गरजा, प्रेरणा सगळीकडे सारख्याच असल्या तरी त्यांची पूर्ती वेगवेगळ्या परिस्थितींमध्ये वेगवेगळ्या प्रकारे होते, त्याप्रमाणे! जगाबद्दल माणसाला वाटणारे कुतूहल, त्याला पडणारे प्रश्न हे सर्व ठिकाणी तसे सारखेच असतात.

**चला ऐकूया!**

वेगवेगळ्या प्रदेशांमध्ये, संस्कृतीमध्ये प्रचलित असलेली गाणी ऐका.

**चला बोलूया!**

समाज व संस्कृतीनुसार बदलणारे आविष्कार अशा उदाहरणांची चर्चा करा.

उदा., गहू हे एकच धान्य आहे. पण कुठे त्याची पोळी/चपाती होते, कुठे नान तर कुठे ब्रेड होतो.

पण त्यांचे स्वरूप आणि त्या प्रश्नांना दिली गेलेली उत्तरे स्थळ - काळ - परिस्थितीनुसार बदलत असतात. याबाबतीत तत्त्वज्ञानाचे साम्य विज्ञानापेक्षा कलांशी अधिक आहे. कलांप्रमाणेच तत्त्वज्ञानाचे संस्कृतीशी जवळचे नाते असते. मानव्यविद्यांतील इतर शाखांप्रमाणेच संस्कृतीच्या भूमीत तत्वचिंतनाची पाळेमुळे रुजलेली असतात.

विचार करण्याच्या प्रक्रियेतून तत्त्वज्ञान निर्माण होते. आपल्याला जगताना येणारे सगळ्या प्रकारचे अनुभव हा या विचारांना लागणारा जणू कच्चा माल असतो. विचार त्या कच्च्या मालावर प्रक्रिया करतात आणि त्यामधून तत्त्वज्ञान तयार होते. आपल्या भोवतालचा निसर्ग, समाज आणि आपले मानसिक विश्व हे आपल्या अनुभवाचे विषय असतात. माणूस म्हणून हा अनुभव घेण्याच्या क्षमता या सगळ्या माणसांमध्ये सर्वसाधारणपणे सारख्याच असतात. पण सभोवारचे नैसर्गिक आणि सामाजिक पर्यावरण वेगवेगळे असते. भौगोलिक आणि ऐतिहासिक संदर्भ वेगळे-वेगळे असतात. त्यामुळे वेगवेगळ्या जागी, वेगवेगळ्या काळात माणसांना येणाऱ्या अनुभवांचा रंग, आकार, पोत निरनिराळा असतो. साहजिकच त्या अनुभवांचा अर्थ लावणारे, त्यामधून आपल्या बाहेरचे आणि आतले जग जाणून घेणारे तत्त्वज्ञानही वेगवेगळे होते.

## २.१ तत्वज्ञान आणि संस्कृती

प्रत्येक संस्कृती माणसाला एक जीवनदृष्टी देत

## मानव्यविद्या

माणसाची चौकस बुद्धी आणि त्याच्या गरजा यांमधून ज्ञानाच्या अनेक शाखा विकसित झाल्या आहेत. या ज्ञानशाखांचे किंवा अभ्यासक्षेत्रांचे ढोबळमानाने वर्गीकरण आकारिक विज्ञान, निसर्गविज्ञान, समाजविज्ञान आणि मानव्यविद्या या प्रकारांमध्ये केले जाते. गणित, तर्कशास्त्र यांना आकारिक विज्ञान म्हटले जाते. भौतिक विज्ञान, भूगर्भशास्त्र, अवकाश विज्ञान, रसायनशास्त्र अशा भौतिकविज्ञान शाखा आणि जीवशास्त्र, प्राणिशास्त्र, वनस्पतिशास्त्र अशा जैवविज्ञान शाखा यांचा समावेश निसर्गविज्ञानात होतो. अर्थशास्त्र, राज्यशास्त्र, मानसशास्त्र, समाजशास्त्र इत्यादींना सामाजिक विज्ञान म्हटले जाते. तत्त्वज्ञानाचा समावेश साहित्य, भाषा, भाषाशास्त्र यांच्याबरोबर मानव्यविद्यांमध्ये होतो. नावावरूनच लक्षात येते त्याप्रमाणे माणसाचे अनुभवविश्व, मानवी समाज आणि संस्कृती यांचा अभ्यास या ज्ञानक्षेत्रात केला जातो. या दृष्टीने समाजविज्ञान आणि मानव्यविद्यांमधे साम्य आहे. पण मानव्यविद्यांची पद्धती सामाजिक विज्ञानांप्रमाणे अनुभवाधारित नसते. त्यांची पद्धत तर्काधारित आणि चिकित्सक असते. विज्ञानाच्या कक्षेत अजून पूर्णपणे न आलेल्या, पण मानवी जीवन समजून घेण्यासाठी महत्त्वाच्या असलेल्या विषयांचा विचार त्यांमध्ये केला जातो. स्वआकलन, संप्रेषण, चिकित्सक विचार, मूल्यमापन, बहुसांस्कृतिक जाणिवा, कलाविषयक आणि सौंदर्यविषयक जाणिवा, नागरिकत्वाच्या जबाबदाऱ्या, नैतिक संवेदनशीलता अशा अनेक विषयांचा ऊहापोह त्यांमध्ये होतो. त्यामुळे 'माणूस' असणे म्हणजे नक्की काय? मनुष्यत्वाचे विशेष कोणते? माणसाच्या अनुभवांचा अर्थ कसा लावावा, त्यांचे विश्लेषण कसे करावे? यांसारख्या अनेक प्रश्नांच्या उत्तराच्या दिशा सापडतात. मानव्यविद्यांच्या अभ्यासाने सर्व ज्ञानक्षेत्रात जरुरी असणाऱ्या, तसेच वैयक्तिक आणि सामाजिक पातळीवर चांगले जीवन जगण्यासाठी आवश्यक असणाऱ्या कौशल्यांचा आणि क्षमतांचा विकास होतो. असा अभ्यास व्यक्तिमत्त्व विकासासाठी अत्यंत उपयोगी ठरतो.

असते. ही जीवनदृष्टी माणसाचा निसर्गाशी, समाजाशी, ईश्वराशी काय संबंध आहे, प्रत्यक्ष जगताना त्यानुसार जीवन कसे जगावे याची एक आखणी करून देते. तत्त्वज्ञानाचा विकास त्या-त्या संस्कृतीत दिलेल्या जीवनदृष्टीच्या प्रभावाखाली होतो. कधी तत्त्वज्ञान त्या जीवनदृष्टीचा पुरस्कार करते, तर कधी विरोध करते. पण तत्त्वचिंतन हे एक प्रकारे या जीवनदृष्टीला दिलेला प्रतिसाद किंवा प्रतिक्रिया असते. काही संस्कृती, अनुभवाला येणाऱ्या जगाच्या पलीकडे एक पारलौकिक जग आहे, असे मानतात. या संस्कृतींमध्ये निर्माण होणारे तत्त्वज्ञान सहसा त्या दुसऱ्या जगाच्या संदर्भात या जगाचा विचार करते. त्या अनुसारच कसे जगावे यासंबंधी तत्त्वज्ञान मार्गदर्शन करते. ईश्वर कल्पना अनेक संस्कृतीत आढळते, पण ईश्वराची संकल्पना मात्र संस्कृतीनुरूप, काळानुरूप बदलते. प्राचीन ग्रीक ईश्वर कल्पना, ख्रिश्चन धर्मातील ईश्वर संकल्पनेपेक्षा खूप वेगळी आहे. त्यामुळे ख्रिस्तपूर्व पाश्चात्त्य तत्त्वज्ञानात ईश्वर संकल्पनेचे स्थान मध्यवर्ती नाही, पण ख्रिस्तानंतरच्या तत्त्वज्ञानात मात्र ती संकल्पना तत्त्वचिंतनासाठी सगळ्यात महत्त्वाची ठरते.

**चला बोलूया!**

खालील विषयांवर गटांत चर्चा करा.

- विविध ईश्वर संकल्पना
- संतांची लक्षणे

सामाजिक-राजकीय परिस्थितीचे प्रतिबिंबही

विशिष्ट काळाच्या तत्त्वचिंतनात दिसते. उदाहरणार्थ, राजकीयदृष्ट्या अस्थिर काळात, युद्धकालीन परिस्थितीत विश्वाचे किंवा ज्ञानाचे स्वरूप यांसारख्या अमूर्त प्रश्नांपेक्षा माणसांनी इतर माणसांशी कसे वागावे, कुठली मूल्ये जोपासावीत, या प्रकारचे जगण्याशी साक्षात संबंध असलेले प्रश्न तत्त्वज्ञानासाठी जास्त महत्त्वाचे ठरतात. विसाव्या शतकात दोन महायुद्धांचे विदारक परिणाम भोगणाऱ्या युरोपमध्ये मानवी अस्तित्वाचा अर्थ काय? जीवनाला काही उद्दिष्ट आहे का? ते कोणी दिले? यांसारखे प्रश्न अस्तित्ववाद या नावाने ओळखल्या जाणाऱ्या तत्त्वप्रवाहाने निर्माण केले.

**भारतीय परंपरेतही तत्त्वज्ञान आणि ऐतिहासिक परिस्थिती यात आपल्याला असे सहसंबंध आढळून येतात**

एखाद्या प्रदेशाच्या राजकीय आणि सामाजिक इतिहासाचा प्रभाव त्या प्रदेशातील विशिष्ट काळातील तत्त्वचिंतनावर कसा पडतो याचे एक उदाहरण म्हणजे मध्ययुगीन काळात भारतात झालेला भक्तिसंप्रदायाचा उगम आणि विकास. राजकीय अस्थैर्य, सामाजिक विषमता यांनी त्रासलेल्या; शिक्षणापासून, प्रतिष्ठेपासून वंचित राहिलेल्या जनसामान्यांना दिलासा देण्याचे, त्यांचा आत्मसन्मान जागृत करण्याचे महत्त्वाचे कार्य भक्तिसंप्रदायाने केले. ईश्वर, धर्म, अध्यात्म यांसंबंधीचा विचार लोकांच्या भाषेत मांडून भारतीय विचार परंपरा भक्तिमार्गी संतांनी सर्वांना उपलब्ध केली. एवढेच नव्हे, तर काळाच्या ओघात या परंपरेत कर्मकांडाला आलेले अवाजवी महत्त्व, त्यामध्ये समाविष्ट झालेल्या अनिष्ट रूढी, अंधश्रद्धा यांची या तत्त्वज्ञानाने कठोर चिकित्सा केली. ईश्वर आणि भक्त यांच्यामध्ये कुठल्याही मध्यस्थाखेरिज साक्षात संबंध असतो असे प्रतिपादन केले. ईश्वरभक्ती आणि शुद्ध नैतिक आचरण यांची सांगड घालून समाजव्यवहार सुधारण्याचा प्रयत्न केला. संतांचे तत्त्वज्ञान हे फक्त अमूर्त चिंतन न राहाता प्रत्यक्ष जगण्यासाठी रोजच्या व्यवहारातही मार्गदर्शक ठरले.

महाराष्ट्रापुरता विचार करायचा झाला तरी ज्ञानेश्वरांपासून सुरू झालेली संतपरंपरा आपल्याला विसाव्या शतकापर्यंत अबाधित राहिलेली दिसते. सगळ्या लोकांना समजायला सोपे व्हावे म्हणून लोकभाषेबरोबर संतांनी अभंग, भारुडे, गवळणी अशा साहित्य प्रकारांचा उपयोग आपले तत्त्वज्ञान मांडण्यासाठी केला. भजन, कीर्तनांमधून समाजप्रबोधन केले. ज्ञानेश्वरांनी आपला चिद्विलासवाद मांडताना 'हे विश्वची माझे घर' अशी उद्घोषणा केली. नामदेवांनी पंजाबपर्यंत जाऊन तिथल्या भाषेत अभंगरचना करून वेगवेगळ्या प्रांतांतील भक्ती परंपरेची एकात्मता अधोरेखित केली. समर्थ रामदास आणि तुकोबा यांनी खरीखुरी ईश्वरनिष्ठा आणि सगळ्या जीवांप्रतीचे प्रेम यांत अंतर नाही हे अगदी रोखठोक भाषेत सगळ्यांना समजावून सांगितले. एकनाथांनी संसारातले दाखले देत लोकांना अध्यात्माची, नीतीची शिकवण दिली. गाडगेबाबा आणि तुकडोजी महाराजांनी तत्त्वज्ञानाला आधुनिक काळाला सुसंगत असा सामाजिक आशय देऊन मोठ्या प्रमाणावर जनजागृती केली. काळाचे, परिस्थितीचे भान ठेवून विकसित होणारे असे तत्त्वज्ञान जीवनाच्या अनेक क्षेत्रांत खूप उपयुक्त ठरते.

ब्रिटिश राजवटीच्या प्रस्थापनेनंतर विशेषतः १९ व्या शतकात भारतात जे राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक बदल झाले ते तुम्ही इतिहासात अभ्यासलेच आहेत. या सगळ्या बदलांचा परिणाम म्हणून या कालखंडात फार मोठ्या प्रमाणावर वैचारिक घुसळण झाली. परकीय राज्यव्यवस्था, समाजव्यवस्था, मूल्यव्यवस्था, विचारपद्धती आणि

विचारप्रणाली यांनी भारतीय परंपरेसमोर आव्हान उभे केले. या आव्हानाला तोंड देताना भारतीय विचारवंतांनी त्या काळातील समस्या, गरजा यांच्या संदर्भात परंपरेचा नव्याने सखोल अभ्यास केला. या परंपरेतील ग्राह्य विचार, मूल्ये कोणती आणि त्याज्य विचार किंवा मूल्ये कोणती यांची चिकित्सा केली. परंपरा आणि नवतेचा योग्य मेळ घालण्याचा प्रयत्न केला. भारतीय समाजजीवनात धर्माला मध्यवर्ती स्थान असल्यामुळे या काळातील तत्त्वचिंतनात धर्मचिकित्सेला महत्त्व आले. पुन्हा एकदा कर्मकांड, अंधश्रद्धा, अनिष्ट प्रथा यांचा समाजमनावरचा प्रभाव कमी करून धर्माचे खरे स्वरूप शोधण्याचा प्रयत्न झाला. लोकमान्य टिळक, योगी अरविंद, महात्मा गांधी, आचार्य विनोबा यांसारख्या अनेकांनी भगवद्‌गीतेतील विचारांची आपापल्या दृष्टिकोनांतून पुनर्मांडणी केली. राजा राममोहन रॉय, न्यायमूर्ती महादेव गोविंद रानडे, स्वामी दयानंद सरस्वती यांसारख्या समाजसुधारकांनी समाजसुधारणेला परंपरेत आधार शोधला. विवेकानंदांनी व्यावहारिक वेदान्ताची मांडणी केली. गोपाळ गणेश आगरकरांनी बुद्धीप्रामाण्यवादाचा पुरस्कार केला, तर महात्मा फुले यांनी जातिभेदविरहित सार्वजनिकसत्यधर्माची स्थापना केली. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी बौद्ध परंपरेतील 'धम्म' या संकल्पनेचे सविस्तर विवेचन करून बौद्ध धर्माला नवसंजीवनी दिली. विज्ञानवादी दृष्टिकोनाचा स्वीकार करणाऱ्या मानवेन्द्रनाथ रॉय यांनी नवमानवतावाद या विचारसरणीची मांडणी केली. जीवनाबद्दलची कलावादी, सौंदर्यवादी दृष्टी जोपासतानाच रवीन्द्रनाथ टागोरांनी राष्ट्रवादाची चिकित्सा केली. तत्त्वज्ञानाच्या क्षेत्रातही पाश्चात्त्य तत्त्वपरंपरेचा परिचय झालेल्या तत्त्वज्ञांवर पाश्चात्त्य विचारसरणीचा प्रभाव पडला. मात्र त्याच वेळी गुरूदेव रा. द. रानडे, डॉ. राधाकृष्णन यांनी भारतीय आणि पाश्चात्त्य परंपरांचा तौलनिक अभ्यास करून भारतीय परंपरेची वैशिष्ट्ये जगासमोर आणली.

सध्याच्या काळानेही तत्त्वज्ञानापुढे नवीन आव्हाने उभी केली आहेत. मेंदूविज्ञान, बोधन-विज्ञान, कृत्रिम बुध्दीमत्ता, संपर्क माध्यमे अशा अनेक क्षेत्रांतील घडामोडींमुळे 'माणूस असणे म्हणजे नक्की काय?' या सत्तामीमांसेतील प्रश्नाकडे नव्याने पाहण्याची गरज निर्माण झाली आहे. त्याचबरोबर या क्षेत्रातील संशोधनामुळे आपल्याला ज्ञान नक्की कसे होते यावर नवा प्रकाश टाकला गेला आहे. हे संशोधन ज्ञानमीमांसेसाठी महत्त्वाचे आहे. आताच्या जगात एका बाजूला मोठी लोकसंख्या आहे तर दुसऱ्या बाजूला तंत्रज्ञानाच्या वापरामुळे बाजारात प्रचंड प्रमाणात वस्तू आणि सेवा विक्रीसाठी उपलब्ध आहेत. या दोन्ही घटकांचा प्रभाव पर्यावरणावर पडला आहे. त्यामुळे मानवजातीसमोर पर्यावरणीय संकट उभे राहिले आहे. या संकटाला सामोरे जाण्याच्या तत्त्वज्ञांच्या प्रयत्नांमधूनच 'पर्यावरणीय नीतिशास्त्र' नावाची नीतिशास्त्राची एक नवी उपशाखा काही दशकांपूर्वी उदयाला आली आहे.

**चला लिहूया!**

- सध्याच्या काळाने निर्माण केलेले प्रश्न लिहूया.

वेगवेगळ्या काळांत, वेगवेगळ्या ठिकाणी केल्या गेलेल्या तत्त्वचिंतनात फरक असले; तरीही वेगवेगळ्या संस्कृतींचा भाग असलेल्या तत्त्वचिंतनात महत्त्वाची साम्यस्थळेही असतातच. विचारवंतांना पडणाऱ्या प्रश्नांचे रूप संदर्भाप्रमाणे बदलत असले तरी मुळात प्रश्न बऱ्याच वेळा तेच असतात. आपण आधी पाहिल्याप्रमाणे तत्त्वज्ञानाचा आवाका खूप मोठा आहे. कुठलाच विषय तत्त्वज्ञानाला वर्ज्य नाही. त्यामुळे तत्त्वज्ञानात विचारल्या जाणाऱ्या प्रश्नांची

यादी भलीमोठी आहे किंवा खरे तर न संपणारी आहे. काही प्रश्न खूपच महत्त्वाचे आणि मध्यवर्ती आहेत. तसे पाहिले, तर अगदी रोजच्या जगण्याच्या खटाटोपात प्रत्येकालाच हे प्रश्न या ना त्या प्रकारे पडतच असतात. आपण ते आपल्या परीने, आपल्या पातळीवर कळत-नकळत सोडवतही असतो. तत्त्वज्ञान मात्र जाणीवपूर्वक, पद्धतशीरपणे विचार करून त्या प्रश्नांची उकल करण्याचा प्रयत्न करते. अशा तीन मुख्य प्रश्नांची ओळख आपण या पाठात करून घेऊ.

## २.२ तत्त्वज्ञानाच्या मुख्य शाखा

प्रत्येक जीवासाठी जगण्याची धडपड खूप महत्त्वाची असते. आपला जीव टिकवण्यासाठी अन्न मिळवणे, निवारा शोधणे, जोडीदाराची निवड करणे, स्वतःचे संरक्षण करणे यासाठीच्या प्रयत्नांमधून आपल्या व्यतिरिक्त या जगात काय-काय आहे याचे भान जीवाला येते. या प्राथमिक भानातूनच मनुष्य प्राण्याच्या अधिक उत्क्रांत झालेल्या बुद्धीला आपल्या या जगात काय-काय आहे याबद्दलचे एक निखळ कुतुहल वाटते. आपण एखादी वस्तू घेण्यासाठी समजा एखाद्या बाजारामध्ये गेलो, तर तिथे दिसणाऱ्या अनंत प्रकारच्या असंख्य वस्तू आपले लक्ष वेधून घेतात. मग त्या आपल्या गरजेच्या नसल्या तरी या बाजारामध्ये आहे तरी काय-काय याबद्दल आपल्याला खूप उत्सुकता वाटते आणि त्या उत्सुकतेपोटी खूप वेळ घालवून आपण अख्खा बाजार पालथा घालतो.



त्याचप्रमाणे केवळ आपल्या गरजा, प्रेरणा यांसाठी आवश्यक असणाऱ्या गोष्टींपलीकडे जाऊन एकंदरीतच या अफाट विश्वामध्ये नक्की काय-काय दडलय हे मानवी बुद्धीला जाणून घ्यावेसे वाटते. त्यातूनच एक दिसायला छोटासा पण मोठा आशय असलेला प्रश्न निर्माण होतो 'काय आहे'?

तुम्ही म्हणाल या प्रश्नाचे उत्तर सोपे तर आहे. डोळे, नाक, कान, जीभ, त्वचा या आपल्या ज्ञानेंद्रियांच्या अनुभवाला जे येते, ते सगळे 'आहे'. म्हणजे अस्तित्वात आहे. तसेच आपल्या मनाला ज्यांचा अनुभव येतो ते विचार, भावना, इच्छा, कल्पना इत्यादींनाही अस्तित्व आहे. पण थोडा विचार करून पहा. डोळ्यांना जे जे दिसते ते ते सगळे खरोखरच अस्तित्वात असते का? कावीळ झालेल्या माणसाला सर्व गोष्टी पिवळसर दिसतात. पण त्या खरे तर तशा नसतात. माणसांना अनेकदा वेगवेगळे भास होतात. भ्रम होतात. त्यांना भास किंवा भ्रम म्हणतानाच ज्या वस्तूंचे ते भास आहेत, त्या खऱ्या नाहीत हे आपण सांगत असतो. म्हणूनच तत्त्वज्ञानाला अस्तित्वाचा, जे सत् आहे, वास्तव आहे, त्याचा सखोल अभ्यास करण्याची गरज वाटते. तत्त्वज्ञानाची जी शाखा हा अभ्यास करते, तिला **सत्तामीमांसा** म्हटले जाते.

### भ्रम आणि भास

रोजच्या जीवनात बरेच वेळा आपण भ्रम आणि भास हे दोन शब्द समानार्थी असल्याप्रमाणे वापरतो. पण खरे म्हणजे त्यांच्यात सूक्ष्म असला तरी महत्त्वाचा फरक आहे. भ्रम होण्याची कारणे वैयक्तिक नसतात. ज्ञानेंद्रिये आपल्याला भौतिक जगाचा जो अनुभव देतात, तो परिस्थितीसापेक्ष असतो, परिस्थितीतील घटकांनुसार बदलतो, हे आपण पाहिलेच आहे. आपण आणि वस्तू यांच्यातील अंतर, प्रकाशाची उपलब्धता, वातावरणाची घनता या आणि अशा इतर घटकांच्या अनुभवावर परिणाम

झाल्यामुळे जेव्हा वस्तू असतात त्यापेक्षा वेगळ्याच असल्यासारख्या वाटतात, तेव्हा त्या अनुभवांना 'भ्रम' म्हटले जाते. प्रवासात असताना, एकमेकांना कायम समांतर असणारे रूळ दूर अंतरावर एकमेकांना चिकटल्यासारखे दिसतात हा भ्रम असतो. 'दुरून डोंगर साजरे' ही म्हणदेखील भ्रमाचेच उदाहरण देते. असे भ्रम ठरावीक परिस्थितीत सर्वांनाच होतात. भासांचे मात्र तसे नसते. भासांची कारणे भास होणाऱ्या व्यक्तीच्या शारीरिक, मानसिक परिस्थितीमध्ये अंतर्भूत असतात. खूप जास्त ताप आलेल्या व्यक्तीला कधी-कधी असे वाटते की कोणीतरी आपल्याशी बोलते आहे. मग आजारी व्यक्ती जी प्रत्यक्षात आलेलीच नाही, त्या व्यक्तीशी बोलायला लागते. कधी-कधी एखाद्याच्या जवळच्या आप्ताचा मृत्यू होतो आणि ती व्यक्ती शोकात बुडून जाते. सत्य स्वीकारायला तयार नसलेल्या मनाला मग मृत व्यक्ती आल्याचा, बोलल्याचा भास होतो.

थोडक्यात, म्हणजे वास्तव जसे आहे तसे न समजता वेगळेच वाटणे हे भ्रम आणि भास या दोन्हींमध्ये होते. मात्र, भ्रमाची कारणे सहसा बाह्य असतात, तर भासाची कारणे अंतर्गत असतात.

सत् म्हणजे ज्याला खरेखुरे अस्तित्व आहे ते. असे वास्तविक सत् आणि जे केवळ सत् भासते त्यातला फरक या शाखेसाठी महत्त्वाचा आहे. त्याचबरोबर सत्तामीमांसेत अनुभवाला येणाऱ्या अनेक तऱ्हांच्या वस्तू मुळात कशापासून निर्माण होतात? ज्या मूळ अस्तित्वापासून त्या निर्माण होतात, त्याचे/त्यांचे स्वरूप काय आहे? या मूलतत्त्वात बदल का आणि कसा होतो? असे अनेक वेधक प्रश्न विचारात घेतले जातात.

**माहीत आहे का तुम्हाला?**

मीमांसा हा संस्कृत शब्द मन्-मत या मूळ धातूपासून तयार झाला आहे. या धातूचा म्हणजे क्रियापदाचा अर्थ विचार करणे असा आहे. या धातूतील 'मन्' हा शब्द म्हणजे आपले अंतःकरण नव्हे. 'मन्' चा इथे अभिप्रेत असलेला अर्थ आहे परीक्षण करणे, शोध घेणे. तत्त्वज्ञान निरनिराळ्या विषयांचा असा शोध घेत असते. त्यामुळेच 'सत्' चा शोध घेणारी ती सत्तामीमांसा. 'ज्ञान' संकल्पनेचे परीक्षण करते ती ज्ञानमीमांसा, काय करावे, काय करू नये याचा विचार करणारी नीतिमीमांसा असे शब्द उपयोगात आणले गेले.

या सगळ्या प्रश्नांचा सविस्तर ऊहापोह करताना तत्त्वज्ञानाचा आणखी एक मूलभूत प्रश्न निर्माण होतो. काय आहे (किंवा काय नाही) ते आपल्याला कळते कसे? त्याचे ज्ञान कसे होते? कारण गंमत काय होते की, 'काय आहे' याचे उत्तर आपण आपल्या ज्ञानाच्या आधारे देतो. पण आधी पाहिल्याप्रमाणे काही वेळा जे आहे असे आपल्याला वाटते ते खरे म्हणजे नसते. उदा., मृगजळ म्हणजे खरे पाणी नसते.

**चला पाहूया!**

Optical illusion ची चित्रे पाहूया व त्यातील गोष्टींचे ज्ञान आपल्याला कसे होते हे वर्गात चर्चेतून समजून घेऊ.

म्हणजे पाणी दिसते आहे असे वाटते पण वस्तुतः ते नसते. म्हणजे आपल्याला येणारा प्रत्येक अनुभव आपल्याला ज्ञान देतोच असे नाही. कधी-कधी त्यामधून अज्ञानही निर्माण होते; त्यामधून आपली दिशाभूलही होते. मग आपल्याला जे आहे त्याचे ज्ञान झाले आहे असे खात्रीशीरपणे नक्की कधी म्हणता येईल? ज्ञान म्हणजे नक्की काय? त्याची व्याख्या काय? ज्ञान मिळवण्याची साधने कोणती? ज्ञानाचे प्रकार कोणते? हे सगळे प्रश्न समोर येतात.

या प्रश्नांचा अभ्यास करणाऱ्या तत्त्वज्ञानाच्या शाखेला **ज्ञानमीमांसा** या नावाने ओळखले जाते.

साधारणपणे आपल्याला सगळ्यांनाच जगाबद्दल कमी-जास्त का होईना, पण ज्ञान असते. जग आपल्याला कळू शकते असा विश्वास असतो. त्याचबरोबर जग काय आहे, त्यात काय-काय आणि किती प्रकारच्या गोष्टी आहेत, त्यांचा एकमेकांशी काय संबंध आहे, यासंबंधी आपल्या काही समजुती, धारणा असतात. आपले वागणे, जगणे याच समजुतींमधून आकाराला येते.

आपण आपल्या भोवतालच्या माणसांशी, सजीव-निर्जीव सृष्टीशी कसे वागावे? आपल्या कुठल्या कृती चांगल्या, कुठल्या वाईट असतात? कुठल्या योग्य, कुठल्या अयोग्य असतात यांचा विचार आपण आपल्या मूलभूत धारणांच्या आधारे करत असतो. सर्व जीवांना जगण्याचा हक्क आहे. कुठल्याही जीवाला विनाकारण दुखवू नये असे मानणारे कुठल्याही सजीवाला सहजासहजी इजा करत नाहीत. पण, 'माणूस हा सर्वश्रेष्ठ जीव आहे. म्हणून इतर जीवांचा वापर करून घेण्याचा त्याला हक्क आहे' अशी धारणा असणारे, स्वार्थासाठी इतर जीवांना इजा करताना त्यांची पर्वा करत नाहीत. या समजुती व्यक्तीप्रमाणे, संस्कृतीप्रमाणे, काळाप्रमाणे बदलत असल्या तरी सगळीच माणसे आपापल्या समजुती आणि त्यामधून निष्पन्न होणारी मूल्ये यांनुसार जीवन जगत असतात. माणसाचे जीवन फक्त वासना, प्रेरणा यांनी पूर्णपणे निर्धारित केलेले नसते. त्यामुळे त्याच्यापुढे कृतीचे वेगवेगळे पर्याय उपलब्ध असतात. या पर्यायांमधून त्याला सतत निवड करावी लागते. ही निवड करताना त्या कृतीचा व्यवहारातला उपयोग, त्यामधून फायदा होणार की तोटा एवढाच विचार न करता, ज्यांना आपण नैतिक मूल्ये मानतो त्यांचाही विचार करण्याची क्षमता माणसामध्ये असते. कृती चांगली की वाईट, योग्य की अयोग्य, न्याय्य की अन्याय्य या प्रकारचे मूल्यमापन माणसाला करता येते. तो ते करतही असतो.

**चला बोलूया!**

Think-pair-share (दोन विद्यार्थ्यांची कृती) दैनंदिन जीवनातील नैतिक निवडीची उदाहरणे घेऊन त्याची आपल्या सहाध्यायी विद्यार्थ्यांशी चर्चा करा.

**नीतिमीमांसा** म्हणून ओळखली जाणारी तत्त्वज्ञानाची शाखा या संकल्पनांचा, मूल्यांचा अभ्यास करते. नैतिक वागणे म्हणजे काय? नैतिक वर्तन का आवश्यक आहे? नैतिकदृष्ट्या 'चांगले' किंवा 'योग्य' या संकल्पनांचा नेमका अर्थ काय? माणसाने कसे वागावे? कसे जगावे? जगताना फक्त स्वतःचा विचार करावा की समाजाचा? का अखिल मानवजातीचा? का सर्व सजीवांचा? का सगळ्याच सृष्टीचा? यांसारख्या प्रश्नांचा ऊहापोह या शाखेत केला जातो.

**चर्चा करा!**



माणसाचा इतर सजीवांप्रति काय दृष्टिकोन असावा याची वरील चित्राला अनुसरून चर्चा करा.

थोडक्यात सांगायचे तर 'काय आहे?' 'ते कसे कळते?' आणि 'त्याचा माणसाच्या जगण्यावर, कृतींवर काय परिणाम होतो?' हे तत्त्वज्ञानात परंपरेने प्रमुख मानलेले तीन प्रश्न आहेत आणि त्यांमधून सत्तामीमांसा, ज्ञानमीमांसा आणि नीतिमीमांसा या तत्त्वज्ञानाच्या मुख्य शाखा निर्माण होतात. या शाखा

अलग असल्या तरी मुळात त्या एकाच ज्ञानक्षेत्राचा भाग आहेत. त्यामुळे त्यांचा परस्परांशी घनिष्ठ संबंध आहे. शाखा म्हणजे फांदी हे तुम्हाला माहीतच आहे. फांद्या वेगवेगळ्या असल्या तरी एकाच झाडाच्या असतात. तसाच तत्त्वज्ञानाच्या शाखांचा एकमेकांशी संबंध असतो हे लक्षात ठेवायला हवे.

## तर्कशास्त्र

सत्तामीमांसा, ज्ञानमीमांसा, नीतिमीमांसा या तीन शाखांखेरिज तर्कशास्त्र आणि सौंदर्यमीमांसा याही तत्त्वज्ञानाच्या प्रमुख शाखा मानल्या जातात. प्लेटोचा शिष्य ॲरिस्टॉटल या ग्रीक तत्त्वज्ञाला तर्कशास्त्राचा जनक मानले जाते. मध्ययुगीन काळावर त्याच्या तर्कशास्त्राचा खूप प्रभाव दिसतो. आधुनिक काळात ज्याला आकारिक तर्कशास्त्र म्हटले जाते, त्याचा विकास झाला. जुन्या काळात तर्कशास्त्राला 'विचारांच्या नियमांचे शास्त्र' असे म्हटले जाई. त्यानंतरच्या काळात असे लक्षात आले की, 'विचार करणे' या प्रक्रियेमध्ये लक्षात ठेवणे, कल्पना करणे वगैरे अनेक मानसिक प्रक्रियांचा समावेश होत असेल, तर तर्कशास्त्राची ही व्याख्या चुकीची ठरते. विधानांमधील परस्पर संबंध समजून घेऊन कुठल्या विधानांच्या आधारे काय अनुमान काढता येते किंवा त्या विधानांपासून कुठला निष्कर्ष निघतो याचा अभ्यास तर्कशास्त्रात होतो. त्यामुळे तर्कशास्त्राला तर्कप्रधान विचारांचे शास्त्र म्हटले गेले. विचार तर आपण सगळेच करतो. आपल्याला असलेल्या माहितीच्या किंवा ज्ञानाच्या आधारे निष्कर्षही काढतो. पण प्रत्येक वेळी आपली विचार करायची, अनुमान करण्याची पद्धत योग्य असतेच असे नाही. अनुमान करण्याच्या योग्य आणि अयोग्य पद्धती कोणत्या याचा अभ्यास तर्कशास्त्रात केला जातो. एकमेकांशी चर्चा करताना, कशावरून तरी हिरिरीने वाद घालताना आपण निरनिराळे युक्तिवाद करतो, दुसऱ्याने केलेल्या युक्तिवादांची तपासणी करतो. युक्तिवाद हे अनुमान करण्याच्या प्रक्रियेचेच रूप आहे. तर्कशास्त्राच्या अभ्यासाने तार्किकदृष्ट्या सुसंगत, सशक्त युक्तिवाद कसे करावेत, दुसऱ्यांच्या युक्तिवादातली विसंगती, तार्किक दोष कसे ओळखावेत याचे चांगले ज्ञान आपल्याला होते. तर्कशास्त्राचा अभ्यास तत्त्वज्ञानासाठी तर अतिशय उपयुक्त आहेच, पण ज्ञानाच्या प्रत्येक क्षेत्रासाठीही त्याचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. एवढेच नव्हे, तर रोजच्या जगण्यातही हा अभ्यास अतिशय मोलाचा ठरतो. माणूस हा विचार करणारा प्राणी आहे एवढेच नव्हे, तर विचार करायच्या पद्धतींचाही विचार करून त्यातली योग्य-अयोग्य पद्धत कोणती ते तो समजू शकतो. या आपल्या विचार क्षमतेचा पुरेपूर वापर करून घ्यायचा असेल, तर तर्कशास्त्र शिकले पाहिजे. जिथे-जिथे विचार आहे, तिथे-तिथे तर्कशास्त्राला स्थान आहे.

## सौंदर्यमीमांसा

'सौंदर्यमीमांसा' या नावावरूनच तुम्हांला हे लक्षात आले असेल, की यामध्ये सौंदर्याचा विचार केला जातो. सौंदर्य कोणाला मोहवत नाही? पण सौंदर्य नक्की कशात असते? सुंदर असणे म्हणजे नेमके काय? काही लोक म्हणतात त्याप्रमाणे सौंदर्य पहाणाऱ्याच्या दृष्टीत असते की ज्याला 'सुंदर' म्हटले जाते त्यामध्ये असते? हे प्रश्न तुम्हाला कधी पडतात का? या आणि अशा प्रश्नांचा विचार सौंदर्यमीमांसेत केला जातो. 'सौंदर्यमीमांसा' ही तत्त्वज्ञानाची एक स्वतंत्र शाखा म्हणून १८ व्या शतकात उदयाला आली असली, तरी सौंदर्यविषयक मोलाची चर्चा आपल्याला प्लेटो आणि ॲरिस्टॉटल

या गुरू-शिष्यांच्या जोडगोळीच्या तत्त्वज्ञानात वाचायला मिळते. या दोघांच्याही सौंदर्याबद्दलच्या विचारांना जोड मिळालेली आहे, ती त्यांच्या कलेविषयीच्या विचारांची! हे साहजिकच आहे, कारण सुंदरतेचा अनुभव आपल्याला फक्त निसर्गदृश्यांतच येतो असे नाही, तर अनेक कलाकृतींच्या आस्वादातही येतो. निसर्गात अनुभवाला येणारे सौंदर्य माणसाने निर्मिलेले नसते, पण कलाकृतींचा मात्र तोच निर्माता असतो. सौंदर्याचा फक्त आस्वादकच नव्हे, निर्माता हे माणसाचे एक विलोभनीय रूप आहे.

प्लेटो आणि ॲरिस्टॉटल हे दोघेही सौंदर्याला सुंदर वस्तूचा/कलाकृतीचा गुणधर्म मानत. म्हणजेच सौंदर्याचे अस्तित्व त्यांच्या मते कुठल्याही व्यक्तीवर, अनुभवावर अवलंबून नसते. वस्तूची रचना, त्यातील प्रमाणबद्धता यांसारख्या गुणांशी ते सौंदर्याची सांगड घालत. आधुनिक काळात मात्र सौंदर्य हा पूर्णपणे वस्तूचा गुणधर्म आहे हे नाकारण्याकडे तत्वज्ञांचा कल होता. काळाच्या ओघात सौंदर्यशास्त्रात अभ्यासल्या जाणाऱ्या 'सौंदर्य', 'उदात्तता' या संकल्पनांवरून अभ्यासकांचा रोख कलेचे स्वरूप, कलेचे प्रकार, कलेची कार्ये यांकडे वळला आणि या प्रकारच्या अभ्यासाला 'कलेचे तत्त्वज्ञान' म्हणून ओळखले जाऊ लागले. कलाकृतींचे मूल्य ठरवणारे निकष फक्त कलेसंबंधी असावेत, की कलेचे चांगल्या जीवनासाठी काय योगदान आहे यावर अवलंबून असावेत हा कलेच्या तत्त्वज्ञानातील एक मुख्य प्रश्न आहे. याचा उल्लेख 'कलेसाठी कला' की 'जीवनासाठी कला' या वादाच्या संदर्भात तुम्हाला कदाचित माहिती असेल.

भारतीय परंपरेत कला आणि सौंदर्य यांचा विचार करणारा मूलभूत ग्रंथ म्हणजे भरतमुनींनी लिहिलेले 'नाट्यशास्त्र' होय. 'रस' आणि 'भाव' या त्यातील प्रमुख संकल्पना आहेत. अभिनवगुप्त आणि आनंदवर्धन या दोघांनी भारतीय परंपरेतील सौंदर्यमीमांसेत महत्त्वाची भर घातली आहे. पुढच्या वर्षी आपण तत्त्वज्ञानाच्या या शाखेची आणखी चांगली ओळख करून घेऊ.

**चर्चा करा.**

'कलेसाठी कला आणि जीवनासाठी कला', 'सौंदर्य बघणाऱ्याच्या नजरेत असते.'

## २.३ भारतीय तत्त्वज्ञानाचे स्वरूप

वेगवेगळ्या प्रदेशांमध्ये/देशांमध्ये तत्त्वचिंतन झाले, त्या सर्वांमध्ये आधी उल्लेख केलेल्या प्रश्नांचा विचार केला गेलेला दिसतो, मात्र आधी पाहिल्यानुसार संस्कृती आणि काळानुसार त्यांचे स्वरूप आणि सुचवलेली उत्तरे काहीशी वेगवेगळी असतात. भारतीय तत्त्वज्ञानात या सगळ्या प्रश्नांचा विचार एकत्रितपणे केला गेला. त्यांना निरनिराळ्या शाखांचे स्वरूप मिळाले नाही. सगळ्या विश्वाचा, जगण्याचा साकल्याने केलेला विचार ही तत्त्वज्ञानाची जी व्याख्या आपण पाहिली आहे, त्या दृष्टिकोनाचा प्रभाव भारतीय तत्त्वचिंतनात जाणवतो. असेही म्हटले जाते की, भारतीय परंपरेत तत्त्वज्ञानाचा सांधा प्रत्यक्ष जगण्याशी, त्यातील प्रश्नांशी खूप घट्टपणे जुळला होता. त्यामुळे आपल्या जीवनाचे उद्दिष्ट काय? आपण जीवनात काय मिळवायचे असते? ते कसे मिळवावे? या प्रकारच्या प्रश्नांना इथे प्राधान्य दिले गेले. या प्रश्नांच्या संदर्भचौकटीतच सत्ताविषयक, ज्ञानविषयक, नीतिविषयक विचार मांडले गेले. अनेक भारतीय दर्शनांनी दुःखाच्या समस्येचे विवरण करून त्याचे प्रकार सांगितले, दुःखातून मुक्त होण्याचे मार्ग सुचवले. प्राचीन भारतीय समाजातील वर्णव्यवस्था, आश्रमव्यवस्था आणि पुरुषार्थविचार यांचा संदर्भ भारतीय तत्त्वचिंतन समजून घेण्यासाठी महत्त्वाचा ठरतो. त्याचप्रमाणे या तत्त्वचिंतनावर आत्मा, पुनर्जन्म, कर्मसिद्धान्त यांचाही मोठा प्रभाव जाणवतो.

त्यांतील नऊ दर्शने प्रमुख मानली जातात.

या दर्शनांचे वर्गीकरण आस्तिक आणि नास्तिक या दोन प्रकारांत केले जाते.

**भारतीय दर्शनांचा तक्ता**


आस्तिक दर्शन → न्याय, वैशेषिक, सांख्य, योग, मीमांसा, वेदांत

नास्तिक दर्शन → जैन, बौद्ध, चार्वाक

भारतीय तत्त्वज्ञानात वेद आणि उपनिषदांना खूप महत्त्व आहे. जी दर्शने वेदांमध्ये जे ज्ञान आहे ते प्रमाण मानतात, त्यांना आस्तिक दर्शने म्हणतात. पूर्वमीमांसा, उत्तरमीमांसा (वेदान्त), सांख्य, योग, न्याय आणि वैशेषिक ही सहा दर्शने आस्तिक आहेत, तर चार्वाक, जैन आणि बौद्ध ही तीन दर्शने नास्तिक म्हणजे वेदांचे प्रामाण्य न मानणारी आहेत.

या सर्व दर्शनांचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे ही दर्शने फक्त सत् म्हणजे काय? असत् म्हणजे काय? ज्ञानाची व्याख्या काय? साधने कोणती? अशा निव्वळ बौद्धिक प्रश्नांचीच चर्चा करत नाहीत, तर या चर्चेमधून जीवनाविषयीचा कुठला दृष्टिकोन योग्य आहे? जीवन कशासाठी आणि कशाप्रकारे जगावे याबद्दलही मार्गदर्शन करतात. ज्ञानाचा उपयोग चांगले जीवन जगण्यासाठी करण्यावर या परंपरेचा भर आहे.

तत्त्वज्ञानाच्या भारतीय परंपरेचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे तत्त्वज्ञानातील मूलभूत प्रश्नांना निरनिराळी, प्रसंगी परस्परविरोधी उत्तरे देणाऱ्या दर्शनांचा विकास एकानंतर एक असा कालक्रमाने न




प्राचीन भारतीय साहित्याची ऐतिहासिक कालरेषा

ही प्राचीन भारतीय साहित्याच्या रचनेची ऐतिहासिक कालरेषा आहे. कालरेषा म्हणजे साहित्यकृतीच्या रचनेचा काळ सर्वसाधारणपणे दाखवणारी रेषा. ही रेषा डावीकडून उजवीकडे अशी बघायची आहे. अनेकविध पुराव्यांच्या एकत्रित अभ्यासातून ही कालरेषा तयार केली आहे. संदर्भ – A History of Ancient & Early Medieval India by Upinder singh (2009)

होता, बऱ्याच अंशी एकाच वेळेस झाला. या दर्शनांमध्ये विचारांची देवाण-घेवाण होत असे. त्यासाठी आपण पूर्वी पाहिलेली 'वाद पद्धती' उपयोगात आणली जात होती, तशीच आपले मत ग्रंथात मांडताना आधी विरोधी मते मांडून, त्यांचे परीक्षण करण्याची पद्धतीही वापरली जात होती. त्यामुळे काही प्रमाणात तरी खुल्या मनाने, आदरपूर्वक विरोधी विचार ऐकण्याची/वाचण्याची आणि त्यांच्या अभ्यासातून आपली मते सुधारण्याची एक समृद्ध विचारपरंपरा इथे निर्माण होऊ शकली. विपुल सांस्कृतिक वैविध्य असणाऱ्या भारतीय परंपरेत अनेक वैविध्यपूर्ण तत्त्वप्रणालीही निर्माण झाल्या. यांपैकी काहींच्या अनुयायांची संख्या कमी असल्याने त्या मुख्य प्रवाहाचा भाग झाल्या नाहीत, तरीही टिकून राहिल्या.

पाश्चात्त्य तत्त्वज्ञानातील वेगवेगळ्या तत्त्व-प्रणालींचा उगम एकाच वेळी, एकत्र न होता, काळाच्या ओघात एकामागून एक झालेला दिसतो. जगताना येणाऱ्या व्यावहारिक अडचणी सोडवणे किंवा जीवनाच्या उद्दिष्टांबद्दल विचार करणे यांच्याही पलीकडे जाऊन जगाबद्दल जे निखळ कुतूहल असते, ते पाश्चात्त्य तत्त्वज्ञानाचे उगमस्थान आहे. त्यामुळे प्राचीन पाश्चात्त्य तत्त्वज्ञांनी मुख्यतः बुद्धीच्या जोरावर आपल्या अनुभवाला येणाऱ्या जगाचे स्वरूप शोधण्याचा खूप कसोशीने प्रयत्न केला. या काळातले तत्त्वज्ञान प्रामुख्याने सत्तामीमांसा करताना दिसते. खरे तर आरंभीच्या काळात तत्त्वज्ञानाच्या वेगवेगळ्या शाखा निर्माण झालेल्या नव्हत्या. ऐतिहासिक दृष्टीने पाहता, ग्रीक तत्त्वज्ञ ॲरिस्टॉटलने सर्वांत पहिल्यांदा ज्ञानाचे वेगवेगळ्या शाखांमध्ये वर्गीकरण केले. हे वर्गीकरण त्या त्या शाखेच्या अभ्यासविषयानुसार केले गेले. तत्त्वज्ञान हे सर्व ज्ञानशाखांचे उगमस्थान असल्यामुळे; ॲरिस्टॉटलने उल्लेख केलेल्या भौतिकशास्त्र, काव्यशास्त्र, तर्कशास्त्र, अधिभौतिकशास्त्र, नीतिशास्त्र या सगळ्या त्या काळात तत्त्वज्ञानाच्या शाखा मानल्या गेल्या. काळाच्या ओघात यातील अनेक शाखा (खास करून आज आपण ज्यांना निसर्गविज्ञान म्हणून ओळखतो त्या) स्वतंत्र ज्ञानशाखा म्हणून विकसित झाल्या.

**माहित आहे का तुम्हांला?**

ॲरिस्टॉटल नंतरच्या काळात ग्रीसमध्ये झालेल्या राजकीय उलथापालथींमुळे तत्त्वज्ञानाचा विकास खुंटला. एवढेच नव्हे तर, ग्रीक भाषेत लिहिलेले ग्रंथ लुप्त झाले. सुदैवाने यांपैकी बरेच ग्रंथ अरेबिकमध्ये भाषांतरित झाले होते, जतन केले गेले होते. नंतरच्या काळात या ग्रंथांची निरनिराळ्या युरोपीय भाषांमध्ये भाषांतरे झाली. मध्ययुगाकडून प्रबोधन काळाकडे युरोपचा जो प्रवास झाला, त्यासाठी या भाषांतरांचा मोठाच उपयोग झाला. मध्ययुगाच्या अखेरीस युरोपातील तत्त्वज्ञानावर ॲरिस्टॉटलच्या विचारांचा खूप मोठा प्रभाव होता.

ऐतिहासिक परिस्थितीनुसार तत्त्वज्ञानाच्या म्हणून समजल्या जाणाऱ्या शाखांचा विकास वेगवेगळ्या काळात, निरनिराळ्या प्रकारे झाला. त्यांमध्ये भर पडत गेली. उदाहरणार्थ, ख्रिश्चन धर्म युरोपमध्ये प्रस्थापित होण्याच्या काळात तत्त्वचिंतनाचा भर या जगाच्या स्वरूपावर न राहता ईश्वराचे स्वरूप, त्याचा जगाशी असलेला संबंध या प्रकारच्या प्रश्नांवर राहिला. आधुनिक विज्ञानाच्या विकासाच्या काळात तत्त्वचिंतनाचा रोख ज्ञान म्हणजे काय? ते मिळवण्याच्या खात्रीशीर पद्धती कोणत्या? त्यासाठी माणसाच्या कुठल्या क्षमता महत्त्वाच्या? अशा प्रकारच्या ज्ञानशास्त्रीय समस्यांकडे वळला.

भारतीय आणि पाश्चात्त्य परंपरांचा आपण उदाहरणादाखल वर एक धावता आढावा घेतला आहे. त्यावरून असे लक्षात येते की 'काय आहे?' 'कळते कसे?' 'करायचं कसे?' हे आणि या प्रकारचे प्रश्न सर्व काळाच्या, सर्व ठिकाणच्या तत्त्वज्ञानात या ना त्या प्रकारे विचारले जातात. यातल्या कुठल्या प्रश्नाला

प्राधान्य मिळेल? या प्रश्नांचा विचार कशा प्रकारे केला जाईल? त्याला कुठल्या प्रकारची उत्तरे दिली जातील हे मात्र ज्या संस्कृतीमध्ये, ज्या काळात ते तत्त्वज्ञान जन्म घेते त्याच्याशी मोठ्या प्रमाणात जोडलेले असते.

सांस्कृतिक जीवनदृष्टी तत्त्वज्ञानाच्या जडणघडणीतला महत्त्वाचा घटक असते, त्याचप्रमाणे तत्त्वज्ञान संस्कृतीचा महत्त्वपूर्ण घटक असते. तत्त्वज्ञान आणि संस्कृतीचे सहसंबंध असे दुहेरी असतात. वेगवेगळ्या संस्कृती समजून घेण्यासाठी, त्यामध्ये असलेल्या तत्त्वप्रणाली समजून घ्याव्या लागतात. आपल्यापेक्षा वेगळे असलेले तत्त्वज्ञान समजून घेण्याने आपले वैचारिक, सांस्कृतिक विश्व जास्त सकस, समृद्ध होते. माणसा-माणसांमधली सांस्कृतिक दरी कमी होते. आपण एकमेकांना अधिक चांगल्या प्रकारे समजावून घेऊ शकतो. एक चांगला मानवी समाज निर्माण करण्याचे स्वप्न जास्त डोळसपणे बघू शकतो.

जागतिकीकरणाच्या या काळात अशा प्रकारे जगातल्या अनेक तत्त्वप्रणाली जाणून घेण्यासाठी आपण आधी त्या सर्वांमध्ये आढळणाऱ्या मुख्य प्रश्नांचा थोडा सविस्तर परिचय क्रमाक्रमाने करून घेऊया.

### तत्त्वज्ञानाच्या इतर शाखा

तत्त्वज्ञान या विषयाचा आवाका किती मोठा आहे हे त्या विषयाच्या वेगवेगळ्या शाखा, उपशाखा यांची ओळख करून घेताना लक्षात येते. आपण आतापर्यंत पाहिलेल्या पाच शाखांखेरीजही तत्त्वज्ञानाच्या अनेक शाखा इतिहासाच्या ओघात निर्माण झाल्या. इतिहासात ज्याला आपण आधुनिकतेचा कालखंड म्हणतो, त्यामध्ये सर्व विचारांच्या केंद्रस्थानी 'माणूस' आला. आपला समाज, राज्यव्यवस्था हे आपण निर्मिलेले आहेत आणि आपण त्यांच्यामध्ये इष्ट त्या सुधारणा करू शकतो, हा विश्वास विचारवंतांना आला. यामधूनच सामाजिक तत्त्वज्ञान, राजकीय तत्त्वज्ञान, धर्माचे तत्त्वज्ञान यांसारख्या शाखांचा उदय झाला. १८ व्या शतकाच्या अखेरीस बदलत्या जागतिक प्रवाहांमुळे सामाजिक-राजकीय तत्त्वज्ञानाला नवा उजाळा मिळून समाजवाद, मार्क्सवाद यांना महत्त्व आले. विसाव्या शतकाच्या आगे-मागे तत्त्वज्ञानाचे स्वरूप बदलत गेले. भाषाविषयक विचारांना महत्त्व येत गेले, तसेच कुठल्याही ज्ञानशाखेचे स्वरूप मुळापर्यंत जाऊन समजून घेणे, त्या-त्या शाखांच्या पद्धतीशास्त्राचाही अभ्यास करणे हेही ही तत्त्वज्ञानाचे कार्य मानले गेले. त्यामुळे विश्लेषणवादी तत्त्वज्ञान, तार्किक प्रत्यक्षार्थवाद, मानसप्रत्ययशास्त्र फलतःप्रामाण्यवाद असे नवे प्रवाह निर्माण झाले. विसाव्या शतकातील राजकीय परिस्थिती, जागतिक महायुद्धे यांचा प्रभाव 'अस्तित्ववाद' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या तत्त्वप्रवाहावर मोठ्या प्रमाणात पडला.

विसाव्या शतकाच्या उत्तरार्धात निर्माण झालेल्या वेगवेगळ्या सामाजिक-राजकीय समस्यांचा ऊहापोह करण्यासाठी नीतिमीमांसेकडे वळण्याची तीव्र गरज वाटायला लागली. या गरजेतूनच पर्यावरणाची नीतिमीमांसा, वैद्यकीय नीतिमीमांसा, व्यवसाय नीतिमीमांसा, माध्यम नीतिमीमांसा अशा अनेक उपशाखा असलेली 'उपयोजित नीतिमीमांसा' ही तत्त्वज्ञानाची आजची अत्यंत महत्त्वाची शाखा जन्माला आली. त्याचबरोबर स्त्रीवाद, बहुसांस्कृतिकतावाद यांसारख्या विचारप्रवाहांचाही तत्त्वज्ञानात समावेश झाला.

थोडक्यात सांगायचे तर जीवनाच्या प्रत्येक क्षेत्राशी तत्त्वज्ञानाचा जवळचा संबंध आहे, प्रत्येक क्षेत्रात तत्त्वज्ञानाचे महत्त्वाचे योगदान आहे. तुम्हाला यांपैकी कुठल्याही क्षेत्रात रस असेल, तर

तत्वज्ञानाचा अभ्यास तुम्हाला त्या क्षेत्राच्या आकलनासाठी खूप मदत करेल. जीवनात पडणाऱ्या अनेक प्रकारच्या प्रश्नांना तत्वज्ञानामधून तुम्हाला मार्गदर्शन मिळू शकेल.

## शब्दसूची

**मानव्यविद्या** – Humanities
**पारलौकिक** – Transcendental
**अस्तित्ववाद** – Existentialism
**मेंदूविज्ञान** – Neuroscience
**बोधनविज्ञान** – Cognitive science
**कृत्रिम बुध्दीमत्ता** – Artificial intelligence
**संपर्कमाध्यमे** – Means of communication
**पर्यावरणीय संकट** – Environmental crisis
**पर्यावरणाचे नीतिशास्त्र** – Environmental ethics
**सत्** – Real
**धारणा** – Belief
**दर्शन** – A term referring to systems of Ancient Indian Philosophy
**आस्तिक** – Orthodox
**नास्तिक** – Heterodox
**काव्यशास्त्र** – Poetics
**तर्कशास्त्र** – Logic
**अधिभौतिकशास्त्र** – Metaphysics

## स्वाध्याय

**प्र.१ कंसांतील योग्य पर्याय निवडून पुढील विधाने पूर्ण करा.**

(अ) ........... हे आस्तिक दर्शन आहे.
(न्याय, जैन, चार्वाक)

(ब) ग्रीक तत्वज्ञ ........... याने सर्वप्रथम ज्ञानाचे वर्गीकरण केले.
(प्लेटो, सॉक्रेटिस, ॲरिस्टॉटल)

(क) ज्याला खरेखुरे अस्तित्व आहे त्याला ........... म्हणतात.
(असत्, भास, सत्)

(ड) भारतीय परंपरेत तत्वज्ञानाच्या ज्या निरनिराळ्या प्रणाली विकसित झाल्या, त्यांना ........... असे म्हटले जाते.
(सिद्धान्त, दर्शन, पुरुषार्थ)

(इ) तत्वज्ञानाच्या ........... या शाखेत कृती चांगली की वाईट याचे मूल्यमापन केले जाते.
(तर्कशास्त्र, ज्ञानमीमांसा, नीतिमीमांसा)

**प्र.२ गटातील वेगळा शब्द/जोडी ओळखून लिहा.**

(अ) अद्वैत, चार्वाक, सांख्य, न्याय.

(ब) संख्याशास्त्र, तर्कशास्त्र, भौतिकशास्त्र, काव्यशास्त्र.

**प्र.३ पुढील विधाने सत्य की असत्य हे सकारण सांगा.**

(अ) चार्वाक दर्शन वेदप्रामाण्य मानते.

(ब) ख्रिस्तपूर्व पाश्चात्त्य तत्वज्ञानात ईश्वर संकल्पनेचे स्थान मध्यवर्ती नाही.

(क) भारतीय दर्शनांनी दु:खाच्या प्रश्नाकडे दुर्लक्ष केले.

(ड) भारतीय दर्शने जीवनासंबंधी मार्गदर्शन करतात.

(इ) आधुनिक विज्ञानाच्या विकासाच्या काळात तत्वज्ञानाचा रोख ज्ञानशास्त्रीय समस्यांकडे वळला.

**प्र.४ खालीलसाठी वापरण्यात येणाऱ्या तत्वज्ञानातील पारिभाषिक संज्ञा लिहा.**

(अ) प्रत्येक समाजाची एक विशिष्ट जीवनदृष्टी.

(ब) सत्विषयी विचार करणारी तत्वज्ञानाची शाखा.

(क) वेदप्रामाण्य मानणारी दर्शने.

(ड) ज्ञानविषयक विचार करणारी तत्त्वज्ञानाची शाखा.

**प्र.५ फरक स्पष्ट करा.**

(अ) आस्तिक दर्शने आणि नास्तिक दर्शने.

**प्र.६ टीपा लिहा.**

(अ) भारतीय दर्शन परंपरा

(ब) सत्तामीमांसा

(क) ज्ञानमीमांसा

(ड) तत्वज्ञान आणि संस्कृती यांचा संबंध

**प्र.७ पुढील प्रश्नांची २० ते २५ शब्दांमध्ये उत्तरे लिहा.**

(अ) आस्तिक दर्शन म्हणजे काय सोदाहरण स्पष्ट करा.

(ब) नास्तिक दर्शन म्हणजे काय सोदाहरण स्पष्ट करा.

(क) मीमांसा या शब्दाचा अर्थ स्पष्ट करा.

(ड) सत् म्हणजे काय?

(इ) सध्याच्या काळात कुठल्या ज्ञानशाखांनी तत्वज्ञानापुढे नवीन आव्हाने निर्माण केली आहेत?

**प्र.८ खालील विधानांचे उदाहरणासहित स्पष्टीकरण करा.**


(अ) तत्वज्ञानाचे संस्कृतीशी जवळचे नाते असते.

(ब) तत्वज्ञानात चर्चिल्या जाणाऱ्या प्रश्नांची यादी खूप मोठी आहे.


**प्र.९ तत्वज्ञान या विषयाची वैशिष्ट्ये आणि त्याची व्याप्ती स्पष्ट करा.**

**प्र.१० संकल्पना चित्र/तक्ता/ओघ तक्ता पूर्ण करा.**

(अ)




(ब)




**उपक्रम**

एखाद्या तत्ववेत्त्याने तत्त्वज्ञानाची ओळख करून देण्यासाठी लिहिलेला लेख मिळवा व त्याचे प्रकट वाचन तुमच्या सहाध्यायींसह करा. त्यावर चर्चा करा.

***

# 3. 'दिसतं तसं नसतं'

३.१ दिसणे व असणे यांतील फरक
३.२ सत्‌चे स्वरूप आणि संकल्पना
३.३ नित्य व अनित्य यांतील फरक
३.४ ईश्वरवादी व निरीश्वरवादी तत्त्वज्ञान

## प्रस्तावना

या पाठाचे शीर्षक म्हणजे एक म्हण आहे हे तुमच्या लक्षात आलेच असेल. तुम्हाला वाटेल या तत्त्वज्ञानाच्या पुस्तकात म्हणींचे काय काम? हे काही भाषेचे पुस्तक नाही. पण तुमच्या कधी हे लक्षात आले आहे का, साध्या-सुध्या दिसणाऱ्या म्हणींमध्ये खूप अर्थ दडलेला असतो. अनेक वर्षांमध्ये एखाद्या समूहात जे शहाणपण गोळा होते, ते त्या समूहाच्या भाषेत म्हणींच्या रूपात व्यक्त होते. उदाहरण म्हणून आपण या तीन म्हणींचा विचार करू: "दिसते तसे नसते, म्हणून जग फसते." "चकाकते ते सर्व सोने नसते." "दुरून डोंगर साजरे." तुमच्या ध्यानात येते आहे का या सगळ्या म्हणी आपल्याला सावध करतात आणि सांगतात की तुम्हाला जग जसे दिसते आहे, तसेच आहे असे समजू नका, फसाल.



फूल कीटकाला दिसते तसे



फूल माणसाला दिसते तसे

**चला लिहूया!**

तुम्हाला माहिती असलेल्या म्हणी व त्याचा लाक्षणिक अर्थ सांगा/लिहा.

तत्त्वज्ञानाच्या भाषेत सांगायचे तर असे म्हणता येईल की, आपली पाच ज्ञानेंद्रिये आपल्याला आपल्या जगातल्या वस्तू, त्यांचे स्वरूप, गुणधर्म, त्यांच्यामधील परस्पर संबंध यांचे ज्ञान देतात ते खरेच, पण हे ज्ञान पूर्णपणे विश्वसनीय नसते. अनेक कारणांनी जग जसे प्रत्यक्षात आहे, त्याच्यापेक्षा वेगळेच भासते. हा अनुभव सगळ्याच माणसांना येतो, त्यामुळेच या म्हणी आपल्याला जणू सूचना करतात, की कशावरच डोळे झाकून विश्वास ठेवू नका. या सूचनेचे पालन आपण आपल्या परीने करतो, तरीही कधी ना कधी आपलीही फसगत

### शुक्तिरजत न्याय, रज्जूसर्प न्याय

भारतीय तत्त्वज्ञानात विशेषत: अद्‌वैत दर्शनात, 'दिसतं तस नसतं' या म्हणीचा प्रत्यय देणारी दोन उदाहरणे खूप प्रसिद्ध आहेत. एक म्हणजे शुक्तिरजत न्याय आणि दुसरे म्हणजे रज्जूसर्प न्याय. शुक्ति म्हणजे शिंपला, रजत म्हणजे चांदी. उन्हात चकाकणारा शिंपला लांबून पाहिला, तर तो चांदीचा तुकडा आहे असे वाटते, पण जवळ जाऊन पाहिले की मात्र तो शिंपला आहे हे कळते. त्याचप्रमाणे वेडीवाकडी पडलेली दोरी म्हणजे रज्जू दुरून बघितली तर साप आहे असे वाटून आपण घाबरतो. वास्तविक तो साप नाही, हे आणखी निरीक्षण केल्यावर लक्षात येते. या दोन्ही उदाहरणांमधून असे ध्यानात येते की, 'जे दिसते' त्याचे 'जे असते' याच्याशी असलेल्या साम्यामुळे आपली फसगत होते. शिंपल्याची चकाकी चांदीसारखी असते, तर दोरीचा वेडावाकडा आकार सापासारखा असतो. जगाचे खरेखुरे स्वरूप आपल्याला सहजपणे समजत नाही, त्यामुळे जगाचे ज्ञान होण्यात अडचण येते, हे स्पष्ट करण्यासाठी भारतीय परंपरेत ही उदाहरणे दिली आहेत.

होतेच.

जर शक्य असेल तर वर्गात जादूचे प्रयोग घडवून या पाठाचा विषय प्रवेश करावा.

कधी अंधाऱ्या जागी झाडांच्या फांद्यांचे चित्रविचित्र आकार आपल्याला अक्राळविक्राळ प्राणी वाटल्यामुळे आपण भेदरून जातो, तर कधी कृत्रिम फुलांना खरीखुरी समजून त्यांचा वास घ्यायचा प्रयत्न करतो. थोडक्यात काय, तर वास्तव आणि भास किंवा भ्रम यांच्यात फरक करता येणे ही आपली खूप महत्त्वाची गरज आहे.

चला बोलूया!

'दिसतं तसं नसतं' याच्या आपल्या अनुभवाला येणाऱ्या उदाहरणांची चर्चा करा.

## ३.१ दिसणे व असणे यांतील फरक

सर्व प्रश्नांचा मुळापासून विचार करू इच्छिणाऱ्या तत्त्वज्ञांसाठी साहजिकच हा फरक कसा, कशाच्या आधारे करायचा हा प्रश्न अतिशय महत्त्वाचा ठरतो. मागच्या पाठात आपण हे बघितलेच आहे की, या विश्वात काय अस्तित्वात आहे, म्हणजेच काय वास्तव आहे किंवा सत् आहे याचा अभ्यास सत्तामीमांसा या शाखेत केला जातो. यासाठी जे सत् म्हणजे खरोखरच अस्तित्वात आहे ते आणि जे सत् आहे असे फक्त वाटते, पण खरे तर अस्तित्वात नसते, या दोन्हींत फरक कसा करायचा हा प्रश्न खूप महत्त्वाचा असतो. सर्वसामान्य माणसेही हा फरक करत असतातच. तुम्हाला लहानपणी ऐकलेली, आपले प्रतिबिंब विहिरीच्या पाण्यात पाहून त्याच्यावर रागाने उडी मारून बुडणाऱ्या सिंहाची गोष्ट आठवते का? प्रतिबिंबाला खरे मानण्याची चूक आपण करत नाही. प्रतिबिंब असेल नाही तर सावली, त्यांचे अस्तित्व ज्या गोष्टीचे ते प्रतिबिंब किंवा सावली आहे, त्याच्यावर अवलंबून असते; तसेच आरसा किंवा पाणी, प्रकाश इत्यादींवरही अवलंबून असते. पण ती गोष्ट मात्र प्रतिबिंब किंवा सावली नाहीशी झाली तरी अस्तित्वात असतेच.

चला बोलूया!

सत्य आणि आभास यांत फरक/गोंधळ निर्माण करणाऱ्या कथा मिळवा व त्यांचे वर्गात कथा-कथन करा.

उदा., बिरबलाची कथा, ज्यात तो एकसारख्या दिसणाऱ्या दोन हारांतून खऱ्या फुलांचा हार शोधून काढतो.

आपल्याला सगळ्यांना झोपेत स्वप्ने दिसतात. स्वप्न बघत असताना ते निव्वळ स्वप्नच आहे हे आपल्याला उमगत नाही. स्वप्नात जे घडते, ते त्या क्षणी पूर्ण खरेच वाटत असते. कित्येकदा स्वप्नात आपण घाबरतो, कधी खूप आनंदी होतो, कधी कधी रडतोही. जाग आल्यावरच ते निव्वळ स्वप्न होते याची जाणीव होते. जागेपणीही, आधी पाहिल्याप्रमाणे कधी कधी जे नाहीच त्याचा भास किंवा भ्रम होतो.

चला लिहूया!

तुम्हाला आलेला एखादा अनुभव जो नंतर भास होता असे सिद्ध झाले, तो लिहा आणि त्यावर वर्गात चर्चा करा.



वरच्या या सगळ्या चर्चेमुळे हे समजते की, आपल्या अनुभवाचे परीक्षण केल्याखेरीज आपल्याला ज्याचा अनुभव येतो, ते खरे आहे की नाही हे ठरवता येत नाही. सत् आणि असत् मध्ये फरक करण्यासाठी आपल्याला जगाचा जो अनुभव येत असतो त्या अनुभवाचाच आधार असतो. 'काय आहे?' हा सत्तामीमांसेत विचारला जाणारा प्रश्न अशा प्रकारे 'कळते कसे?' या ज्ञानमीमांसेच्या प्रश्नाशी नेहमीच जोडलेला असतो.

## ३.२ सत्चे स्वरूप आणि संकल्पना

ज्या अनुभवातून आपल्याला काय आहे हे कळते, तो अनुभव नेहमीच व्यक्तिनिष्ठ असतो, म्हणजे तो व्यक्तिगणिक थोडाफार तरी बदलत असतो. महाविद्यालयात सकाळी लवकर येताना कुणाला हवा थंड वाटते, कुणाला गरम तर कुणाला अगदी सुखद! एखादा पदार्थ कुणाला गोडमिट्ट वाटतो, कुणाला मस्त गोड तर कुणाला जऽऽरा अगोड वाटतो.

यामागचे महत्त्वाचे कारण असे की सर्वसाधारणपणे सगळ्या माणसांच्या क्षमता सारख्या असल्या तरी, प्रत्येकाच्या शरीर-मनाच्या वैशिष्ट्यांमुळे त्यांच्यामध्ये फरकही असतो. त्याखेरीज ज्या विशिष्ट परिस्थितीत व्यक्ती अनुभव घेते, त्या परिस्थितीच्या घटकांचाही अनुभवावर परिणाम होतो. असे घटक बाह्य असतात, तसेच आंतरिकही! थंडीच्या दिवसांत वातावरणातील घनता वाढल्यामुळे दूरवरचे आवाजही ऐकू येतात, हा झाला बाह्य घटकाचा परिणाम. खूप सर्दी झाली असली तर वासाची संवेदना कमी होते हा शरीराच्या अंतर्गत घटकाचा परिणाम! अनुभवाची जडणघडण; व्यक्तीची शारीरिक-मानसिक स्थिती, बाह्य परिस्थिती यांमधील अनेक घटकांच्या गुंतागुंतीच्या रचनेतून होत असते. हे सगळे घटक सतत बदलणारे असतात. या सगळ्यांची चिकित्सा केल्याशिवाय जे अनुभवाला येते ते सत् आहे की नाही हे ठरवता येत नाही.

अनुभवाच्या अशा चिकित्सेतून तत्त्वज्ञांच्या हाती एक तथ्य गवसले. अनुभव व्यक्तिगणिक जरी बदलत असला, तरी ज्या वस्तूचा तो अनुभव आहे, ती वस्तू काही व्यक्तीनुसार बदलत नसते. ती जी आहे, जशी आहे तशीच असते. तिचे अस्तित्व, स्वरूप, गुणधर्म अनुभवनिरपेक्ष असतात. म्हणजे व्यक्तींना त्यांचा अनुभव कसा येतो आहे, येतो आहे की नाही, यावर ते अवलंबून नसतात. थोडक्यात वस्तूचा अनुभव व्यक्तिनिष्ठ असला तरी तिचे अस्तित्व आणि स्वरूप मात्र वस्तुनिष्ठ असते. तेच 'खरे', 'वास्तव' असते. या तथ्यामधून असाही निष्कर्ष निघतो की ज्या वस्तूचा, घटनेचा अनुभव एकाच व्यक्तीला येतो, ती वस्तू किंवा घटना वास्तवात नसतात. स्वप्ने, व्यक्तिगत भास यांत अनुभवाला येणाऱ्या वस्तू/घटना या प्रकारात मोडतात. कारण त्यांचे अस्तित्व एकाच व्यक्तीवर अवलंबून असते. हा अनुभव अनुभवकर्त्यासाठी खरा असला तरी अनुभवाचा आशय मात्र प्रत्यक्षात अस्तित्वात नसतो.


याच्याच पुढे जाऊन विचार केला तर, हा प्रश्न पडतो की सत्चे स्वरूप बदलते असू शकते का? जर ते बदलत असेल तर कशामुळे? थंडीत दूरचे आवाज ऐकू येतात, पण उन्हाळ्यात येत नाहीत याचे कारण व्यक्तिसापेक्ष नसते. ऐकू येण्याची सर्वसाधारण क्षमता असणाऱ्या प्रत्येक व्यक्तीसाठीच हे तथ्य लागू असते. ऋतूंनुसार अनुभव बदलतो म्हणजे तो परिस्थितीसापेक्ष असतो, परिस्थितीप्रमाणे बदलतो. त्याचप्रमाणे वस्तूंचे गुणधर्म परिस्थितीनुसार बदलत असतात. पाणी घनरूपात असेल, द्रवरूपात की वायुरूपात हे त्याच्या तापमानावर अवलंबून असते. म्हणजे पाण्याची ही रूपे परिस्थितीसापेक्ष असतात. पण हायड्रोजनचे दोन अणू आणि ऑक्सिजनचा एक अणू मिळून पाण्याचा एक रेणू तयार होतो हे पाण्याचे 'स्व'रूप मात्र सर्व परिस्थितींमध्ये एकच असते, म्हणूनच ते त्याचे सत्-स्वरूप असते. म्हणजे $H_2O$ हे पाण्याचे न बदलणारे, नित्य असे स्वरूप आहे.

तापमानानुसार असणाऱ्या त्याच्या अवस्था या अनित्य म्हणजे बदलणाऱ्या असतात. हे नित्य स्वरूप आणि अनित्य अवस्था या दोन्ही सत्‌च असतात. कारण त्या व्यक्तिनिष्ठ नाही तर वस्तुनिष्ठ असतात. पाण्याचा रंग, वास, चव, स्पर्श यांचा अनुभव काही प्रमाणात तरी अनुभव घेणाऱ्या व्यक्तीवर अवलंबून असतो. तापामुळे पाणी कडू लागले, तरी तो कडवटपणा पाण्याचा गुणधर्म नसतो, म्हणून 'सत्' नसतो, 'असत्' असतो.

**चला लिहूया!**

परिस्थिती व व्यक्तीनुसार बदलणाऱ्या अनुभवांची उदाहरणे लिहा.

पाण्याच्या उदाहरणामधून लक्षात आलेले तत्त्व ज्ञानेंद्रियांच्या अनुभवाला येणाऱ्या सर्व वस्तूंना लागू करता येते. या वस्तू, त्यांच्या अवस्था, त्यांचे गुणधर्म हे सतत बदलत असतात. परिवर्तनशीलता हा जणू त्यांचा स्वभावच असतो. उत्पत्ती, स्थिती आणि लय ही परिवर्तनाचीच अगदी मूलभूत रूपे आहेत.




जीव जन्माला येतात, वाढतात, मृत्यू पावतात. मूलद्रव्यात घडून येणाऱ्या बदलांमुळे नैसर्गिकरित्या वस्तू निर्माण होतात, नष्ट होतात. माणसे अनेक वस्तू निर्माण करतात, त्याही कधी ना कधी नाश पावतात. ही परिवर्तनाची प्रक्रिया अव्याहतपणे चालू असते. पण ज्यामध्ये हे सगळे परिवर्तन होते, ते या प्रक्रियेच्याही पलीकडे असणारे असे काहीतरी शाश्वत तत्त्व असले पाहिजे, असे काही तत्त्वज्ञांचे म्हणणे आहे. हे तत्त्व शाश्वत, नित्य, (कायम अस्तित्वात असणारे) आणि कधी न बदलणारे म्हणजे अपरिवर्तनीय असेल असा कयास त्यांनी बांधला. पुन्हा पाण्याच्या उदाहरणाकडे वळायचे, तर अवस्था कुठलीही असली तरी पाण्याचे मूळ स्वरूप कायम तेच असते, बदलत नाही. एवढेच नाही तर ज्या अणूपासून पाण्याचा रेणू तयार होतो, त्या अणूंचे अस्तित्व आणि स्वरूप हे पाण्यापेक्षाही जास्त प्राथमिक आणि मूलभूत असते. पाण्याच्या रेणूचे विघटन केले तरी हे अणू त्यांच्या मूळ रूपात अस्तित्वात राहतातच आणि इतर प्रकारच्या अणूंशी त्यांचा संयोग होऊन वेगळ्या प्रकारचे रेणूही निर्माण होऊ शकतात.

विश्वाच्या बदलत्या, अनित्य स्वरूपाच्या मुळाशी कुठले किंवा कुठली आणि काय प्रकारची शाश्वत, नित्य तत्त्वे आहेत याचा शोध घेण्याचा प्रयत्न सत्तामीमांसेत प्राचीन काळापासून केला गेला.

**छांदोग्य उपनिषद खंड – ६**

यथा सोम्यैकेन मृत्पिण्डेन सर्वं मृण्मयं विज्ञातं स्यात्।
वाचारंभणं विकारोनामधेयं मृत्तिका इत्येव सत्यम्॥

श्वेतकेतूचा पिता म्हणाला, 'बाळा, मृत्तिकेच्या एका गोळ्याने मृत्तिकेची इतर सर्व रूपे जाणता येतात. कारण ही रूपे म्हणजे केवळ बोलण्याच्या परि आहेत, मृत्तिका हेच केवळ सत्य आहे.'

श्वेतकेतूचा पिता आपल्या मुलाला सांगतो आहे, जे दिसतं आहे त्यावर थांबू नकोस, दागिने पाहशील तर ही ठुशी, ती बांगडी, तो हार असे म्हणत बसशील काय? या सर्व गोष्टी ज्यापासून घडल्या ते सोने तू जाण.

फाळ, भाता, कोयता ही अवजारे सुटी सुटी समजावून घेताना तुला जाणवेल की यांतील समान तत्त्व लोखंड आहे.

**चला करूया!**

विद्यार्थ्यांचे गट करून प्रत्येक गटासाठी टेबल मांडावे.

टेबल – १ मातीची विविध भांडी / वस्तू

टेबल – २ धातूची भांडी / वस्तू

टेबल – ३ कागदाच्या वस्तू

टेबल – ४ लाकडाच्या वस्तू

टेबल – ५ प्लॅस्टिकच्या वस्तू

विद्यार्थी गटांमध्ये वस्तूंचे निरीक्षण करतील व या वस्तूंचे मूलतत्त्व/मूळ घटक यावर चर्चा करतील.

काही तत्त्वचिंतकांनी असे मत मांडले की, जे बदलते त्याचे अस्तित्व, जे बदलत नाही त्याच्यावर अवलंबून असल्यामुळे जे शाश्वत, तेच खऱ्या अर्थाने 'सत्' असते. एका पातळीवर बदल खरा असला, तरी अंतिमतः त्याला वास्तविक मानता येत नाही. काही तत्त्वज्ञांनी मात्र बदल हेच जगाचे वास्तविक रूप आहे असे मानून त्याच्या मुळाशी काही अपरिवर्तनीय तत्त्व आहे ही समजूत नाकारली. 'सर्व काही बदलते' हेच या विश्वातले न बदलणारे तत्त्व किंवा नियम आहे असे ते मानतात.

**मूलभूत तत्त्वांची संख्या**

| सिद्धान्त | तत्त्वज्ञ/दर्शन |
|---|---|
| (१) एकतत्त्ववाद | पारमेनायडस, स्पिनोझा, हेगेल, अद्वैत वेदांत |
| (२) द्वितत्त्ववाद | सांख्य दर्शन, देकार्त |
| (३) अनेकतत्त्ववाद | एम्पिडोक्लिस, जैन दर्शन, लायबनिझ |

## ३.३ नित्य व अनित्य यांतील फरक

नित्य-अनित्यमधले हे नाते काहीशा वेगळ्या प्रकारे आपल्याला स्वतःच्या अस्तित्वासंबंधीही अनुभवायला मिळते. जन्माला आल्या क्षणापासून ते आत्ताच्या क्षणापर्यंत आपण एकच विशिष्ट व्यक्ती आहोत अशी आपली ठाम समजूत असते. पण त्यामुळे आपल्या तान्हेपणाच्या फोटोत दिसतो 'तेच' आणि 'तेवढेच' आपण आता नसतो. शारीरिक, मानसिक, बौद्धिक असे अनेक प्रकारचे बदल आपल्यात झालेले असतात. तरीही बदलांच्या या प्रवाहातले आपण 'तेच' आहोत याबद्दल आपल्याला खात्री असते. 'माझ्यात खूप बदल झाले आहेत आता' किंवा 'मी आता पूर्वीची राहिले नाही' असे म्हणताना ही 'मी' तीच/तोच आहे आणि 'माझ्यामध्ये' बदल झाले आहेत असे आपल्याला सांगायचे असते. अनेक कारणांनी होणारे बदल हे माझे अनित्य रूप आहे, तर ज्यामध्ये किंवा ज्याच्या संदर्भात हे बदल होतात तो 'मी' हे एक शाश्वत, नित्य अस्तित्व आहे असे मानण्याकडे आपला कल होतो. न बदलणारे, न नष्ट होणारे असे आपल्या शरीरात काहीच नसते. आपले विचार, भावना, इच्छा, प्रेरणा, वासना याही बदलतच असतात.

**चला बोलूया!**

'माझ्यात झालेले बदल' यावर गटचर्चा करा.

मग ते मूलभूत, नित्य असे तत्त्व कुठले? त्याला काय म्हणतात? या प्रश्नाचे उत्तर तत्त्वज्ञांनी 'आत्मा' या संकल्पनेद्वारे दिले. जो जन्माला येतो, बदलतो, नष्ट होतो तो देह आणि जो अजात, अपरिवर्तनीय, अमर्त्य आहे, म्हणजेच जो नित्य, शाश्वत आहे तो आत्मा असे मत मांडून काही तत्त्वप्रणालींनी माणसाच्या पातळीवरचे नित्य-अनित्याचे द्वंद्व सोडवले. जगात काही नित्य तत्त्व आहे हे नाकारणाऱ्या विचार प्रवाहांनी अर्थातच आत्म्याचे अस्तित्व नाकारले, तर 'जे नित्य तेच पूर्ण अर्थाने सत्' असे मानणाऱ्यांनी देहाला पूर्ण किंवा अंतिम पातळीवरचे सत् मानले नाही.

संकल्पनांच्या सत् आणि असत्, नित्य आणि अनित्य या जोडगोळ्या आणि त्यांची वेगवेगळ्या प्रकारांनी घालता येणारी सांगड यांमधून तत्त्वचिंतनाचे

अनेक प्रवाह भारतीय तसेच पाश्चात्त्य परंपरांमध्ये निर्माण झाले. या संकल्पनांच्या अनुषंगाने अनेक पेचही पुढे आले.

ज्या नित्य, अविनाशी तत्त्वांमधून वैविध्याने भरलेले हे जग निर्माण झाले त्या तत्त्वांची संख्या किती आहे? आणि या तत्त्वांचे स्वरूप काय आहे? हे दोन प्रश्न सत्तामीमांसेतले मध्यवर्ती प्रश्न आहेत. हे प्रश्न एकमेकांशी संबंधित आहेत. उदाहरणार्थ, थेलिस या सॉक्रेटसपूर्वीच्या ग्रीक तत्त्वज्ञाने जल किंवा पाणी या एकाच मूलभूत घटकामधून सगळे जग निर्माण होते असे मत मांडले. मग प्रश्न असा निर्माण झाला की, असे असेल तर अग्नी पाण्यापासूनच तयार झाला असे मानावे लागेल. पण वस्तुतः पाणी तर आग विझवते, तिला नष्ट करू शकते. याची संगती कशी लावायची? कुठलेही एक तत्त्व विश्वाच्या मुळाशी आहे असे मानले, तर त्या तत्त्वाचे स्वरूप काय, त्याचे गुणधर्म काय याचा विचार करावा लागतो. आपल्या गुणधर्माच्या अगदी विरुद्ध गुणधर्म असणाऱ्या वस्तू या तत्त्वामधून कशा निर्माण होतील ही मोठीच समस्या उभी राहाते.

जगात अस्तित्वात असलेल्या सर्व गोष्टींचे ढोबळमानाने निर्जीव आणि सजीव असे वर्गीकरण केले जाते. साहजिकच, मूलतत्त्व यातील कुठल्या प्रकारात मोडते/मोडतात याचा विचार करावा लागतो. ते यांपैकी कुठल्याही एका प्रकारचे मानले, तर त्यामधून विरुद्ध प्रकारचे अस्तित्व कसे आकाराला आले याचे स्पष्टीकरण तत्त्वज्ञांना करावे लागते.

**सत् चे स्वरूप**

| सिद्धान्त | | तत्त्वज्ञ/दर्शन |
|---|---|---|
| (१) चिद्वाद | – | वेदान्त दर्शन, बर्कले, हेगेल, ब्रॅडले |
| (२) जडवाद | – | चार्वाक दर्शन, डेमॉक्रिटस्, मार्क्सवाद |
| (३) वास्तववाद | – | जैन, न्याय, वैशेषिक, सांख्य, पूर्वमीमांसा, देकार्त, लॉक, रसेल, मूर |

जाणीव किंवा चैतन्य हे जर सजीवांचे लक्षण मानले, तर मूलतत्त्व जड किंवा निर्जीव आहे असे मानणाऱ्यांना जडापासून चैतन्याची निर्मिती कशी होते हे स्पष्ट करावे लागते, तर मूलतत्त्व मुळातच चैतन्यरूप आहे असे मत असणाऱ्यांना त्यापासून जड भौतिक द्रव्य कसे तयार होते याचा विचार करावा लागतो. काही तत्त्वप्रणाली जड आणि चेतन अशा दोन प्रकारच्या मूलभूत तत्त्वांमधून विश्व आकाराला आले असे प्रतिपादन करतात, तर काही अनेक भौतिक मूलभूत तत्त्वांच्या आंतरक्रियांमधून चैतन्याचा उगम होतो असे मानतात.

**चला बोलूया!**

मूलतत्त्वाचे जड/चैतन्य, नित्य/अनित्य, स्थितीशील/गतिशील स्वरूप यावर ज्युरीस प्रुड्येन्शीयल मॉडेलद्वारे चर्चा घेता येईल. (ज्युरीस प्रुड्येन्शीयल मॉडेलमध्ये ३/५/७ विद्यार्थी ज्युरी बनतात, दोन विद्यार्थी एक बाजू मांडतात, दुसरे दोन विद्यार्थी पर्यायी बाजू मांडतात, उर्वरित विद्यार्थी सर्व चर्चा ऐकतात. कोर्टातील केसप्रमाणे ज्युरी दोन्ही बाजूंची मते ऐकून निर्णय देते.)

याच संदर्भात उद्भवणारा आणखी एक महत्त्वाचा प्रश्न म्हणजे ही मूलतत्त्वे स्थितिशील असतात की गतिशील? या तत्त्वांमधून जग आकाराला येते याचा अर्थ त्यांच्या संदर्भात काहीतरी बदलत असते, घडत असते, बिघडत असते. गतीखेरीज कुठल्याही प्रकारचा बदल शक्य नसतो. गती ही बदलाची पूर्वअट आहे. कित्येक वेळा गतीमधून होणारे बदल आपल्याला दिसतात. पण गती मात्र जाणवत नाही. ज्वालामुखीचा उद्रेक, त्सुनामीची लाट आपण अनुभवू शकतो, पण त्यापूर्वी त्याला जबाबदार असणाऱ्या भूगर्भातील हालचालींची, त्यांच्या गतीची आपल्याला कित्येकदा जाणीवच नसते. पण त्या गतीशीलतेखेरीज या घटना घडणेही शक्य नसते. मग प्रश्न हा येतो की, मूलभूत तत्त्वे

मुळातच गतिशील आहेत की त्यांना कुणीतरी बाहेरून गती देते? स्वतः बाह्य बळाशिवाय हालचाल करणे हे प्राण्यांचे लक्षण आहे. वस्तू मात्र बाहेरून गती देऊन हालवाव्या लागतात. गतीचे आणि त्यातून होणाऱ्या बदलांचे स्पष्टीकरण विश्वाच्या स्वरूपाविषयीच्या कुठल्याही सिद्धान्तासाठी खूपच महत्त्वाचे असते. मूलतत्त्वे स्वभावतःच गतिशील असतात असे मानणारे तत्त्वचिंतक त्या मूलतत्त्वांच्या हालचालींमधून, एकत्र येण्यातून, दूर जाण्यातून निरनिराळ्या वस्तू आकाराला येतात, असे प्रतिपादन करतात. कुठल्याही हेतूशिवाय होणाऱ्या मूलतत्त्वांच्या हालचाली भौतिक नियमांनुसार होत राहतात आणि त्यामधून सगळ्या वस्तूंची जडण-घडण होते असे त्यांचे मत असते.



गतीचे विविध प्रकार

आकाशात मुक्तपणे फिरणाऱ्या ढगांमध्ये आपल्याला जे वेगवेगळे आकार दिसतात, ते बाष्पाची हालचाल, हवेचे झोत आणि त्यांची दिशा या सगळ्यांमधून निर्माण होत असतात. 'आता मी पिसाऱ्याचा आकार घेतो' किंवा 'आता मी फूल होतो' असा जाणीवपूर्वक विचार ढग तर करूच शकत नाहीत. ना इतर कुणी त्यांना जाणीवपूर्वक आकार देते.

**चला करूया!**

संध्याकाळी सूर्यास्ताच्या वेळी आकाशातील ढगांचे निरीक्षण करा.

## ३.४ ईश्वरवादी व निरीश्वरवादी तत्त्वज्ञान

काही तत्त्वज्ञांचे मत असे आहे की, जड भौतिक द्रव्ये मुळात गतिशील नसतात. त्यांना बाहेरून गती द्यावी लागते. सर्व शक्तिमान आणि सर्वज्ञ असा ईश्वर ही गती त्यांना देतो असे मानण्याकडे या तत्त्वज्ञांचा कल असतो. या विचारसरणीनुसार जगाची निर्मिती या मूलतत्त्वांपासून करणे हा सर्वशक्तिमान ईश्वराचा हेतू असतो. आपल्याला कळो वा न कळो, जग निर्माण करण्यामागेही त्याचे काही प्रयोजन असते. अस्तित्वात येणारी प्रत्येक गोष्ट ईश्वराच्या इच्छेने अस्तित्वात येते आणि त्याची इच्छा असेल तोपर्यंत अस्तित्वात राहते. जगातील वस्तूंचे अनंत प्रकार, त्यांचे एकमेकांशी असलेले संबंध, विश्वातील नियमबद्धता या सगळ्याचा कर्ता, नियंता ईश्वर आहे. सर्वच तत्त्वप्रणाली ईश्वराचे अस्तित्व मान्य करतात असे मात्र नाही.

भारतीय आणि पाश्चात्त्य या दोन्ही तत्त्व परंपरांमध्ये ईश्वरवादी तत्त्वज्ञान आहे, तसेच निरीश्वरवादीही आहे. ईश्वराचे स्वरूप आणि कार्य यांबद्दल सर्व ईश्वरवादी तत्त्वप्रणालींमध्ये एकवाक्यता नाही. 'मुळात असलेल्या तत्त्वांना एकत्र आणून जगाची निर्मिती करणारा' ही ईश्वराची संकल्पना आपण वर पाहिली. काही प्रणालींमध्ये मात्र ईश्वराने शून्यातून जग निर्माण केले असे मानले जाते. ही निर्मिती होण्यापूर्वी ईश्वराखेरीज काहीच अस्तित्वात नव्हते. जग ही संपूर्णपणे ईश्वराची निर्मिती आहे. माणूसही स्वतःला निर्माता मानतो आणि तसा तो काही प्रमाणात असतोही. पण मुळात जे काही अस्तित्वात आहे, तेच नाविन्यपूर्ण पद्धतीने उपयोगात आणणे हे माणसाच्या निर्मितीचे स्वरूप असते. जे

नाहीच ते निर्माण करण्याची शक्ती माणसाला नाही, ईश्वराला मात्र ती आहे असे या तत्त्वप्रणाली मानतात.

प्रत्येक प्रश्नाचा खोलात जाऊन विचार करणे हे तत्त्वज्ञानाचे वैशिष्ट्य आहे. 'दिसते तसे नसते' याची प्रत्येकाला जाणीव असते, पण त्या जाणिवेच्या आधारे सुरू झालेला तत्त्वचिंतनाचा प्रवास आपल्याला 'काय आहे'? या सत्तामीमांसेतील मूलभूत प्रश्नापर्यंत पोचवतो. हा प्रश्नही खूप छोटा असला तरी साधा नाहीच. त्याच्या पोटात 'किती आहे?', 'कुठे आहे?', 'कसे आहे?', 'एकमेकांशी कसे जोडले गेले आहे?' अशा न संपणाऱ्या प्रश्नांची भेंडोळी लपलेली आहेत. प्रत्येक प्रश्नाचे उत्तर नव्या प्रश्नांकडे बोट दाखवते आहे. या प्रश्नांचा वेध घेताना आपल्या बुद्धीला भरपूर व्यायाम होतो आणि त्यामुळे तिचे सामर्थ्य वाढत जाते. नव्या-नव्या आव्हानात्मक प्रश्नांना तोंड द्यायला ती सज्ज होते. हे तुमच्या लक्षात आले असेलच. नवीन प्रश्न पडणे, त्यांची उत्तरे शोधणे यात मोठाच बौद्धिक आनंद दडलेला असतो. तुम्ही बुध्दीमान आहातच. मग आता तयार नवीन आव्हानांना समजून घेण्यासाठी?

## शब्दसूची

सत्तामीमांसा - Metaphysics
असत् - Unreal
व्यक्तिनिष्ठ - Subjective
वस्तुनिष्ठ - Objective
भास - Hallucinations
व्यक्तिसापेक्षता - Subjectivity
नित्य - Permanent
अनित्य - Impermanent
जडद्रव्य - Matter
शाश्वत - Eternal
अपरिवर्तनीय - Never Changing
अविनाशी - Non perishable
जाणीव / चैतन्य - Consciousness
तत्त्वप्रणाली - Philosophical systems
आंतरक्रिया - Interaction
स्थितिशील - Static
गतिशील - Dynamic
मूलतत्त्वे - Basic elements
बल - Force

## स्वाध्याय

**प्र.१ कंसांतील योग्य पर्याय निवडून पुढील विधाने पूर्ण करा.**

(अ) वास्तव काय आहे याचा अभ्यास ............ या शाखेत केला जातो.
(ज्ञानमीमांसा, सत्तामीमांसा, नीतिमीमांसा)

(ब) ............ हा ज्ञानेंद्रियांना अनुभव येणाऱ्या वस्तूंचा स्वभाव असतो.
(भास, स्थिती, परिवर्तनशीलता)

(क) स्वप्नांचा अनुभव ............प्रकारचा असतो.
(व्यक्तिसापेक्ष, परिस्थितीसापेक्ष, व्यक्तिनिरपेक्ष)

**प्र.२ गटातील वेगळा शब्द/जोडी ओळखून लिहा.**

(अ) उत्पत्ती, लय, शाश्वत, स्थिती

(ब) स्थितिशील- गतिशील, नित्य-अनित्य, ज्ञान-माहिती, सत्-असत्

**प्र.३ खालीलसाठी वापरण्यात येणाऱ्या तत्त्वज्ञानातील पारिभाषिक संज्ञा लिहा.**

(अ) अंतिम सत् एकच आहे असे मानणारी तत्त्वप्रणाली

(ब) अंतिम सत् दोन आहेत असे मानणारी तत्त्वप्रणाली

(क) अंतिम सत् अनेक आहेत असे मानणारी तत्त्वप्रणाली

(ड) ईश्वराला जगाचा निर्माता मानणारी तत्त्वप्रणाली

(ई) ईश्वराचे अस्तित्व नाकारणारी तत्त्वप्रणाली

(फ) अंतिम सत् चैतन्यरूप मानणारी तत्त्वप्रणाली

(ग) अंतिम सत् जडरूप मानणारी तत्त्वप्रणाली

**प्र.४ फरक स्पष्ट करा.**

(अ) एकतत्त्ववाद, द्‌वितत्ववाद, बहुतत्त्ववाद

(ब) चिद्‌वाद आणि जडवाद

**प्र.५ टीपा लिहा.**

(अ) व्यक्तिनिष्ठ अनुभव

(ब) ईश्वरवाद

(क) गतीची समस्या

**प्र.६ पुढील प्रश्नांची २० ते २५ शब्दांत उत्तरे लिहा.**

(अ) वस्तुनिष्ठता म्हणजे काय?

(ब) सत्तामीमांसेत कशाचा विचार केला जातो?

(क) रज्जूसर्प न्याय स्पष्ट करा.

(ड) गती आणि बदल यांतील संबंध काय आहे?

**प्र.७ खालील विधानांचे उदाहरणासहित स्पष्टीकरण करा.**

(अ) वस्तूचा अनुभव व्यक्तिसापेक्ष असला तरी तिचे अस्तित्व व्यक्तिनिरपेक्ष असते.

(ब) दिसतं तसं नसतं.

(क) गती ही बदलाची पूर्वअट आहे.

**प्र.८ सत्तामीमांसेतील नित्य-अनित्य समस्येसंदर्भात चर्चा करा.**

**प्र.९ अंतिम सत्‌विषयीच्या सत्तामीमांसेतील मतांची/दृष्टिकोनांची चर्चा करा.**

**उपक्रम**

तत्त्वज्ञान विषय न निवडलेल्या तुमच्या मित्र-मैत्रीणींशी 'दिसण्या' आणि 'असण्या'तील फरकाविषयी चर्चा करा.

***

# ४. जाणण्याविषयी जाणून घेताना

४.१ ज्ञान म्हणजे काय?
४.२ ज्ञान व माहिती यांतील फरक
४.३ ज्ञानाची साधने
४.४ ज्ञानप्राप्तीची प्रक्रिया

**प्रस्तावना**

सुप्रसिद्ध वैज्ञानिक आईनस्टाईन यांच्या संदर्भात एक आख्यायिका सांगितली जाते. सापेक्षतावादाच्या सिद्धान्तावर व्याख्याने देण्यासाठी आईनस्टाईन यांना गावोगावची आमंत्रणे येत असत. या गावांना त्यांना घेऊन जाणारा मोटारचालकही त्यांचे व्याख्यान प्रत्येक ठिकाणी ऐकत असे. जिथल्या कुणीच आईनस्टाईनना बघितले नव्हते अशा एका गावात चालक म्हणाला, आज हे व्याख्यान मी देतो. आईनस्टाईन यांनी या गोष्टीला मान्यता दिली. ठरल्याप्रमाणे ऐकून-ऐकून पाठ झालेले व्याख्यान चालकाने दिले आणि चालकाप्रमाणे मागे बसून आईनस्टाईन यांनी ते ऐकले. व्याख्यानानंतर प्रश्नोत्तरांची वेळ आली. प्रश्न विचारण्यात आले. चलाख चालकाने सांगितले, या प्रश्नांची उत्तरे तर मागे बसलेला माझा चालकसुद्धा देईल. आईनस्टाईन यांनी हसत-हसत प्रश्नोत्तरांचे सत्र पार पाडले.

या गोष्टीचे मर्म तुमच्या लक्षात आलेच असेल. चालकाने स्मरणशक्तीच्या जोरावर व्याख्यान तर व्यवस्थित दिले, पण प्रश्नांची उत्तरे देणे त्याला शक्य नव्हते. एखादा विषय समजलेला असल्याखेरीज, त्याचे ज्ञान झाल्याखेरीज त्यासंबंधीच्या प्रश्नांची उत्तरे देणे शक्य नसते. परीक्षेसाठी प्रश्नोत्तरे पाठ केलेली असली, तरी त्यापेक्षा वेगळाच प्रश्न परीक्षेत विचारला की, नुसती घोकंपट्टी करणाऱ्यांची कशी भंबेरी उडते हे तुम्हाला माहीतच आहे. असे होते कारण मागील पाठात पाहिल्याप्रमाणे, सत् आणि सत्चा आभास यांत ज्याप्रमाणे फरक असतो, त्याचप्रमाणे ज्ञान आणि ज्ञानासारख्या असणाऱ्या समजुती, धारणा यांमध्येही फरक असतो. विषय समजून न घेता पाठांतर करून शब्दांमधून मांडणे हा ज्ञानाचा नुसता आभास असतो. त्याला 'पोपटपंची' म्हणतात ते उगीच नाही. माणसाप्रमाणे आवाज काढू शकणाऱ्या पोपटाला काही शब्द उच्चारायला शिकवले, तर तो हुबेहूबपणे ते उच्चारतो. पण त्याला त्याचा अर्थ समजलेला नसतो. तो ज्ञानाचा आभास निर्माण करतो, पण तो ज्ञानी नसतो.

## ४.१ ज्ञान म्हणजे काय?

तुम्हाला विचारले की, तुम्हाला कुठल्या कुठल्या गोष्टींचे ज्ञान आहे? तर तुम्ही तुमच्या नाव-गावापासून गणित, इतिहास, विज्ञान, भूगोल वगैरेंमधले तुम्हाला जी काही माहिती आहे, त्याची भलीमोठी यादी कराल. कदाचित ती संपणारही नाही. मग काही जणांना वाटेल, 'अरे मी तर खूप ज्ञानी आहे'. काहींना मात्र शंका येईल की, मी तर खूप ज्ञानवंत नाही, मग मी जी यादी केली, त्या सगळ्याचे मला खरेच ज्ञान झाले आहे का? 'ज्ञान' म्हणजे काय? ते कसे होते? ज्ञान झाले आहे, याचे ज्ञान कसे होते? असे असंख्य प्रश्न त्याच्या मनात गर्दी करतील. त्याच्या हे लक्षात येईल की ज्ञान होणे म्हणजे काय याचे ज्ञान आपल्याला नाही. कळणे किंवा जाणणे म्हणजे काय हे तर आपण जाणतच नाही. तुम्हालाही आता असे वाटायला लागले आहे का? चला तर मग, या पाठात जाणण्याविषयी जाणून घेऊया.


वर उल्लेख केलेल्या सगळ्या प्रश्नांचा आणि त्याच्याशी निगडित अनेक प्रश्नांचा विचार तत्त्वज्ञानाच्या ज्ञानमीमांसा या शाखेत केला जातो. या प्रश्नांपैकी 'ज्ञान म्हणजे काय'? आणि 'ज्ञानाची साधने कोणती'? या मुख्य प्रश्नांसंबंधी जो विचार झाला आहे त्याची चर्चा या पाठात करूया. रोजच्या बोलण्या-लिहिण्यात मराठी भाषक लोक 'ज्ञान' हा शब्द फारसा वापरत नाहीत. 'ज्ञान होणे' या क्रियापदाच्या अर्थाच्या जवळ जाणारी

'जाणणे', 'कळणे', 'समजणे', 'माहिती असणे', 'ओळख असणे' 'परिचय असणे' अशी क्रियापदे जास्त वापरली जातात. इंग्रजीमध्ये 'to know' हे क्रियापद 'जाणणे', 'माहिती असणे', 'ओळखत असणे' या सर्व अर्थांनी वापरले जाते. या सगळ्यांमधला फरक समजून घेतल्याशिवाय 'ज्ञान' ही संकल्पना कळत नाही. यासाठी सगळ्यात आधी ज्ञान होण्याच्या प्रक्रियेची चर्चा करू.

**चला लिहूया!**

जाणणे, कळणे, समजणे, माहिती असणे, ओळख असणे या क्रियापदांचा योग्य अर्थ व्यक्त करणारी वाक्ये लिहा व त्यांतील फरकांची चर्चा करा.

ज्ञाता म्हणजे ज्याला ज्ञान होते ती/तो आणि ज्ञेय म्हणजे ज्याचे ज्ञान होऊ शकते ते. या दोन्हींचा संपर्क आला की, त्यांच्यामध्ये होणाऱ्या आंतरक्रियांमधून ज्ञान निर्माण होते.




ज्ञान होण्यासाठी अवतीभवतीच्या जगाची, तसेच स्वतःची जाणीव असणे गरजेचे असते. ही जाणीव जेवढी प्रगत, तिला होणारे ज्ञान तेवढे जास्त उच्च पातळीवरचे! माणसाच्या जाणीवेच्या कक्षेत जे काही येते, ते सगळे त्याच्या ज्ञानाचा विषय होऊ शकते, म्हणजेच ते ज्ञेय असते.

वस्तू, गुणधर्म, संबंध, घटना, विधाने, युक्तिवाद, सिद्धान्त इत्यादी सर्वांशी जाणिवेच्या माध्यमातून आपला संपर्क येत असतो, आपल्यामध्ये आंतरक्रिया घडत असतात. प्रत्येक प्रकारच्या संपर्कातून दरवेळी ज्ञानाची निर्मिती होतेच असे नाही. उंचावरून कोसळणारा धबधबा बघताना, त्याचे सौंदर्य आणि त्याची ताकद एकाच वेळी आपल्याला आनंदही देते, थक्कही करते. एखाद्या उत्तम कामगिरीबद्दल शाबासकी मिळते तेव्हा अभिमान वाटतो. झाडावरच्या कैऱ्या पाहून तोंडाला पाणी सुटते. यंत्रमानव काम कसे करतो याबद्दल आपल्याला कुतूहल वाटते. अपेक्षित घटना घडली नाही, तर आपण विचारात पडतो. आपण आणि जग यांमध्ये या ज्या आंतरक्रिया क्षणोक्षणी होत असतात, त्यांचे असे अनेक परिणाम आपल्यावर होतात. ज्ञानाची निर्मिती होण्यासाठी ज्ञाता आणि ज्ञेय यांच्यामध्ये आंतरक्रिया होणे आवश्यक असले तरी पुरेसे नसते. या आंतरक्रिया विशिष्ट प्रकारच्या असतील तरच त्यामधून ज्ञान निर्माण होऊ शकते.

## ४.२ ज्ञान व माहिती यांतील फरक

सोप्या शब्दात सांगायचे तर ज्या आंतरक्रियांमधून वस्तू काय आहे हे आपल्याला समजते, कळते त्या आंतरक्रिया आपल्याला ज्ञान देतात. आपली ज्ञानेंद्रिये, बुद्धी इत्यादी साधनांमुळे आपल्याला वस्तू काय आहे ते कळते. या साधनांची चर्चा आपण पुढे करणारच आहोत. पण त्यापूर्वी एखादी वस्तू/घटना कळणे म्हणजे नक्की काय या प्रश्नाचा विचार करायला हवा. 'कळणे' हे त्या वस्तूची/घटनेची ओळख असणे, तिची कमी-अधिक माहिती असणे की यापेक्षाही अधिक काही? एक उदाहरण घेऊन आपण या सगळ्यातील फरक समजावून घेऊया. 'शेकरू' कशाला म्हणतात तुम्हाला माहीत आहे का?



शेकरू


तुमच्यापैकी काहींनी शेकरूचे चित्र किंवा छायाचित्र पाहिले असेल. काहींनी शेकरू प्रत्यक्ष पाहिले

असेल तर काहींनी शेकरूबद्दल नुसतेच ऐकले असेल. एखाद्या विद्यार्थ्याला शेकरू हा खारीच्या जातकुळीतला पण खारीपेक्षा खूप मोठा प्राणी आहे, तो घनदाट जंगलाचा रहिवासी आहे, तो एका झाडावरून दुसऱ्या झाडावर उडत गेल्यासारखा वाटतो, ही माहिती असेल. ज्यांनी शेकरूबद्दल ऐकले आहे, शेकरूची प्रतिमा पाहिली आहे, ते 'शेकरू' म्हणजे काय हे 'ओळखतात', पण ज्यांनी शेकरूला प्रत्यक्ष पाहिले आहे ते शेकरूला जास्त चांगले ओळखतात, नाही का? ज्या विद्यार्थ्याला प्राण्यांच्या कुठल्या वर्गात शेकरूचा समावेश होतो, शेकरूचा आहार-विहार, अधिवासाची ठिकाणे इत्यादी माहीत असते त्याला शेकरू म्हणजे काय हे समजले आहे असे म्हणायला हरकत नाही. यापुढे जाऊन शेकरू, पक्षी नसले तरी, एका झेपेत एका झाडावरून दुसऱ्या झाडावर कसे जाऊ शकते याचे रहस्य काय असा प्रश्न पडून जी या प्रश्नाचे उत्तर शोधते, तिला शेकरूचे अधिक सखोल ज्ञान होते. प्राणी-पक्षी यांबद्दल आधी असलेल्या माहितीच्या आधारावर शेकरू झेप घेते म्हणजे नक्की काय होते आणि शेकरूला पक्षी का म्हणायचे नाही हे तिला समजते.


या उदाहरणात आपण एखाद्या वस्तूबद्दल नुसतेच काहीतरी वाचलेले, ऐकलेले असणे, ती वस्तू प्रत्यक्षात अनुभवलेली असणे, तिच्याबद्दलची तथ्ये माहिती असणे, या माहितीचा आपल्याला आधी असलेल्या माहितीशी काय आणि कसा संबंध आहे हे समजणे अशा ज्ञानाच्या निर्मितीशी संबंधित असलेल्या अनेक क्रिया पाहिल्या. सरधोपटपणे पाहिले तर या प्रत्येक क्रियेमधून ज्ञान निर्माण होते असे म्हणता येईल. पण तत्त्वज्ञानाच्या काटेकोर दृष्टिकोनातून मात्र असे म्हणता येणार नाही. तात्त्विक दृष्टीतून पाहिले तर वर ज्या क्रिया आपण पाहिल्या त्यातली शेवटची वगळता इतर सर्वांमधून आपल्याला वस्तूची किंवा ज्ञानविषयाची माहिती मिळते. माहिती-तंत्रज्ञानाचा खूप प्रभाव असण्याच्या या काळात हे समजून घेणे अत्यावश्यक आहे की ज्ञानासाठी माहिती महत्त्वाची असली तरी ज्ञान म्हणजे निव्वळ माहिती नव्हे. वेगवेगळ्या गोष्टींबद्दल जी तथ्ये आपण गोळा करतो, त्यांचे संकलन म्हणजे माहिती असे ढोबळमानाने म्हणता येईल. हे संकलन सुट्या-सुट्या वेगवेगळ्या तथ्यांचे असू शकते.


तुम्ही कधी पोस्टाची तिकिटे किंवा नाणी यांचा संग्रह केला आहे? अशा जमवलेल्या गोष्टी नुसत्याच एकत्र ठेवता येतात किंवा देश, प्रकाशन वर्ष, प्रतिमा यांनुसार त्या व्यवस्थितपणे वेगवेगळ्या ठेवता येतात. आपण अनुभव, बुद्धी, वाचन, श्रवण, आंतरजालावरचा शोध या पद्धतींनी तथ्ये जमवत असतो. पण ही तथ्ये जोपर्यंत सुटी-सुटी असतात, तोपर्यंत एखाद्या डब्यात साठवलेल्या नाण्यांप्रमाणे असतात. या तथ्यांबद्दल विचार करून जेव्हा आपण त्यांच्यामधले परस्पर संबंध, त्यांच्यातील साम्य-भेद शोधतो तेव्हा त्यांना आत्मसात करण्याची प्रक्रिया सुरू होते. तथ्यांचे वर्गीकरण करणे, रचना करणे शक्य होते. ही माहितीचे ज्ञानात रूपांतर होण्याची सुरुवात असते. ज्ञानामध्ये माहितीची सुसंगतीपूर्ण व्यवस्था लावणे अभिप्रेत असते. एखादा प्रकल्प करण्यासाठी आपण आधी आवश्यक त्या

माहिती



ज्ञान





**माहितीचे ज्ञानात रूपांतर**

साहित्याची विचारपूर्वक जुळणी करून, त्याची व्यवस्थित रचना केली की मग प्रकल्प तयार होतो. साहित्याची प्रकल्पासाठी जी उपयुक्तता असते, ती माहितीची ज्ञानासाठी असते.

ज्याच्यावर विचारांची प्रक्रिया झालेली नाही असा माहितीचा निव्वळ साठा ज्याच्याकडे आहे, त्याला ज्ञानी म्हणता येत नाही. नाही तर वेगवेगळे ग्रंथ, कोश किंवा गुगल हेच सगळ्यांत जास्त ज्ञानी ठरले असते. ज्ञानाच्या मुळाशी जाणीव असते. या जाणिवेच्या आधारे माहितीवर संस्करण करून ज्ञान 'आपलेसे' करावे लागते. मगच ज्ञान या विषयीचे आकलन होते.

असे ज्ञान आपल्या विचारांचा, भावनांचा, वागण्याचा, जगण्याचा, असण्याचा भाग बनते. एखादी पाककृती करताना आपण त्यासाठीच्या साहित्याची जुळवा-जुळव करतो, मग त्यावर प्रक्रिया करून पदार्थ तयार करतो आणि अर्थातच खातो, ग्रहण करतो. तसेच ज्ञान ग्रहण करावे लागते. पण कधी-कधी साहित्य चांगल्या दर्जाचे नसते, कधी कृती चुकते आणि पदार्थ बिघडतो! तसेच ज्ञानप्रक्रियेबाबतही होऊ शकते. गोळा केलेली, खरी मानलेली माहितीच चुकीची किंवा अपुरी असेल अथवा त्याची रचना चुकीच्या पद्धतीने झालेली असेल, तर त्यामधून ज्याची निर्मिती होते, त्याला ज्ञान म्हणता येत नाही.

माहिती हा ज्ञाननिर्मितीसाठी लागणारा जणू कच्चा माल आहे. त्यामुळे ज्ञानाचा दर्जा बऱ्याच प्रमाणात माहितीच्या गुणवत्तेवर अवलंबून असतो. त्यामुळे माहिती कुठल्या स्रोतातून मिळाली आहे? ती खरी आहे की खोटी याची काटेकोरपणे शहानिशा करावी लागते. समाजमाध्यमांवर छातीठोकपणे 'खरी बातमी' म्हणून पाठवलेले संदेश कित्येक वेळा निव्वळ अफवा असतात किंवा कधी-कधी धादांत खोटे असतात हे आपण सगळ्यांनीच अनुभवलेले आहे. आंतरजालावर माहिती शोधतानाही अत्यंत सावधपणे विश्वसनीय संकेतस्थळे (websites) शोधली नाहीत, तर आपली फसगत होण्याची खूप मोठी शक्यता असते. कुठूनही आलेल्या माहितीवर डोळे झाकून विश्वास ठेवला तर आपण असत्याला सत्य मानण्याची चूक करतो आणि ज्ञान तर असत्य असूच शकत नाही.

**चला बोलूया!**

Think-pair-share

तुम्ही ऐकलेली एक अफवा तुमच्या सहाध्यायाला सांगा. त्याच्या सत्य-असत्यतेची चर्चा करा. ती अफवा आहे हे तुम्ही कसे ठरवले? याची नोंद करा.

जे असत्य असते, ते 'ज्ञान' या संज्ञेला काटेकोर अर्थाने पात्र नसते. दैनंदिन जीवनातही जेव्हा आपण जे म्हणतो ते खरे आहे की नाही याची खात्री आपल्याला नसते तेव्हा आपण 'माझा असा विश्वास आहे----', 'मला असे वाटते की----', 'माझे मत असे आहे की---' असे शब्दप्रयोग करतो. या शब्दांमध्ये जो डळमळीतपणा आहे, तो 'मला नक्की माहिती आहे की----' किंवा 'माझी खात्री आहे की----' या शब्दप्रयोगांमध्ये नसतो. आपली धारणा किंवा समजूत

चुकीची नाही याची निदान आपल्यापुरती खातरजमा आपण केलेली असते. आपण जे म्हणतो आहोत, त्यावर आपला विश्वास असतो. त्याच्यावर इतरांनीही विश्वास ठेवावा असे आपल्याला वाटत असते. त्यांनी तो ठेवावा

## ज्ञान आणि मत

सध्याचा काळ हा माध्यमांच्या प्रभावाचा आणि माहिती तंत्रज्ञानाचा आहे. आंतरजालावर माहितीचा प्रचंड साठा उपलब्ध आहे. वेगवेगळ्या माध्यमांमधून आपल्यावर जणू अनेक प्रकारची माहिती, विचार, मते यांचा वर्षाव होत असतो. अशा वेळी या सगळ्याला आपण ज्ञान समजलो, तर ती फार मोठी चूक होईल. ज्ञान कशाला म्हणावे हे समजून घेण्यासाठी आपण ज्ञान आणि माहिती यांच्यातील फरक आणि संबंध हे दोन्ही समजून घेतले. आता ज्ञान आणि मत यांतील फरक जाणून घेऊया. आपण एकमेकांशी बोलताना खूप वेळा 'मी तुझ्याशी सहमत आहे' किंवा 'तुला मान्य नसेल, तरी माझे हेच मत आहे' असे म्हणतो. या वाक्यांमधून हे स्पष्टपणे सूचित होते की, एकाच विषयावर वेगवेगळ्या व्यक्तींची मते वेगवेगळी असू शकतात. एकाच व्यक्तीची मतेही काळानुरूप किंवा परिस्थितीनुसार बदलू शकतात. त्यात काही गैरही मानले जात नाही. अशा बदलत्या मतांना आपण ज्ञानाचा दर्जा मात्र देत नाही. कारण ज्ञान व्यक्तीनुसार बदलत नाही. ते सार्वत्रिक आणि सार्वकालिक असावे अशी अपेक्षा असते. म्हणूनच सामान्य जाणिवेच्या पातळीवरही आपल्याला ज्ञान आणि मत यांतील फरक लक्षात घ्यावा लागतो.

पाश्चात्त्य परंपरेत प्राचीन ग्रीक तत्त्वज्ञांनीही ज्ञान आणि मत यांमध्ये फरक केला आहे. सॉक्रेटिसच्या शिष्याने, प्लेटोने या फरकाची सविस्तर चर्चा केली आहे. आपण वर 'मत' हा शब्द ज्या अर्थाने वापरला आहे, त्या व्यतिरिक्त प्लेटो काही विशिष्ट अर्थाने 'मत' हा शब्द वापरतो. आपल्याला ज्ञानेंदियांमधून जगाचे स्वरूप कळते. पण जगातील वस्तूंचे रूप, गुणधर्म बदलणारे असतात. झाडांची हिरवी पाने पानगळीच्या सुमारास पिवळी होतात. खूप छान सावली देणारे, पानांनी भरलेले झाड पाने गळून जाऊन निष्पर्ण होते. म्हणजे 'पाने हिरवी आहेत' किंवा 'झाडांची सावली दाट आहे' अशी एका वेळी सत्य असलेली विधाने दुसऱ्या काळी मात्र असत्य ठरतात. व्यक्तीच्या ज्ञानेन्द्रियांच्या क्षमतेनुसारही वस्तूंचा आपल्याला येणारा अनुभव बदलतो. याउलट, 'अ' 'ब' पेक्षा आकाराने मोठा असेल आणि 'ब' 'क' पेक्षा आकाराने मोठा असेल, तर 'अ' 'क' पेक्षा आकाराने मोठा असेल, या प्रकारची विधाने नेहमीच सत्य असतात आणि त्यांच्याबाबतीत मतभेद असूच शकत नाहीत. त्यामुळे अशा स्थळ, काळ, व्यक्तीनुसार न बदलणाऱ्या विधानांनाच प्लेटो 'ज्ञान' (episteme) म्हणतो, तर ज्या विधानांचे सत्य स्थळ, काल, व्यक्तीनुसार बदलते त्यांना तो ज्ञानाचा दर्जा देत नाही, त्यांना तो मत किंवा विश्वास म्हणतो.

ज्ञान आणि मत यांतला दुसरा एक महत्त्वाचा फरक म्हणजे मते खरी किंवा खोटी असू शकतात. ज्ञान मात्र खोटे असत नाही. जे असत्य असते त्याला ज्ञान म्हणता येत नाही. ज्ञान मिळवण्यासाठी ज्ञान विषयाचा सखोल अभ्यास करावा लागतो. मते बहुतेक वेळा अपुऱ्या माहितीच्या, अपुऱ्या आकलनाच्या आधारे तयार होतात. आपण जे बोलतो ते केवळ मत नाही, तर ज्ञान आहे असे आपल्याला म्हणायचे असेल, तर ते सत्य आहे याचे समर्थन करावे लागते, पुरावे द्यावे लागतात.

'आपल्याला एखाद्या गोष्टीचे ज्ञान आहे' असा दावा करताना किंवा दुसऱ्या कुणी केलेला दावा मान्य करताना, ज्ञान आणि मत यांमधला फरक लक्षात ठेवाल ना?

यासाठी आवश्यक असेल तर आपण ती समजूत खरी आहे हे कशाच्या आधारावर म्हणतो याचे स्पष्टीकरणही आपण देतो. म्हणजेच आपल्या म्हणण्याचे समर्थन करतो, त्यासाठी पुरावे देतो.



कानगोष्टी

कल्पना करा की, आपल्या वाचनात असे वाक्य आले की 'जर्मन कवी गटे, 'शाकुंतल' हे संस्कृत नाटक डोक्यावर घेऊन आनंदाने नाचला'. आपल्याला हे नाटक कुणी लिहिले याचे ज्ञान नाही, म्हणून आपण आपल्या मित्रमंडळींकडे विचारणा केली. एक मित्र म्हणाला 'मला वाटते भास या नाटककाराने शाकुंतल लिहिले'. एका मित्राने मात्र ठामपणे सांगितले 'मला खात्री आहे की शाकुंतल; कवी कुलगुरू म्हणून ओळखल्या जाणाऱ्या कालिदास या कवी-नाटककाराने लिहिले'. साहजिकच पहिल्या दोघांनी विचारले 'कशावरून? कशाच्या आधारे तू हे म्हणतो आहेस?' यावर या मित्राने उत्तर दिले की 'मी संस्कृत विषय महाविद्यालयात शिकतो आहे. आम्हाला शाकुंतलमधील वेचा अभ्यासाला आहे'. आता त्याचे म्हणणे ग्राह्य आहे हे आपल्याला पटते.

वेगळ्या शब्दांत सांगायचे झाले तर जेव्हा 'मला अमुक एखाद्या गोष्टीचे ज्ञान आहे' असा दावा ज्ञाता करतो, तेव्हा त्याला त्या विषयासंबंधी मिळालेली माहिती योग्य आहे, तिच्यावर योग्य प्रक्रिया करून त्याने ती आत्मसात केलेली आहे असे तो सूचित करत असतो. पण हा दावा पडताळून पाहिल्याखेरीज मान्य करता येत नाही. हा पडताळा घेण्यासाठी ज्ञानसाधनांचा विचार करावा लागतो.

'ज्ञान म्हणजे काय'? या प्रश्नाव्यतिरिक्त ज्ञानमीमांसेत विचारला जाणारा आणखी एक महत्त्वाचा प्रश्न म्हणजे ज्ञानाची साधने/स्रोत कोणते? भारतीय तसेच पाश्चात्त्य परंपरेत अनेक ज्ञानसाधनांचा उल्लेख केला गेलेला आहे. निनिराळ्या तत्त्वप्रणालींनी वेगवेगळ्या साधनांना मान्यता दिली आहे. त्यांतील प्रमुख साधनांची थोडक्यात ओळख करून घेऊया.

**चला करूया!**

इंद्रिय संवेदन, बुद्धी, स्मृती, शब्द प्रमाण या साधनांद्वारे होणाऱ्या ज्ञानाच्या उदाहरणांचा mind map तयार करा.

## ४.३ ज्ञानाची साधने

लहानपणी विमानाचा आवाज ऐकून धावत बाहेर जाऊन ते विमान पहाण्याची धडपड आपण सगळेच करतो. विमानाचा आवाज आपण कानाने ऐकतो. हा आवाज आकाशातून जाणाऱ्या विमानाचा आहे हे आपल्याला आठवते, कारण आपण पूर्वी अनेक वेळा विमान बघताना त्याचा आवाज ऐकलेला असतो. मग आपण तर्क करतो की, आता ऐकू येणारा आवाजही विमानाचाच असणार. विमान म्हणजे काय, ते कसे उडते हे आपण आपल्या विज्ञानाच्या पुस्तकात वाचलेले असते.



आपल्या क्रमिक पुस्तकात विमानाबद्दल जी माहिती असते, ती खरी असते यावर आपला विश्वास असतो. या छोट्याशा उदाहरणातून आपल्या हे लक्षात येते की, ‘ऐकू येणारा आवाज विमानाचा आहे’ हे ज्ञान होण्यासाठी आपण वेगवेगळी ज्ञान साधने वापरली होती. ती कोणती याची आता क्रमाक्रमाने चर्चा करूया.

आपल्याला बाह्य जगाचे जे काही ज्ञान होते त्याचा मुख्य आधार म्हणजे डोळे, नाक, कान, जीभ आणि त्वचा ही आपली ज्ञानेंद्रिये! ही इंद्रिये आपल्याला ज्ञान देतात, म्हणूनच तर त्यांना ज्ञानेंद्रिये म्हटले जाते. डोळ्यांनी आपल्याला वस्तूचा रंग आणि आकार यांचे ज्ञान होते. नाकाने तिचा गंध आपल्याला जाणवतो. ध्वनीचे ज्ञान कान देतात, तर जीभेने चव चाखता येते. त्वचेला वस्तूच्या होणाऱ्या स्पर्शातून आपल्याला तिचा पोत कळतो. रंग, रूप, रस, गंध, नाद आणि स्पर्श या सर्व गुणधर्मांचे ज्ञान होण्यासाठी ज्ञानेंद्रिये आणि वस्तू यांचा साक्षात/प्रत्यक्ष संपर्क यावाच लागतो. या संपर्कामधून ज्या संवेदना निर्माण होतात त्यामधून ज्ञान होते म्हणून या साधनाला ‘इंद्रियसंवेदन’ किंवा ‘प्रत्यक्ष प्रमाण’ असे म्हणतात. वेगवेगळी ज्ञानेंद्रिये आपल्याला वस्तूंच्या गुणधर्मांचे संवेदनांद्वारे ज्ञान करून देत असली, तरी ज्याला ‘इंद्रियानुभव’ म्हटले जाते, त्यामध्ये या निरनिराळ्या संवेदना एकत्र जोडल्या गेलेल्या असतात. त्यामुळे वस्तूचे केवळ सुटे-सुटे गुणधर्मच नाही, तर वस्तूचे अस्तित्व, तिचे इतर वस्तूंशी असलेले संबंध यांचेही ज्ञान इंद्रियानुभवामधून होत असते. थोडक्यात म्हणजे, आपल्याला भौतिक जगाचे जे काही पायाभूत ज्ञान होते, ते इंद्रियानुभवांच्या माध्यमातूनच होते. त्याखेरिज इतर कुठल्याही साधनांमधून हे ज्ञान स्वतंत्रपणे मिळू शकत नाही. उलट इतर सर्व ज्ञानसाधनांमधून भौतिक जगाचे जे ज्ञान होते ते अपरिहार्यपणे इंद्रियानुभवावरच आधारित असते. त्यामुळे सर्व ज्ञानसाधनांमध्ये इंद्रियसंवेदनांचे स्थान अनन्यसाधारण आहे.



आपल्या शरीरात, मनात जे काही चालले आहे, तेही आपल्याला वेगवेगळ्या संवेदनांमधून कळत असते. आपल्याला दुखले, खुपले तर त्यावर इलाज करण्यासाठी आपण डॉक्टरांकडे जातो, पण आपल्याला दुखते आहे हे सांगण्यासाठी डॉक्टरांची गरज नसते. वेदनेची साक्षात संवेदनाच आपण अनुभवत असतो. आपल्याला उत्साह वाटतो आहे की निराशा हेही आपल्याला प्रत्यक्षपणेच जाणवत असते. आपल्याला आपले आणि जगाचे जे काही ज्ञान होते त्यात या बाह्य आणि आंतरिक संवेदनांचा वाटा खूप मोठा असतो, यात काही शंका नाही.

**ज्ञानसाधने / प्रमाणे**

| पाश्चात्त्य परंपरा | भारतीय परंपरा |
|---|---|
| इंद्रिय संवेदन (Perception) | प्रत्यक्ष (Perception) |
| बुद्धी (Reason) | अनुमान (Inference) |
| अंतःप्रज्ञा (Intuition) | उपमान (Comparison) |
| स्मृती,आठवण, स्मरण (Memory) | शब्द (Testimony) |
| अधिकार (Authority) | अर्थापत्ती (Postulation) |
| | अनुपलब्धी (Non-apprehension) |

चला करूया!

पाण्यात बुडलेली काठी वाकडी दिसते हा प्रयोग करून पहा.

आता तुम्ही विचाराल, 'पण मागच्याच पाठात आपण 'दिसतं तस नसतं' हा धडा शिकलो ना? बरोबर आहे. आपल्या अनुभवाला जे जे येते, ते असतेच असे नाही. त्याचप्रमाणे ते असले तरी आपल्याला ते जसे आहे असे वाटते तसे असेलच असे नाही हे आपण पाहिलेच आहे.

कमी प्रकाशात रंग वेगळेच दिसतात. सर्दी असताना वास येत नाहीत. यांसारखी खूप उदाहरणे याबाबत देता येऊ शकतात. त्याचमुळे इंद्रिय संवेदन हे ज्ञानाचे साधन किंवा प्रमाण म्हणून पूर्णपणे विश्वसनीय ठरत नाही. भौतिक जगाचे ज्ञान इंद्रिय संवेदनांखेरीज होऊ शकत नाही. त्यामुळे त्यासाठी अपरिहार्यपणे हे साधन वापरावे लागते, मात्र सावधपणे. यामधून जी माहिती आपल्यापर्यंत पोचते तिचा खरे-खोटेपणा इतर संवेदनांच्या आधारे, इतर ज्ञानसाधनांद्वारे तपासावा लागतो. त्या माहितीला निःसंशयपणे खरे मानता येत नाही. पाण्यात अर्धी बुडलेली काठी वाकडी 'दिसते'. पण मग 'आठवते' की ती खरे म्हणजे वाकडी नसते. सरळ असूनही ती वाकडी दिसते याचे कारण 'बुद्धीला' उमगलेले असते.

### ४.४ ज्ञानप्राप्तीची प्रक्रिया

आपल्या समोरच्या वस्तू, त्यांचे गुणधर्म वगैरे सगळे आपल्या ज्ञानेंद्रियांच्या प्रत्ययाला म्हणजे अनुभवाला येत असले तरी त्यांची ओळख आपल्याला पटते, ती स्मृतीच्या आधारे. विमानाच्या उदाहरणात पाहिले त्याप्रमाणे विमानाचा विशिष्ट आवाज ऐकून हे आठवते की आपण पूर्वी जेव्हा जेव्हा विमान पाहिले, तेव्हा हा आवाज येत होता. या आठवणीच्या आधारे त्या आवाजाचा आपण विमानाच्या आकृतीशी संबंध जोडतो. ती आकृती डोळ्यांना दिसण्याची अपेक्षा करतो. गणित शिकताना आपण पाढे पाठ करतो आणि गुणाकार, भागाकार पटापट करण्यासाठी त्या पाठांतराचा उपयोग करतो. एखादा धडा समजणे जितके आवश्यक असते, तितकेच तो लक्षात ठेवणेही महत्त्वाचे असते. नव्याने अनुभवाला आलेली एखादी गोष्ट समजून घेण्यासाठी आधी ती आपल्या पूर्वानुभवाशी ताडून पाहिली जाते. तिच्याशी जुळणारे काहीच आपल्या स्मृतिकोशात आढळले नाही, तर आपण गोंधळून जातो. थोडक्यात, ज्ञानप्रक्रियेत स्मृती एक महत्त्वाचे साधन म्हणून वापरली जाते. इथे स्मृती हा शब्द स्मरण अथवा आठवण या अर्थाने वापरला आहे. पण स्मृतीलाही पूर्णपणे विश्वसनीय मानता येत नाही. आठवण अनेक वेळा आपल्याला दगा देते. झालेल्या गोष्टी आपण कधी-कधी पूर्ण विसरतो. काही वेळा त्या जशाच्या तशा आठवत नाहीत. आपल्या लक्षात ठेवण्याच्या प्रक्रियेवर अनेक शारीरिक, मानसिक घटक परिणाम करतात. अप्रिय घटना विसरण्याकडे आपला कल असतो. कल्पनाशक्तीचा प्रभाव स्मरणशक्तीवर पडला, तर जे घडले नाही तेही 'आठवते' (असे वाटते). म्हणूनच स्मृती प्रमाण खात्रीशीर मानता येत नाही.

चला लिहूया!

शब्दप्रमाण व स्मृतीच्या मर्यादा लिहा.

प्रकाशकिरण एका माध्यमातून दुसऱ्या माध्यमात जाताना त्याचा मार्ग बदलतो हे ज्ञान आपल्याला आपल्या शिक्षकांकडून, वाचनात आलेल्या पुस्तकांवरून किंवा आंतरजालावरून मिळालेल्या माहितीवरून होते. म्हणून पाण्यात अर्धी बुडलेली काठी वाकडी दिसली तरी नसते हे ज्ञान आपल्याला होते. खरे तर यामागचे पुरेसे सैद्धान्तिक ज्ञानही आपल्याजवळ नसते. त्यासंबंधी काहीही प्रयोग आपण स्वतः केलेले नसतात. पण हे तथ्य सांगणारे वैज्ञानिक, ते शिकवणारे शिक्षक यांच्या शब्दांवर आपला विश्वास असतो. त्यांचा त्या विषयातला अधिकार आपल्याला मान्य असतो. एखाद्या विषयातल्या तज्ज्ञाकडून त्या विषयाचे ज्ञान मिळवताना आपण शब्दप्रमाणाचा उपयोग करत असतो.

आपल्या ज्ञानातला मोठा भाग शब्द प्रमाणामधून

मिळवलेल्या ज्ञानाचा असतो. मनुष्य जातीने आतापर्यंत ज्ञानाचे प्रचंड मोठे भांडार निर्माण केलेले आहे. ते संपूर्णपणे कुठल्याही एका व्यक्तीच्या आवाक्यात येणे शक्यच नसते. त्यामुळे प्रत्येकालाच तज्ज्ञ, ज्ञानी व्यक्तींवर, मान्यताप्राप्त ग्रंथांवर विश्वास ठेवावा लागतो. मात्र हा विश्वास आपण कुणावर, कशावर, कुठपर्यंत ठेवतो आहोत याबाबत खूप सावधगिरी बाळगण्याची गरज असते. चुकीच्या, अज्ञानी किंवा तज्ज्ञ नसलेल्या व्यक्तीवर किंवा चुकीची माहिती पुरवणाऱ्या साधनांवर विश्वास ठेवला तर आपली दिशाभूल होण्याची खूप मोठी शक्यता असते. ज्याच्यावर विश्वास ठेवायचा, त्या साधनाला बुद्‌धी, तर्क यांच्या मदतीने निरखून, पारखून घ्यावे लागते, हे कायम लक्षात ठेवायला हवे.

चिकित्सक विचार हा तत्त्वज्ञानाचा गाभा आहे. कुठल्याही समजुतीची, मताची चिकित्सा न करता तिचा स्वीकार करता कामा नये ही या विषयाची महत्त्वाची शिकवण आहे. आपल्यापैकी प्रत्येकाला बुद्‌धी आहे. ज्ञान मिळवताना, सत्य शोधताना या बुद्‌धीचा योग्य वापर करणे ही आपली जबाबदारी आहे.

बुद्‌धी किंवा प्रज्ञा हे ज्ञानाचे एक अत्यंत महत्त्वपूर्ण साधन आहे. आपण आधी पाहिल्याप्रमाणे सुट्या-सुट्या माहितीचा नुसता साठा म्हणजे ज्ञान नव्हे. माती, दगड, विटा, लोखंडी सळया, सिमेंट यांचे जवळ-जवळ साठवलेले ढीग म्हणजे इमारत असते का? या सगळ्या घटकांची व्यवस्थित रचना केल्याशिवाय इमारत तयार होत नाही. इंद्रिय संवेदने, स्मृती, शब्द ही सगळी ज्ञानसाधने आपल्याला ज्ञाननिर्मितीसाठी आवश्यक घटक पुरवत असतात. पण त्यांची बांधणी करण्याचे काम बुद्‌धी करते. बुद्‌धीचे एक अतिशय महत्त्वाचे कार्य आपल्याकडे वेगवेगळ्या मार्गांनी जमा झालेल्या तथ्यांचे स्वरूप आणि त्यांचे एकमेकांशी असलेले संबंध समजून घेण्याचे असते. आकाशात काळे ढग दाटून येतात. जरा वेळाने पावसाच्या धारा येतात. त्यानंतर रस्त्यांवर पाणी वाहू लागते, हवा थंड होते. या सगळ्या घटनांचा परस्परसंबंध आपल्याला सांगण्याचे काम बुद्‌धी करते. पावसाच्या थंड शिडकाव्याने तापलेली माती निवते आणि तिच्यावर रासायनिक प्रक्रिया होऊन पसरणाऱ्या मृद्‌गंधाने आपण आनंदित होतो यातला कार्यकारण संबंध आपल्याला कळतो, तो कुठल्याही एका किंवा अनेक ज्ञानेंदियांमुळे नव्हे, तर बुद्‌धीमुळेच! या आकलनाच्या आधारेच बुद्‌धी एखाद्या विशिष्ट घटनेनंतर दुसरी कोणती घटना घडू शकेल यांचा अंदाज वर्तवू शकते. बुद्‌धीची ही कौशल्ये साक्षात जीवनात जशी खूप मोलाची असतात, तशीच विचारांच्या आणि ज्ञानाच्या क्षेत्रातही. विज्ञान आणि तंत्रज्ञान यांमध्येही त्यांचे महत्त्व अनन्यसाधारण असते.

बुद्‌धीचे क्षेत्र अवकाश आणि काळात असणाऱ्या भौतिक वस्तू आणि घटना यांच्यापुरतेच मर्यादित नाही. तिच्या आवाक्यात अमूर्त तत्त्वे, मूल्ये, नियम हेही येतात. विशिष्ट माणसांचे ज्ञान आपल्याला ज्ञानेंद्रिये देतात, पण त्या सगळ्यांमध्ये असलेले 'सारतत्त्व' म्हणजे 'मनुष्यत्व' बुद्‌धीला समजते. अनेक मित्र-मैत्रिणी जोडताना 'मैत्री' ही 'संकल्पना' बुद्‌धीला अधिकाधिक स्पष्ट व्हायला लागते. वयाने मोठे होत जाताना 'नेमेचि येतो मग पावसाळा' हा ऋतूचक्राचा 'नियम' लक्षात येतो. आजारी पडले की, आरोग्याचे 'मोल' समजते. दिलेला शब्द पाळणे हे एक महत्त्वाचे 'मूल्य' आहे हे कळते.

या सगळ्यांखेरीज तत्त्वज्ञानासाठी निष्कर्ष काढणे, अनुमान करणे, युक्तिवाद करणे, समर्थन करणे, चिकित्सा करणे ही बुद्‌धीची कार्ये मध्यवर्ती असतात. याला आपण 'तर्कबुद्‌धी' म्हणून ओळखतो. आपल्या समोर असलेल्या तथ्यांची, माहितीची तर्कसंगत मांडणी करून त्यामधून काय निष्पन्न होते ते शोधणे हे तिचे कार्य असते. सामान्यीकरण हेही बुध्दीचे महत्त्वाचे कार्य आहे. विशिष्ट प्रकारच्या अनेक घटनांच्या आधारे त्यातील सामान्य तत्त्व/नियम बुद्‌धी शोधते. उदाहरणार्थ, धातूच्या अनेक वस्तूंचे तापमान वाढले की त्यांचे आकारमानही वाढते. या निरीक्षणावरून 'सर्व धातू उष्णतेने प्रसरण पावतात' असे सामान्यीकरण बुद्‌धी करते. त्याचबरोबर सामान्य नियम विशिष्ट घटनेला लागू करणे हे कार्यही बुद्‌धी करते. तर्कशास्त्र ही तत्त्वज्ञानाची

एक फार महत्त्वाची शाखा आहे. तिचा ज्ञानमीमांसा या शाखेशी अतिशय जवळचा संबंध आहे. माहितीचे ज्ञानात रूपांतर होताना कुठल्याही प्रकारची विसंगती निर्माण होऊन चालत नाही. एखाद्या मताच्या समर्थनासाठी किंवा ते नाकारण्यासाठी योग्य प्रकारे युक्तिवाद करावे लागतात. तार्किकदृष्ट्या योग्य युक्तिवाद कोणते, विचार करताना, युक्तिवाद मांडताना कोणत्या तार्किक चुका होऊ शकतात याचे मार्गदर्शन तर्कशास्त्र करते. साहजिकच ज्ञानाच्या कुठल्याही क्षेत्रासाठी तर्कशास्त्राचे ज्ञान अत्यावश्यक असते. तर्कशास्त्र, गणित, भूमिती यांमधील अमूर्त संकल्पना, तत्त्वे, नियम यांचे ज्ञान होण्यासाठी बुध्दीच उपयोगात आणावी लागते.

इथे हे लक्षात ठेवायला हवे की, बुद्धी म्हणजे काही वेळा अंतःप्रज्ञा या नावाने ओळखले जाणारे ज्ञानसाधन नाही. जेव्हा कुठल्याही कारणाशिवाय एखादी गोष्ट घडणार किंवा अमुक एखादी वस्तू अशी असणार असे आपल्याला खूप ठामपणे वाटते, तेव्हा आपण म्हणतो, मला 'आतून' हे कळले होते. एखादी मैत्रीण अचानक भेटते आणि आपण म्हणतो, 'मला माहितीच होते तू भेटणार म्हणून'! तिने विचारले 'कसे'? तर आपल्याकडे पटेल असे उत्तर नसते. कधी कधी प्रवासाला जायचे ठरलेले असताना आपला 'आतला आवाज' सांगतो, 'नको जायला'. आपण जात नाही आणि एखाद्या अपघातातून वाचतो. आपल्याला वाटते ज्ञान देणारी 'अंतःप्रज्ञा' आपल्याकडे आहे असे समजणे आणि त्या तथाकथित 'आतल्या आवाजावर' विसंबणे धोकादायक असते. कधी-कधी हे अंदाज बरोबर ठरले तरी ते नेहमी बरोबर ठरतातच असे नाही. ते कधी बरोबर, कधी चूक असतील याबद्दल काही आडाखे बांधता येत नाहीत.

दुसरा महत्त्वाचा मुद्दा म्हणजे 'अंतःप्रज्ञा' किंवा 'आतला आवाज' व्यक्ती-व्यक्तिगणिक बदलत असतात. सहाजिकच त्यामधून आपल्याला जे समजते ते व्यक्तिनिष्ठ असते. वस्तुनिष्ठता हा ज्ञानाचा आवश्यक गुणधर्म आहे हे आपण पाहिलेच आहे. विश्वास, समजूती किंवा मते वैयक्तिक, व्यक्तिनिष्ठ असू शकतात, पण ज्ञान मात्र वस्तुनिष्ठच असावे लागते. त्याचे बुध्दीनिष्ठ समर्थन करता यावे लागते. या कसोटीला अंतःप्रज्ञेला जाणवणारी तथ्ये उतरत नाहीत. त्यामुळे अंतःप्रज्ञेला ज्ञानसाधन किंवा प्रमाण मानता येत नाही.

बुद्धीचे महत्त्व ज्ञानप्राप्तीपुरते मर्यादित नाही. मिळवलेल्या ज्ञानाचा उपयोग प्रत्यक्ष जगण्यात कसा करायचा याचे निर्णयही बुद्धीच्या आधारे घ्यावे लागतात. ज्ञानासाठी ज्ञान मिळवण्याची धडपड आपण काही वेळा करत असलो, तरी बहुसंख्य वेळा आपले जीवन आणखी-आणखी सुधारण्यासाठी, सर्वार्थाने अधिक चांगले करण्यासाठी आपण ज्ञान मिळवायला धडपडत असतो. जगाबद्दलचे आणि स्वतःबद्दलचे ज्ञान तुटपुंजे असले, तर त्यावर आधारित कृती अयशस्वी ठरतात.

### 'Knowing how' and 'knowing that'

चांगले जगण्यासाठी ज्ञान, त्यावर आधारित कौशल्ये यांची आवश्यकता असते. ही कौशल्ये अन्न शिजवण्यापासून संगणक वापरता येण्यापर्यंत अनेक प्रकारची असू शकतात. ती शारीरिक, भावनिक, बौद्धिक अशा वेगवेगळ्या प्रकारची असतात. या कौशल्यांचे औपचारिक आणि अनौपचारिक शिक्षण आपल्याला मिळत असते. ही कौशल्ये वापरून आपण दैनंदिन जीवनात अनेक गोष्टी करत असतो. मात्र एखादी कृती कुशलतेने करता येणे म्हणजे त्यासंबंधीचे ज्ञान असणे असे नव्हे. आपण पोहायला

शिकतो तेव्हा पाण्यात न बुडता तरंगण्याचे, पुढे जाण्याचे कौशल्य मिळवतो. पण त्यामागच्या भौतिक विज्ञानाचे किंवा शरीरविज्ञानाचे ज्ञान आपल्याला नसते. आपली दुचाकी दुरुस्त करणारा तंत्रज्ञ कित्येकदा यंत्रविज्ञानाचे ज्ञान नसूनही अनुभवाच्या जोरावर कुशलतेने दुचाकीतील बिघाड दुरुस्त करू शकतो. 'एखादी गोष्ट कशी करता येते' याचे जे 'ज्ञान' आपण मिळवतो ते या पाठात आपण 'ज्ञान' ही जी संकल्पना अभ्यासतो आहोत, त्यापेक्षा वेगळे आहे, हे तुमच्या लक्षात आलेच असेल ना? कौशल्यासंबंधीच्या ज्ञानाला इंग्लिशमध्ये 'Knowing how' असे म्हटले जाते. उदाहरणार्थ, 'I know how to use google'. मराठीत मात्र आपण 'गुगलचा उपयोग मला करता येतो' असे शब्दप्रयोग करतो. तत्त्वज्ञान, विशेषतः ज्ञानमीमांसा ज्या ज्ञानाचा अभ्यास करते त्याला इंग्रजीमध्ये 'knowing that' असे म्हणतात. उदाहरणार्थ, 'I know that all metals expand when heated'. मराठीत आपण 'मला माहीत आहे की, किंवा मला याचे ज्ञान आहे की, उष्णतेने सर्व धातू प्रसरण पावतात' असे म्हणतो. या प्रकारचे ज्ञान विधानात्मक असते. त्याचा संदर्भ विधानाशी असतो, तर पहिल्या प्रकारचे (knowing how) ज्ञान कृतीशी संबंधित असते.

**चला बोलूया!**

knowing how / knowing that ची वेगवेगळी उदाहरणे देऊन त्या दोन्हींतील फरकांची चर्चा करा.

चांगले जीवन नक्की कशाला म्हणायचे याचा निर्णयही बुद्धीलाच घ्यावा लागतो. चांगले जीवन म्हणजे यशस्वी जीवन? का सुखी जीवन? स्वतःसाठी चांगले की सर्वांसाठी चांगले? चांगले जीवन जगण्याचा योग्य मार्ग कोणता? पुन्हा 'चांगलेच' प्रश्न निर्माण झाले ना? त्यांचा विचार आता पुढच्या पाठात करूया.

## शब्दसूची

विधान – Proposition
युक्तिवाद – Argument
सिद्धान्त –Theory
बुद्धी – Reason
वर्गीकरण – Classification
स्रोत – Source
आंतरजाल – Internet
समजूत / धारणा – Belief
ज्ञानसाधने – Sources of Knowledge
ज्ञानेंद्रिय – Sense organs
इंद्रिय संवेदन – Sense perception
शब्दप्रमाण – Testimony
चिकित्सक विचार – Critical thinking
कार्यकारण संबंध – Cause-effect relationship
अवकाश – Space
काळ – Time
तर्कबुद्धी – Logical reasoning
अंतःप्रज्ञा – Intuition
यंत्रविद्या – Mechanics
तर्कसंगत – Consistent
तार्किक चुका – Fallacy
अनुमान – Inference

## स्वाध्याय

**प्र.१ पुढील विधाने सत्य की असत्य हे सकारण सांगा.**

(अ) ज्ञेय म्हणजे ज्याला ज्ञान होते ती व्यक्ती होय.

(ब) इंद्रियाद्‌वारे मिळणारे सर्व ज्ञान सत्य असते.

(क) शब्दप्रामाण्यात विश्वासार्हता महत्त्वाची नसते.

(ड) चांगले जगण्यासाठी ज्ञान व कौशल्याची आवश्यकता नाही.

**प्र.२ फरक स्पष्ट करा.**

(अ) साक्षात ज्ञान आणि असाक्षात ज्ञान

(ब) माहिती आणि ज्ञान

(क) मत आणि ज्ञान

(ड) ज्ञान आणि शहाणपण

**प्र.३ पुढील प्रश्नांची २० ते २५ शब्दांत उत्तरे लिहा.**

(अ) ज्ञान प्रक्रियेचे घटक कोणते?

(ब) शब्दप्रमाण म्हणजे काय?

(क) स्मृतीचा उपयोग ज्ञानप्राप्तीसाठी कसा होतो याची उदाहरणे द्या.

(ड) ज्ञानेंद्रिय म्हणजे काय?

(इ) आंतरिक संवेदना म्हणजे काय?

**प्र.४ खालील विधानांचे उदाहरणासहित स्पष्टीकरण करा.**

(अ) ज्ञान म्हणजे केवळ माहिती नव्हे.

(ब) इंद्रिय संवेदन हे ज्ञानसाधन सावधपणे वापरावे लागते.

**प्र.५ ज्ञानाच्या साधनांची सविस्तर चर्चा करा.**

**प्र.६ संवाद**

(अ) चांगले जीवन जगण्यासाठी ज्ञान व कौशल्य यांची आवश्यकता.

**उपक्रम**

३ ते ६ वर्षे या वयोगटांतील मुलांच्या ज्ञानप्राप्तीच्या प्रक्रियेचे निरीक्षण करा व या वयोगटांतील मुले-मुली कोणकोणत्या ज्ञानसाधनांच्या आधारे ज्ञान मिळवतात त्याची नोंद करा.

***

# ५. स्वातंत्र्य आणि नीतिनियम

५.१ नीतिमीमांसेचा अभ्यासविषय
५.२ कृतीचे प्रकार
५.३ नीतिनियमांची आवश्यकता
५.४ मूल्यसंकल्पना आणि मूल्यांचे प्रकार

## प्रस्तावना

तुम्हांला सगळ्यात जास्त राग कशाचा येतो? सारखे कोणी ना कोणी तुम्हाला हे कर किंवा ते करू नकोस असे सांगते आणि कसे वागावे, बोलावे याबद्दल तुम्हांला 'उपदेशाचे डोस' पाजते त्याचा तुम्हांला फार राग येतो. हो ना? सगळ्यांना ओरडून सांगावेसे वाटते 'मी लहान नाही आता, माझे मला ठरवू दे मला काय करायचे आहे ते! मला नाही आवडत तुमचे नियम आणि बंधने, मला स्वातंत्र्य हवे आहे, मनासारखे वागण्याचे, हवे ते करण्याचे!' बरोबर ना? पण असे स्वातंत्र्य तर काही तुम्हाला मिळत नाही. तुम्हालाच काय, लहान-मोठ्या कुठल्याच व्यक्तीला पूर्णपणे आपल्या मनासारखे वागण्याचे याप्रकारचे स्वातंत्र्य मिळत नाही.

समाजात रहाताना प्रत्येक व्यक्तीला काही ना काही बंधने स्वीकारावीच लागतात. मग याचा अर्थ असा तर नाही, की ज्याला बंधने नकोत स्वातंत्र्य हवे आहे, अशा व्यक्तीने समाजात राहूच नये? जिथे इतर माणसांशी संपर्क-संबंध येणारच नाही अशा जागी जाऊन राहिले तर? मिळेल मग स्वातंत्र्य? पहा विचार करून. असा प्रयोगच करून बघता येईल का? असा खराखुरा प्रयोग करणे अवघडच आहे.

पण तुम्ही तत्त्वज्ञानाचे विद्यार्थी आहात. विज्ञानाच्या विद्यार्थ्यांसारखे खऱ्याखुऱ्या प्रयोगशाळेत तर तुम्ही प्रयोग नाही करू शकत. पण आपली छोटीशी प्रयोगशाळा तर आपल्याला २४ X ७ उपलब्ध असते ना? विसरलात? आपला मेंदू हीच आपली प्रयोगशाळा आहे. इथे वैचारिक प्रयोग आपण नक्कीच करू शकतो.

कल्पना करा. समुद्रात प्रवास करताना वादळात जहाजाची तोडमोड झाल्यावर एक खलाशी जीवरक्षक होडीत बसून आपला जीव वाचवतो.



एका एकाकी बेटावर

**चला करूया!**

रॉबिन्सन क्रुसोची आणि टारझनची गोष्ट मिळवा व त्यावर चर्चा करा.

समुद्राच्या लाटा त्याला एका एकाकी, निर्जन बेटावर नेऊन पोचवतात. त्या अख्ख्या बेटावर तो एकच माणूस असतो. तिथे त्याला रागवायला, सल्ले द्यायला, शिकवायला कोणीच नसते. तो स्वतंत्र असतो. स्वतःच स्वतःचे निर्णय घ्यायला. त्याच्या सभोवारच्या सजीव-निर्जीव सृष्टीचा त्याला जगण्यासाठी, सुखात राहण्यासाठी उपयोग करून घ्यायचा असतो. त्या सृष्टीतल्या गोष्टी वापरून तो तहान-भूक भागवतो. सुरक्षित निवारा तयार करतो आणि स्वतंत्र आयुष्य जगतो. तुम्हाला आवडेल असे आयुष्य जगायला? कदाचित नाही आवडणार. ज्या जगात आपले जवळचे कोणीच लोक नाहीत, एवढेच

काय ज्याच्याशी आपण बोलू शकू, सुख-दुःख वाटू शकू असे कोणीच नसेल, ते जग कसे आवडेल आपल्याला? नाही का? चला तर मग आपल्या प्रयोगात काही घटकांची भर घालू या.

**चला पाहूया!**

अपघातानंतर/परग्रहावरील जीवांच्या हल्ल्यानंतर जगणारे (survivers) यांवरील सिनेमे पहा. उदाहरणार्थ 'कास्ट अवे', 'जंगल बुक', 'लाईफ ऑफ पाय' इत्यादी.

समजा त्या बेटावर फिरताना त्याला पहिल्यांदाच आणखी एखादी व्यक्ती सामोरी आली तर? काय वाटेल त्याला? आनंद, भीती, संशय, असुरक्षितता? कदाचित सगळेच. पण एक गोष्ट नक्की, इथून पुढे बेटावर वावरताना, आपल्याखेरीज इथे कुणी आहे याची जाणीव त्याला ठेवावी लागेल. त्या व्यक्तीची सोबत, साथ, संगत मिळाली, तर आपल्या प्रयोगकथेच्या नायकाचे, खलाशाचे आयुष्य अधिक चांगले जाईल.पण त्यासाठी त्याला तडजोड करावी लागेल, स्वतःच्या वागण्यावर काही बंधने घालून घ्यावी लागतील. तसे केले नाही, तर त्यांच्यामध्ये संघर्ष होईल आणि त्याचे परिणाम त्या दोघांसाठीही चांगले नसतील. हा संघर्ष टाळण्यासाठी, एकमेकांच्या सोबतीने चांगले जगण्यासाठी बेटावर जे काही आहे, ते त्या दोघांना वाटून घ्यावे लागेल. कामांची वाटणी करावी लागेल आणि हे सगळे करण्यासाठी नियम तयार करावे लागतील ........... आले ना लक्षात?

**चला करूया!**

निर्जन बेटावर भेटलेल्या दोघांचा संवाद नाट्यरूपाने सादर करा.

आपण जे काही वागत-बोलत असतो, ज्या कृती करता असतो, त्यांचे काही ना काही परिणाम आपल्या आसपासच्या, आपल्याशी प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षरित्या संबंधित असलेल्या अनेकांवर होत असतात. त्यांच्या वागण्याचे परिणाम आपल्यावर होत असतात. हे माहीत असल्यामुळेच आपल्या दैनंदिन जीवनातही काय करावे? कसे करावे? नक्की कसे वागावे? यासंबंधीचे अनेक प्रश्न आपल्याला पडत असतात. कधीतरी तुमच्या एखाद्या मैत्रिणीला तासाला येणे शक्य नसते, पण ती तुम्हाला तिची हजेरी लावायला सांगते. तिचे ऐकले पाहिजे की नाही? कुठल्याही उत्सवात, समारंभात तुमच्या गल्लीत खूप मोठ्या आवाजात गाणी लावली जातात, गोंगाट केला जातो, ते तुम्हांला आवडत नाही, पटत नाही. त्यामुळे आजारी व्यक्ती, वृद्ध माणसे, लहान मुले यांना फार त्रास होतो, हे तुम्हांला माहिती आहे. अशा वेळी तुम्ही काय करायला हवे? कधीतरी मित्राकडे अभ्यासाला जातो असे सांगून भटकायला गेले तर काय बिघडते? असे अनेक प्रश्न तुम्हालाही पडतात ना? या प्रश्नांची उत्तरे कशी शोधायची? सापडलेली उत्तरे बरोबर आहेत की चूक हे कशाच्या आधारे ठरवायचे? या सगळ्याबद्दलचे मार्गदर्शन आपल्याला तत्त्वज्ञानाच्या नीतिमीमांसा या शाखेत मिळते. तुम्ही म्हणाल, हे तर आम्हाला सततच सांगितले जाते. कधी पालक, कधी शिक्षक, कधी नात्यातले किंवा ओळखीतले वडिलधारे, सगळेच तर आम्हाला सतत उपदेश करत असतात. काही पुस्तकांमध्ये वाचलेल्या गोष्टींच्या शेवटीसुद्धा 'तात्पर्य' या शीर्षकाखाली एक नैतिक धडा असतोच की!

**चला बोलूया!**

काही बोधकथांची 'तात्पर्य' विधाने घेऊन त्यावर गटचर्चा करा.

त्यालाच आम्ही कंटाळलो आहोत. त्यात आणखी नीतिमीमांसेची भर कशाला? तुमची शंका अगदी रास्त आहे. पण नीतिमीमांसा उपदेश करतच नाही. काय करावे, काय करू नये याबद्दलच्या नियमाची एखादी भलीमोठी जंत्रीही नीतिमीमांसा देत नाही. पण काय करावे आणि ते का करावे याचे निर्णय घ्यायला नीतिमीमांसा आपल्याला मदत करते. चांगले काय, वाईट काय, योग्य काय, अयोग्य काय, न्याय्य काय, अन्याय्य काय याचा विचार करताना कुठले घटक लक्षात घ्यायला हवेत, त्यांच्यामधले नाते कसे समजून घ्यायला

हवे याची मीमांसा म्हणजे विवेचन तत्त्वज्ञानाच्या या शाखेत केले जाते.

## ५.१ नीतिमीमांसेचा अभ्यासविषय

नीतिमीमांसेचा अभ्यासविषय आहे, माणसाचे वर्तन आणि त्याचे नैतिक मूल्य! मानसशास्त्रसुद्‌धा मानवी वर्तनाचाच अभ्यास करते. पण या दोन ज्ञानशाखांच्या दृष्टिकोनात फरक आहे. मानसशास्त्र माणसाचे वर्तन कसे आहे, याचे वर्णन करते, ते तसे का आहे याचे स्पष्टीकरणही करते. त्यासाठी मानसशास्त्र अनुभवावर आधारित वैज्ञानिक पद्‌धतींचा उपयोग करते. नीतिमीमांसेला माणसाचे वर्तन कसे असावे, कसे असले पाहिजे या प्रश्नात रस असतो. मानसशास्त्रात तथ्यांना महत्त्व असते, तर नीतिमीमांसेत मूल्यांना. नीतिमीमांसेत कृतींचे, आचरणाचे नैतिक दृष्टिकोनातून मूल्यमापन केले जाते. त्यासाठी जे नियम, तत्त्वे, मूल्ये यांचा उपयोग केला जातो, त्यांची साधक-बाधक चर्चा केली जाते. नीतिशास्त्रीय सिद्‌धान्त मांडले जातात. या सगळ्या अभ्यासामधून वैयक्तिक आणि सामाजिक पातळीवरच्या चांगल्या जीवनाबद्‌दलच्या आपल्या कल्पना स्पष्ट होत जातात. त्या प्रकारच्या जीवनाच्या प्राप्तीसाठी आपली पावले पडायला लागतात. जीवनाची बरी-वाईट जडण-घडण माणसांच्या कृतींमधूनच तर होत असते.

**चला करूया!**

नीतिमीमांसेचे कार्य यावर concept/mind map तयार करा.

## ५.२ कृतींचे प्रकार

पण माणसाची कृती म्हणजे नक्की काय? आपण जे जे 'करतो', जे काही 'कर्म' आपण करतो, ते म्हणजे आपली कृती असते हे एका अर्थी खरे आहे. पण नीतिमीमांसा अशा सर्वच कृतींचा अभ्यास किंवा मूल्यमापन करत नाही. प्रतिक्षिप्त क्रियांसारख्या ज्या कृती यांत्रिकपणे केल्या जातात किंवा आपल्या शरीर-मनात ज्या क्रिया आपल्या जाणीवेशिवायही घडत असतात, त्यांना नीतिमीमांसेत स्थान नसते. ज्या कृती आपण जाणीवपूर्वक, आपल्या इच्छेने करत असतो, त्याच नीतिमीमांसेचा अभ्यासविषय होतात. श्वसन, रक्ताभिसरण, अन्नपचन अशा क्रिया आपल्याही नकळत 'होत' असतात, त्या आपण 'करत' नाही. त्याचप्रमाणे डोळ्यात धूळ-कचरा गेल्यावर डोळ्यांची उघडझाप आपोआप 'होते'. आपल्या इच्छेशिवाय आणि बहुतेक वेळा आपल्या नियंत्रणाशिवाय होणाऱ्या या क्रियांना अनैच्छिक क्रिया असे म्हटले जाते. या उलट ज्या कृती आपण ठरवून इच्छापूर्वक करतो, त्यांना ऐच्छिक कृती असे म्हटले जाते.

**चला लिहूया!**

विविध कृतींची एक यादी तयार करा. ती आपल्या सहाध्यायांना दाखवा. त्यानंतर या कृतींचे ऐच्छिक व अनैच्छिक कृती असे वर्गीकरण करा.

कृतींचे हे दोन प्रकार थोड्या सविस्तरपणे समजावून घेऊया. जगातल्या सर्व गोष्टी निर्जीव किंवा सजीव असतात. निर्जीव गोष्टींचे 'वर्तन' निसर्ग नियमांनुसार होते. वेगवेगळ्या गोष्टींचे किंवा बलांचे एकमेकांवर जे परिणाम होतात ते यांत्रिक असतात. त्यांना आपण क्रिया-प्रतिक्रिया म्हणतो. त्या होण्यावर वस्तूंचे कुठलेही नियंत्रण असू शकत नाही. लोहचुंबक लोखंडी वस्तूंना स्वतःकडे आकर्षित करतो, ते त्याच्या अंगच्या नैसर्गिक गुणधर्मामुळे! तसे करण्याची लोहचुंबकाला इच्छा आहे की नाही हा प्रश्नच निर्माण होत नाही. त्याचप्रमाणे तसे होऊ न देण्याचे 'स्वातंत्र्य' लोहचुंबकाला नसते, त्याबाबतीत इतर पर्यायच असू शकत नाहीत. सजीवांमध्ये मात्र निव्वळ क्रिया-प्रतिक्रियांच्या पलीकडे जाऊन 'कृती' करण्याची क्षमता असते. जीवाची जाणीव जेवढी प्रगत, तेवढी जाणिवपूर्वक 'कृती' करण्याची क्षमता जास्त!


**चला बोलूया!**

क्रिया-प्रतिक्रियांची उदाहरणे शोधून त्यावर गटचर्चा करा.

माणसाच्या वैशिष्ट्यपूर्ण जडणघडणीमुळे, प्रगत जाणीवेमुळे माणसापुढे कृती करण्याचे अनेक पर्याय उपलब्ध होतात. त्या पर्यायांमधून एखाद्या कृतीची निवड करण्याचे स्वातंत्र्य माणसाला असते. मनुष्येतर प्राण्यांचे वर्तन बऱ्याच प्रमाणात त्यांच्या नैसर्गिक प्रेरणा, वासना, इच्छा यांद्वारे नियंत्रित होत असते. माणसाला काही प्रमाणात तरी; क्रियेला ठराविक प्रतिक्रिया न देण्याचे, नैसर्गिक प्रेरणांना काबूत ठेवण्याचे स्वातंत्र्य आहे. त्यामुळेच सुळावर चढवले जातानाही येशू ख्रिस्त 'देवा त्यांना क्षमा कर, ते काय करत आहेत हे त्यांना कळत नाही' असे उद्गार काढू शकतात.

माणसाचे हे इच्छास्वातंत्र्य ऐच्छिक कृतींच्या मुळाशी असते. एक साधे उदाहरण पाहू.

आपल्याला मोकळा वेळ असेल, तर त्या वेळात काय करता येईल, याचे अनेक पर्याय आपल्यासमोर असतात. कुणी वाचत बसेल, कुणी भटकायला बाहेर पडेल, कुणी संगीत ऐकेल, कुणी चित्रपटाला जायचे ठरवेल. आपण चित्रपट पहाण्याचा पर्याय निवडला, तरी कुठला चित्रपट बघायचा याचीही निवड करावी लागतेच. थोडक्यात म्हणजे, अनेक पर्यायांमधून एक निवडण्याचे स्वातंत्र्य वापरून केलेली कृती म्हणजे ऐच्छिक कृती. अशा अनेक ऐच्छिक कृती आपण दिवसभरात सतत करत असतो. आपण स्वतः त्या कृतीचा पर्याय निवडलेला असल्यामुळे, त्या कृतीच्या परिणामांची जबाबदारीही आपली असते. हे परिणामही अनेक प्रकारचे असतात. काही कृतींचे परिणाम तत्काळ होतात, तर काहींचे बऱ्याच काळानंतर! काही परिणाम कृती करणाऱ्याला अपेक्षित असतात, तर काही अनपेक्षित! कित्येक वेळा काही विशिष्ट परिणाम व्हावेत या इच्छेने आपण कृती करतो, प्रत्यक्षात इतरही काही इच्छित नसलेले परिणाम घडून येतात. कृतींची निवड आपण केलेली असल्यामुळे परिणामांची जबाबदारी आपल्यावर असते. स्वातंत्र्य आणि जबाबदारी अशा प्रकारे नेहमीच जोडलेले असतात. माणसाला ऐच्छिक कृती करण्याची क्षमता नसती, तर त्या कृती नैतिक आहेत की अनैतिक, योग्य की अयोग्य, चांगल्या की वाईट याबद्दलचे निष्कर्ष आपण काढूच शकलो नसतो. चांगले वागण्याचा उपदेश कुणाला करण्याला किंवा नीतिचे धडे देण्याला काहीच अर्थ राहिला नसता. माणसाला मर्यादित का होईना पण इच्छास्वातंत्र्य आहे, म्हणूनच जग आहे त्यापेक्षा चांगले करण्याच्या धडपडीला अर्थ आहे. चांगल्या जीवनाची स्वप्ने बघायला, ती प्रत्यक्षात उतरतील अशी आशा करायला, त्यासाठी प्रयत्नाची पराकाष्ठा करायला वाव आहे.




माणसाला इच्छा स्वातंत्र्य असल्यामुळेच तो 'चांगल्या' कृती करण्याची शक्यता असते, तशीच 'वाईट' कृती करण्याचीही शक्यता असते. माणसाचे वर्तन योग्यही असू शकते किंवा अयोग्यही असू शकते. संस्कृतीच्या प्रारंभीच्या काळापासूनच, समाजाच्या निकषांनुसार माणसाचे वर्तन चांगले आणि योग्य असावे म्हणून अनेक प्रकारचे नियम तयार केले जातात. माणसांच्या सहज स्वाभाविक प्रवृत्तींना योग्य वळण लावण्याचे कार्य नियमांचे असते. अगदी लहानपणापासूनच आपली गाठ नियमांशी पडते. आपल्या कुटुंबात, शेजारी-पाजारी, शाळांमध्ये, क्रीडांगणांवर, सार्वजनिक ठिकाणी अनेक नियम आपल्या वर्तनाचे नियमन करायला सज्ज असतात. परंपरा, रूढी, रीतिरिवाज ही सगळी नियमांचीच रूपे आहेत. धर्म आणि कायदे हे ही व्यक्तीच्या स्वातंत्र्यावर बंधने घालून त्याच्या आचरणाचे नियमन करू बघत असतात. लहान असताना आपल्याला या बंधनांचा

फारसा जाच होत नाही, पण जसे-जसे वय वाढते तसे-तसे आपल्याला ही बंधने काचू लागतात. मनासारखे जगण्याचे स्वातंत्र्य आपल्याला मिळायला हवे ही उर्मी तुमच्या वयात तर खूप प्रबळ असते. त्यामुळेच 'का हवीत ही बंधने'? बंधनमुक्त समाज असू शकत नाही का? असे प्रश्न तुम्हाला वारंवार पडतात. खरे ना? मग या प्रश्नांचाच विचार करू या का?

'माणूस हा बुध्दीशील प्राणी आहे' ही माणूस या शब्दाची व्याख्या तुम्ही ऐकली आहे, तशीच 'माणूस हा समाजशील प्राणी आहे' ही व्याख्याही ऐकली असेलच ना? निसर्गतःच माणूस हा एकटा-दुकटा न राहता समूहाने राहणारा प्राणी आहे. प्राचीन काळात माणसाच्या हे लक्षात आले की, जीवनसंघर्षात टिकून राहण्यासाठी माणसांनी एकत्र येण्याची गरज आहे. या मूलभूत गरजेतून समाजाची निर्मिती झाली हे जसे खरे, तसेच माणसाच्या अनेक क्षमतांचा विकास समाजात राहण्यानेच होऊ शकतो, हे देखील खरे! म्हणजेच आपला जीव टिकवण्यापासून, माणूस म्हणून आपला खऱ्या अर्थाने विकास होण्यापर्यंतच्या सर्व गरजा समाजातच पूर्ण होऊ शकतात. माणसाचे हित समाजातच साधले जाऊ शकते. माणसाच्या अस्तित्वासाठी आणि हितासाठी जशी समाजाची गरज असते, तसेच समाजाचे अस्तितत्व आणि हित माणसांवर अवलंबून असते, कारण समाज विशिष्ट व्यक्तींचाच बनलेला असतो. माणूस आणि समाजाचे नाते हे असे परस्परावलंबित्वाचे असते.

## सद्‌गुणाधारित नीती

नीतिमीमांसेच्या पाश्चात्य परंपरेत नीतिविषयक तीन उपपत्ती प्रमुख आहेत. उपयुक्ततावाद, कर्तव्यवाद आणि सद्‌गुणाधारित नीति.

यांपैकी पहिल्या दोन उपपत्ती कुठल्या नियमांच्या आधारे कृती नैतिक आहे की अनैतिक हे ठरवावे हे सांगतात. या उपपत्तींचा अभ्यास आपण पुढच्या वर्षी करणार आहोत. इथे आपण तिसऱ्या म्हणजे सद्‌गुणाधारित नीतिचा थोडक्यात परिचय करून घेऊया. या उपपत्तीच्या केंद्रस्थानी कृती नाही, तर व्यक्ती असते. चारित्र्यसंपन्न असलेल्या व्यक्तीचे आचरण बहुतांशी नैतिकच असते. त्यामुळे कृतींच्या नैतिकतेचा स्वतंत्रपणे विचार करण्यापेक्षा व्यक्तीच्या नैतिक चारित्र्याची जडण-घडण करण्यावर या उपपत्तीचा भर असतो. सॉक्रेटिस, प्लेटो, ॲरिस्टॉटल या सुप्रसिद्ध प्राचीन ग्रीक तत्त्वज्ञांनी सद्‌गुणाधारित नीतीचा पुरस्कार केला. त्यानंतर मध्ययुगीन काळातही नीतिमीमांसेत सद्‌गुण या संकल्पनेला मध्यवर्ती स्थान होते. आधुनिक कालखंडात मात्र ही संकल्पना मागे पडून वर उल्लेखलेल्या दोन उपपत्ती मांडल्या गेल्या.

सद्‌गुण या शब्दाचा ग्रीक परंपरेतला अर्थ चारित्र्याचा उत्कृष्ट असा गुणधर्म हा आहे. ॲरिस्टॉटलने बौद्धिक सद्‌गुण आणि नैतिक सद्‌गुण यांमध्ये फरक केला आहे. नीतिमीमांसेत अर्थातच नैतिक सद्‌गुणांचा विचार केला जातो. कुठल्याही प्रसंगी नैतिकदृष्ट्या योग्य अशी कृती करण्याकडे असलेला कल म्हणजे नैतिक सद्‌गुण. असे सद्‌गुण ज्या व्यक्तींच्या चारित्र्यात अंतर्भूत असतात त्या व्यक्ती जणू सवयीनेच भलेपणाने वागतात. प्रामाणिकपणा हा नैतिक सद्‌गुण आहे. मुळातच प्रामाणिक असणाऱ्या व्यक्तीला एखाद्या प्रसंगी प्रामाणिकपणे वागावे की नाही हा प्रश्नच सहसा पडत नाही. ती व्यक्ती सहजतेने प्रामाणिकपणे वागते, कारण प्रामाणिकपणा हा तिच्या चारित्र्याचा अविभाज्य भाग असतो.

नैतिक सद्‌गुण अनेक असतात. त्यातील धैर्य, संयम, शहाणपणा आणि न्याय हे चार सद्‌गुण प्रमुख आहेत असे ग्रीक परंपरा मानते.

भिन्न-भिन्न वृत्ती, प्रवृत्ती, क्षमता असणाऱ्या अनेक व्यक्ती एकाच समाजाचा भाग असतात. म्हणतात ना, 'व्यक्ती तितक्या प्रकृती'! या व्यक्तींची जडण-घडण वेगवेगळ्या पद्‌धतीने होते. त्यांची मते, विचार, ध्येये, मूल्ये वेगवेगळी असतात. साहजिकच व्यक्ती-व्यक्तींमध्ये हितसंबंधांचा संघर्ष होण्याची शक्यता असते. ज्याने त्याने फक्त आपल्याच ध्येयांचा, हितांचा विचार केला तर अशा स्वकेंद्री व्यक्तींचा समाज फार काळ टिकू शकत नाही. त्यामध्ये अनागोंदी माजते . विशिष्ट व्यक्तींच्या परस्परविरोधी हितसंबंधांचा, ध्येयांचा मेळ घालणारी कोणतीही यंत्रणा अस्तित्वात नसली, तर जे सामर्थ्यवान आहेत, ते दुर्बलांच्या हिताकडे दुर्लक्ष करतात, त्यांचे शोषण करतात. म्हणजेच 'बळी तो कान पिळी' हाच नियम होतो.

**चला जमवूया!**

'सामर्थ्यवान दुर्बलांचे शोषण करतात' या आशय/संदर्भाच्या बातम्यांची कात्रणे वर्तमानपत्रांतून जमवा व त्यांचा पोर्टफोलिओ वर्गासाठी तयार करा.

दीर्घकालीन विचार करता अशी अवस्था व्यक्ती वा समाज कुणासाठीही चांगली नसते. त्यामुळेच आपल्यात जी उपजत स्वार्थबुद्‌धी आहे, म्हणजे स्व-हित साधण्याची प्रेरणा आहे, तिला ताब्यात ठेवण्यासाठी नियमांची आवश्यकता असते. 'स्व' बद्‌दल प्रेम हे जितके स्वाभाविक आहे, तितकेच इतरांबद्‌दल मैत्रभाव, अनुकंपा, दया यांसारखे गुणधर्मही कालक्रमात स्वाभाविकपणेच माणसामध्ये निर्माण झाले आहेत. त्याखेरीज माणसाच्या बुध्दीशीलतेमुळे त्याच्या हे लक्षात येते की, इतरांच्या हिताचा विचार करणे, त्यासाठी प्रयत्न करणे हे स्वहितासाठीही आवश्यक आहे. व्यक्ती आणि समाज यांचे परस्परावलंबित्व लक्षात घेता, स्वहित आणि समाजहित यांचा स्वतंत्रपणे विचार करताच येत नाही. या दोन्हींचे योग्य संतुलन राखणे हे नीतिनियमांचे कार्य असते. 'योग्य' आणि 'अयोग्य' यांचा अर्थ लावण्यासाठी जे निकष वापरले जातात, ते मूल्यात्मक असतात.

## ५.३ नीतिनियमांची आवश्यकता

नियमांचे महत्त्व आपल्या रोजच्या जगण्यातील एका उदाहरणावरून समजून घेऊ. संध्याकाळी किंवा रात्री काही कारणाने वाहतूक नियंत्रण करणारे दिवे जर बंद पडले, तर शहरात गर्दीच्या ठिकाणी प्रचंड गोंधळाची परिस्थिती निर्माण होते. जो तो/जी-ती आपला 'घोडा' (वाहन) पुढे दामटण्याच्या प्रयत्नात असतो/असते. कुणीच माघार घेत नाही. लहान मुले, वयस्क व्यक्ती, दुर्बल व्यक्ती, दिव्यांग व्यक्ती यांना येणाऱ्या अडचणी, होणारा त्रास कुणाच्या खिजगणतीतही नसतो.

**चला पाहूया!**

एखादी यंत्रणा कोलमडते त्याचा प्रसंग/नाट्य रूपांतर याचा व्हिडीओ शोधा व वर्गात सर्वांसोबत पहा. नंतर त्यावर चर्चा करा.

परिस्थिती नुसती गोंधळाचीच नाही, तर धोकादायक असते. अपघाताच्या शक्यता वाढतात. या उदाहरणावरून हे लक्षात येते की, समाजाने केलेले नियम आणि ते राबवण्यासाठी उभी केलेली यंत्रणा जेव्हा कोलमडते किंवा मोडकळीला येते, तेव्हा स्वयं-नियमन असेल, तरच व्यवस्था राहू शकते. नियमांचा अभाव अनावस्थेला कारणीभूत ठरतो. नियम का असावे लागतात, बंधने का पाळावी लागतात या प्रश्नांची उत्तरे आता तुम्हाला मिळाली असतील ना?

**चर्चा करू**

१) सगळे जण नेहमी खोटेच बोलले तर काय होईल?

२) आपण नीतिनियम का पाळायला हवेत?

समाज अस्तित्वात येतो, तोच मुळी नियमांबरोबर. आणि काळाच्या ओघात त्या दोन्हींचा विकास होतो. विशिष्ट काळाच्या गरजांनुसार नियमांमध्ये बदल होत जातात. नवे नियम अस्तित्वात येतात. नियम बदलाची प्रक्रिया प्रत्येक वेळी विनासंघर्ष सुरळितपणे

पार पडते असे नाही. मोठ्या ऐतिहासिक बदलांच्या टप्प्यांवर जुन्या-नव्या नियमांमध्ये संघर्ष निर्माण होतो. अशावेळी कुठले नियम स्वीकारावेत याचा निर्णय घ्यायला लागतो. नियम आपल्याला कुठल्या कृती योग्य, कुठल्या अयोग्य याचा निर्णय घ्यायला मदत करतात. पण योग्या-योग्यतेच्या दृष्टीने नियमांचेही परीक्षण करायची गरज निर्माण होते. यासाठी आपल्याला मूल्यांकडे वळावे लागते.

मूल्य याचा अर्थ मोल किंवा महत्त्व! अनेक वेळा रोजच्या जीवनात आपण हा शब्द किंमत, दर किंवा भाव या अर्थाने वापरतो. पण इथे हे लक्षात ठेवणे खूप आवश्यक आहे की 'किंमत' आणि तत्सम इतर शब्दांनी एखाद्या वस्तूचा फक्त आर्थिक म्हणजे पैशाच्या संदर्भातल्या मूल्याचा निर्देश होतो. पण इथे मूल्य या शब्दाचा; आर्थिक मूल्याच्या पलीकडे जाणारा खूप व्यापक अर्थ अभिप्रेत आहे. अत्यंत अडचणीच्या प्रसंगी एखाद्या व्यक्तीने आपल्याला केलेली मदत ही खूप मोलाची असते. अपघातात गंभीररित्या जखमी झालेल्या व्यक्तीला रुग्णालयात पोचवून वैद्यकीय मदत मिळवून देण्याच्या कृतीचे मोल पैशात करता येत नाही. अशा व्यक्तीचे प्राण वाचवण्यासाठी केलेली मदत ही 'अ-मूल्य' असते. कारण जीवन हीच सर्वांत मौल्यवान गोष्ट आहे. जीवनाच्या संदर्भातच इतर गोष्टींना मूल्य प्राप्त होत असते.

**चला करूया!**

गटांमध्ये 'मूल्ये' यावर संकल्पना चित्र तयार करा. सर्व गटांच्या संकल्पना चित्रांचे वर्गात प्रदर्शन भरवा.

### ५.४ मूल्यसंकल्पना आणि मूल्यांचे प्रकार

मूल्ये अनेक प्रकारची असतात. माणसाच्या मूलभूत गरजा, नैसर्गिक प्रेरणा, वासना, भावना, इच्छा यांची पूर्ती ज्यांमधून होते त्या सर्व गोष्टी मानवी जीवनासाठी महत्त्वाच्या असतात, म्हणजे त्यांना कुठल्या ना कुठल्या प्रकारचे मूल्य असते. त्याचप्रमाणे समाजाच्या स्वास्थ्यासाठी, सुरक्षेसाठी, विकासासाठी काही गोष्टी मूल्यवान असतात. मूल्यांचा व्यापक अभ्यास हा वैयक्तिक, आर्थिक, सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक, धार्मिक, आध्यात्मिक, नैतिक, सौंदर्यशास्त्रीय अशा खूप वेगवेगळ्या प्रकारच्या मूल्यांचा परामर्श घेतो.

नीतिमीमांसेत मुख्यतः नीतिमूल्यांचा विचार आणि अभ्यास केला जातो. नीतिमूल्ये व्यक्ती, व्यक्तीच्या प्रवृत्ती, हेतू, आकांक्षा आणि प्रामुख्याने कृती यांच्याशी संबंधित असतात. वस्तूंना किंवा त्यांच्या गुणधर्मांना नैतिक मूल्ये आहेत असे आपण मानत नाही. त्यांना मूल्य असते पण ते न-नैतिक प्रकारचे. समजा आपण भ्रमणध्वनी विकत घ्यायला गेलो, तर उपलब्ध असलेल्या अनेक प्रकारांमधून आपल्याला एक निवडावा लागतो. ही निवड आपण त्या भ्रमणध्वनीच्या न-नैतिक मूल्याच्या आधारे करतो. त्याची किंमत हे त्याचे आर्थिक मूल्य असते, तर त्याची माहिती साठवणूकीची क्षमता, त्यामध्ये मिळणाऱ्या निरनिराळ्या सुविधा, त्याचा हाताळायला सोपा असणारा आकार वगैरेंनी त्याचे उपयुक्तता मूल्य ठरते. त्याचे रूप, रंग, आकर्षकपणा, त्याचे सौंदर्यमूल्य निश्चित करतात. या निकषांच्या आधारे आपण निवड करतो. पण समजा आपण पुढे जाऊन असा विचार केला की, ज्या आस्थापनेत (कंपनी) बालकामगार घेतले जात नाहीत, जिचे निर्णय आणि धोरणे पर्यावरणस्नेही आहेत, अशाच आस्थापनेने तयार केलेला भ्रमणध्वनी मी विकत घेईन, तर तुमच्या या निर्णयाला, कृतीला नैतिक मूल्य असेल. हे मूल्य त्या वस्तूचे नाही, तुमच्या दृष्टीने महत्त्वाचे, चांगले धोरण राबवणाऱ्या त्या आस्थापनेचे आणि तुमच्या निर्णयाचे आहे.

**चला लिहूया!**

न-नैतिक व अनैतिक कृतींची उदाहरणे लिहा. एखादी कृती न-नैतिक वा अनैतिक ठरवण्याच्या निकषांची यादी करा.

या उदाहरणावरून आपल्या हे लक्षात येते की, मूल्यांचे नैतिक आणि न-नैतिक असे दोन प्रकार करता

येतात. आपण आधी पाहिल्याप्रमाणे नैतिक मूल्ये व्यक्ती, व्यक्तिमत्त्वाचे घटक, व्यक्तीच्या कृती यांच्याशी संबंधित असतात. पण या दोन प्रकारांमध्ये फरक करण्यासाठी एवढाच निकष पुरेसा नसतो. एखाद्या व्यक्तीला मी जेव्हा उत्तम खेळाडू किंवा प्रतिभावान कलाकार असे म्हणते, तेव्हा मी न-नैतिक मूल्यांच्या आधारे त्या व्यक्तीचे मूल्यमापन करत असते. मात्र, जेव्हा मी एखादी व्यक्ती खूप प्रामाणिक आहे किंवा खूप माणुसकीने वागणारी आहे असे म्हणते, तेव्हा मी हे मूल्यमापन नैतिक मूल्यांच्या संदर्भात केलेले असते. एखादया गोष्टीला मूल्य आहे की नाही हे ठरवण्याचे निकष न-नैतिक मूल्यांच्या आणि नैतिक मूल्यांच्या संदर्भांत वेगवेगळे असतात. आधीच्या उदाहरणात पाहिल्यानुसार सोय, उपयुक्तता, सौंदर्य इत्यादी निकष वस्तूंच्या, कृतींच्या, माणसांच्या प्रकारानुसार त्यांचे न-नैतिक मूल्य ठरवतात. माणसाचे आणि त्याच्या कृतीचे नैतिक मूल्य ठरवण्यासाठी मात्र त्या व्यक्तीचे हेतू आणि तिच्या कृतींचा इतर माणसांवर, समाजावर काय परिणाम होते, हे लक्षात घेणे गरजेचे असते. सर्वसाधारणपणे ज्या कृतींमधून इतरांच्या हिताला बाधा न आणता व्यक्तीचे, गटाचे किंवा समाजाचे हित साधले जाते, त्यांना नैतिक मूल्य आहे, असे मानले जाते.

'न-नैतिक' आणि 'अनैतिक' हे दोन्ही शब्द 'नैतिक' या शब्दाला नकारात्मक उपसर्ग लावून झालेले असले, तरी ते समानार्थी नाहीत. जे नीतिच्या परिघापलीकडचे आहे, नीती-अनीतीच्या दृष्टिकोनातून बघता येत नाही अशा गोष्टींसाठी न-नैतिक हा शब्द वापरला जातो. उदाहरणार्थ, भ्रमणध्वनी. अनैतिक हा

### न-नैतिक मूल्यांचे वर्गीकरण

आपल्या रोजच्या जगण्यात आपण वरचेवर वस्तूंचे, व्यक्तींचे मूल्यमापन करत असतो. बहुसंख्य वेळा हे मूल्यमापन म्हणजे त्या व्यक्तींच्या किंवा वस्तूंच्या न-नैतिक मूल्यांबद्‌दल काढलेल्या निष्कर्षाच्या स्वरूपाचे असते. त्यामध्ये मूल्याचा स्पष्टपणे उल्लेख येतोच असे नाही. कित्येक वेळा चांगले/वाईट हे शब्द त्यासाठी वापरले जातात. त्या शब्दांनी नक्की कुठले मूल्य सूचित होते आहे, ते वस्तुगणिक/व्यक्तिगणिक आणि परिस्थितीनुसार बदलते. 'चांगली सुरी' असे म्हणताना 'ती सुरी धारदार आहे' हे सहसा सूचित होते. पण पावाला लोणी लावण्याची सुरी बोथट असेल, तर चांगली असते. एखादा पदार्थ चांगला आहे या वाक्याचा अर्थ तो पदार्थ खराब झालेला नाही किंवा तो चविष्ट आहे किंवा तो पौष्टिक आहे किंवा तो पथ्यकर आहे यांपैकी काहीही असू शकतो. थोडक्यात, वस्तूंच्या/व्यक्तींच्या अनेक गुणधर्मांच्या संदर्भात आणि विशिष्ट परिस्थितीच्या चौकटीत त्यांचे न-नैतिक मूल्य ठरते. त्यामुळे त्यांची एक यादी करायचे ठरवले तर ती परिपूर्ण होऊच शकणार नाही. मात्र त्यांचे मुख्य दोन प्रकारांत वर्गीकरण करणे शक्य आहे. हे दोन प्रकार म्हणजे साध्यमूल्य आणि साधनमूल्य किंवा स्वतोमूल्य आणि परतोमूल्य. काही गोष्टींचे मूल्य हे दुसऱ्या कुठल्यातरी, बाह्य मूल्याच्या प्राप्तीसाठी साधन म्हणून असते. उदाहरणार्थ, सुरीचे मूल्य तिच्या धारदारपणावर ठरत असले, तरी धारदारपणाला मूल्य आहे ते त्यामुळे काहीतरी कापण्याचे सुरीचे कार्य उत्तम प्रकारे होते म्हणून. आजारपणात घ्यायच्या कडू औषधाला मूल्य येते, ते मुळात आरोग्याला असलेल्या मूल्यामुळे. आजारी नसताना आपल्या दृष्टीने त्या औषधाला त्या वेळी तरी मूल्य नसते. कशाचे तरी साधन म्हणून आरोग्याला मूल्य आहे असे तुम्हाला वाटते का? आपल्याला आयुष्यात ज्या ज्या गोष्टी मिळवाव्याशा वाटतात, त्या एवढ्यासाठी की त्यामुळे आपण सुखी होऊ अशी आपली कल्पना असते. त्यामुळे त्या गोष्टींच्या मूल्यांना 'परतोमूल्य' किंवा 'साधनमूल्य' असते असे म्हटले जाते. सुखाचे मूल्य मात्र त्याचे स्वतःचे आहे. पर किंवा इतर गोष्टींसाठी साधन असे त्या मूल्याचे स्वरूप नाही. त्यामुळे सुखाला 'साध्य मूल्य' किंवा 'स्वतोमूल्य' आहे.

शब्द नैतिक या शब्दाच्या विरुद्धार्थी शब्द आहे. जे नीतिमत्तेच्या विरुद्ध असते, त्याला अनैतिक म्हणतात. पण हे या वर्तनाचे नैतिक मूल्यमापनच असते. म्हणजेच अनैतिक हा शब्द नीतीच्या परिघातलाच शब्द आहे.

व्यक्ती किंवा कृती यांचे मूल्यमापन करताना रोजच्या व्यवहाराच्या भाषेत आपण नैतिक-अनैतिक हे शब्द वापरत नाही. त्याऐवजी आपण 'चांगले-वाईट', 'योग्य-अयोग्य' हे शब्द वापरतो. नीतिमीमांसेतसुद्धा हे शब्द उपयोगात आणले जातात. या शब्दांनाही नैतिक आणि अनैतिक अशा दोन प्रकारचे अर्थ असतात. त्यामुळे संभाषणात आपल्या किंवा इतरांच्या बोलण्यात, लिखाणात हे शब्द नक्की कुठल्या अर्थाने वापरले आहेत, त्यावर काटेकोरपणे लक्ष ठेवायला पाहिजे. 'चांगले-वाईट' हे शब्द आपण वस्तू, त्यांचे गुणधर्म, परस्परसंबंध, व्यक्ती, व्यक्तिमत्वाचे घटक, कृती या सगळ्यांचे विशेषण म्हणून वापरतो. आताच पाहिल्याप्रमाणे, नैतिक मूल्य फक्त व्यक्ती आणि व्यक्तीसंबंधित गोष्टींना असते. यांचे मूल्यमापन आपण चांगले/वाईट म्हणून करतो, तेव्हा आपण हे शब्द नैतिक अर्थाने वापरत असण्याची शक्यता असते. पण हे मूल्यमापन जर त्या व्यक्तीच्या किंवा कृतीच्या न-नैतिक मूल्याचा विचार करून केलेले असेल, तर ते शब्द नैतिक अर्थाने वापरले जात आहेत असे म्हणता येत नाही. 'चांगला भ्रमणध्वनी', 'चांगली खेळाडू', 'चांगला कलाकार'ही चांगले या शब्दाच्या न-नैतिक अर्थाची उदाहरणे आहेत. याउलट, 'चांगला माणूस' या उदाहरणात हा शब्द नैतिक अर्थाने वापरलेला आहे.

योग्य-अयोग्य या शब्दांनाही नैतिक आणि न-नैतिक अशा दोन्ही प्रकारचे अर्थ असतात. एखाद्या विषयाचे धडे पाठ करणे ही अभ्यासाची 'अयोग्य' पद्धत आहे, विषय समजून घेणे ही 'योग्य' पद्धत आहे. नुसत्या डोळ्यांनी दिसू न शकणाऱ्या सूक्ष्म गोष्टी बघण्यासाठी सूक्ष्मदर्शक हे 'योग्य' उपकरण आहे. जास्तीत-जास्त लोकांपर्यंत बातमी पोचवण्यासाठी आकाशवाणी हे 'योग्य' माध्यम आहे. या सगळ्या उदाहरणात योग्य हा शब्द न-नैतिक अर्थाने वापरला आहे. याउलट खोटे बोलणाऱ्या विद्यार्थ्याला शिक्षक म्हणतात, 'हे तू योग्य केले नाहीस' किंवा 'शेजारच्या वृद्ध काकांना सुखरूपपणे बँकेत पोचवण्यासाठी तू मदत केलीस हे योग्यच झाले' अशा वाक्यात 'योग्य' हा शब्द नैतिक अर्थाने उपयोगात आणला आहे. 'योग्य' शब्दाच्या न-नैतिक वापरात सहसा एखादी वस्तू, उपकरण, पद्धती किती कार्यक्षमतेने आपले कार्य करू शकतात यांचा विचार केलेला असतो. कधी कधी सर्वमान्य नियमांप्रमाणे केलेल्या वर्तनाला योग्य तर नियम मोडून केलेल्या वर्तनाला अयोग्य म्हटले जाते. घरी आल्यावर आधी हातपाय स्वच्छ धुवावेत, हा एक आरोग्यविषयक नियम आहे. हा नियम पाळून केलेले वर्तन 'योग्य' असते. सर्वसाधारणपणे, नीतिनियमांच्या आधारे जेव्हा वर्तन योग्य किंवा अयोग्य ठरवले जाते, तेव्हा या शब्दांचा नैतिक अर्थ अभिप्रेत असतो. या शब्दांच्या नैतिक अर्थाची जी उदाहरणे आपण पाहिली, ती 'खोटे बोलू नये,' 'गरजू व्यक्तींना शक्य ती मदत करावी' या नियमांशी संबंधित आहेत हे तुम्हाला समजलेच असेल.

**चला करूया!**

८ ते १० जणांचा गट गोलात उभा राहील. एक चेंडू हातात घेऊन पहिला विद्यार्थी नैतिक कृतीचे उदाहरण सांगेल. नंतर तो चेंडू गोलातील कोणत्याही विद्यार्थ्याकडे टाकेल. ज्याच्या हातात चेंडू असेल त्याने उदाहरण कृतीचा प्रकार ओळखायचा. (नैतिक, न-नैतिक, अनैतिक). नंतर त्याने नवे उदाहरण सांगायचे आणि चेंडू दुसऱ्याकडे टाकायचा. या खेळाने कृतींचे प्रकार आणि उदाहरणे यांच्या संकल्पना सुस्पष्ट होण्यास मदत होते का? ते पाहू.

'चांगले', 'योग्य' या शब्दांप्रमाणेच दैनंदिन व्यवहारात नीतिमीमांसेत वरचेवर वापरला जाणारा शब्द आहे 'कर्तव्य'. कर्तव्ये कौटुंबिक, सामाजिक, राजकीय अशी अनेक प्रकारची असू शकतात. एखाद्या कृतीला 'कर्तव्य' म्हणताना त्यामध्ये ती कृती काही झाले तरी केलीच पाहिजे असा आग्रह असतो. आपली इच्छा असो वा नसो, कर्तव्य हे पार पाडायलाच हवे असा काहीसा सक्तीचा सूर या शब्दात दिसतो. त्यामुळेच की काय तुम्हाला कोणी तुमच्या कर्तव्याची जाणीव करून दिली, तर तुम्ही थोडे नाराज होता. अनेक वेळा ती नाराजी त्या विशिष्ट कृतीबद्दल नसते, तर त्यासाठीच्या सक्तीबद्दल असते. आई-बाबा बाहेर जाताना धाकट्या भावंडाची काळजी घ्यायला सांगून जातात. 'तू मोठे भावंड असल्यामुळे तुझे ते कर्तव्य आहे' असे सांगितले की तुमच्या कपाळावर नाखुषीची आठी उमटते. खरे म्हणजे तुमचे तुमच्या भावंडावर प्रेम असतेच, वेळप्रसंगी त्याला/तिला सर्वतोपरी मदत करायचीही तुमची तयारी असते. पण त्याची सक्ती तुम्हाला आवडत नाही. खरे तर कर्तव्य करणे म्हणजे आपली जबाबदारी व्यवस्थितपणे पार पाडणे. प्रत्येक कुटुंबात, संस्थेत, समाजात प्रत्येकाने आपापली जबाबदारी नीट उचलली तरच सगळे व्यवहार सुरळित चालू शकतात. जबाबदारी म्हटले की बंधनेही आलीच. समजा, तुम्ही महाविद्यालयातील स्नेहसंमेलनात एखादा कार्यक्रम सादर करण्याची जबाबदारी घेतली, तर त्यासाठी पुरेसा वेळ देण्याचे, कसून तयारी करण्याचे बंधन तुमच्यावर येणारच ना? ते बंधन तुम्ही मनापासून स्वीकारून कार्यक्रम सादर केला तरच तो यशस्वी होऊ शकेल, हे तुम्हालाही माहिती असते. थोडक्यात सांगायचे तर बंधने, जबाबदाऱ्या, कर्तव्ये स्वीकारण्यानेच आपली म्हणजे व्यक्तीची आणि समाजाची वाटचाल आपल्या ध्येयाच्या दिशेने होऊ शकते.

आतापर्यंतच्या विवेचनात आपण 'चांगले', 'योग्य', 'कर्तव्य' या शब्दांचा नैतिक अर्थाने वापर करणे म्हणजे काय हे समजून घेतले. नीतिमीमांसेच्या अभ्यासाचा पुढला टप्पा एखादी कृती नैतिकदृष्ट्या 'चांगली' किंवा 'योग्य' आहे हे ठरवण्यासाठी कुठले निकष उपयोगात आणले पाहिजेत यासंबंधीच्या विचारांचा असतो. कशाला नीतिमूल्य आहे? कुठली कृती व्यक्तीचे नैतिक कर्तव्य ठरते? कुठल्या नियमांच्या आधारे? या प्रकारच्या प्रश्नांना उत्तर म्हणून तत्त्वज्ञांनी अनेक सिद्धान्त, तत्त्वे, संकल्पना सुचवल्या आहेत. या सगळ्यांचे चिकित्सक परीक्षण करणे हे नीतिमीमांसेचे कार्य असते. हे कार्य कधीच पूर्णत्वाला जात नाही. काही मूलभूत नीतिमूल्ये सर्व काळात लागू होऊ शकत असली तरी बदलत्या परिस्थितीनुसार काळाने उभ्या केलेल्या नवीन आव्हानांच्या संदर्भात आपल्याला त्यांच्या उपयोजनांबद्दल नव्याने विचार करावा लागतो. कधी काही फेरफार करावे लागतात. क्वचित नव्या मूल्यांचा समावेशही करावा लागतो. नीतिमीमांसा ही अशी एक निरंतर चालणारी प्रक्रिया आहे.

**शब्दसूची**

वैचारिक प्रयोग - Thought experiment
नीतिमीमांसा - Ethics/Moral philosophy
अभ्यासविषय - Object of study
वर्तन - Behaviour
तथ्ये - Facts
आचरण - Conduct
मूल्यमापन - Evaluation
प्रतिक्षिप्त क्रिया - Reflexive actions
यांत्रिक - Mechanical
क्रिया - प्रतिक्रिया - Actions- reactions
ऐच्छिक - Valuntary
अनैच्छिक - Non-valuntary

| | |
|---|---|
| इच्छा-स्वातंत्र्य - Freedom of will | अनैतिक - Immoral |
| हितसंबंध - Interests | भ्रमणध्वनी - Mobile / Cell phone |
| अनागोंदी/अनवस्था - Lack of system | चांगले - Good |
| मूल्य - Value | वाईट - Bad |
| किंमत/दर/भाव - Price | योग्य - Right |
| सौंदर्यशास्त्र - Aesthetics | अयोग्य - Wrong |
| आध्यात्मिक - Spiritual | कर्तव्य - Duty/obligation |
| न-नैतिक - Amoral /non moral | उपयुक्तता - Utility |
| नैतिक - Moral | सद्‌गुण - Virtue |

## स्वाध्याय

**प्र.१ कंसांतील योग्य पर्याय निवडून पुढील विधाने पूर्ण करा.**

(अ) माणसाला ........... असल्यामुळे तो चांगल्या कृती करण्याची शक्यता असते.
(अभिव्यक्तीस्वातंत्र्य, इच्छास्वातंत्र्य, मतस्वातंत्र्य)

(ब) नीतिमीमांसेच्या अभ्यासविषयामध्ये वर्तन आणि त्याचे ........... याचा अभ्यास केला जातो.
(कलामूल्य, नैतिकमूल्य, उपयुक्ततामूल्य)

(क) निर्जीव गोष्टींच्या क्रिया-प्रतिक्रिया ........... नुसार होतात.
(निसर्गनियम, समाजनियम, नीतिनियम)

**प्र.२ गटातील वेगळा शब्द/जोडी ओळखून लिहा.**

(अ) चांगले - वाईट, कायदेशीर - बेकायदेशीर, योग्य - अयोग्य, न्याय्य - अन्याय्य.

(ब) सौंदर्य, चांगले, सद्‌गुण, कर्तव्य.

**प्र.३ फरक स्पष्ट करा.**

(अ) नैतिक व न-नैतिक मूल्ये.

(ब) ऐच्छिक व अनैच्छिक कृती

**प्र.४ टीपा लिहा.**

(अ) सद्‌गुण

(ब) कर्तव्य

(क) कृतींचे प्रकार

**प्र.५ खालील प्रश्नांची २० ते २५ शब्दांत उत्तरे लिहा.**

(अ) ऐच्छिक कृती म्हणजे काय?

(ब) नीतिमीमांसा म्हणजे काय?

(क) इच्छास्वातंत्र्य म्हणजे काय?

(ड) मानवी जीवनात नियमांचे महत्त्व काय आहे?

**प्र.६ खालील विधानांचे उदाहरणासहित स्पष्टीकरण करा.**

(अ) मानवी वर्तनाचा अभ्यास करणाऱ्या नीतिमीमांसा व मानसशास्त्र या दोहोंच्या दृष्टिकोनात फरक आहे.

(ब) नियमांचा अभाव अनावस्थेला कारणीभूत ठरतो.

**प्र.७ पुढील प्रसंगावर संवाद लिहा.**

(अ) समजा तुम्ही परिक्षेला जात आहात आणि अपघात झालेला पाहिला, तर काय करावे, याचा निर्णय घेणे.

(ब) ७५% उपस्थिती आवश्यक आहे त्यामुळे मित्र अनुपस्थित असूनही राजेशने त्यांची उपस्थिती नोंदवली.

**उपक्रम**

तुमच्या कुटुंबीयांनी तुमच्यासाठी ठरवून दिलेला एखादा नियम जो तुम्हाला जाचक वाटतो, तो नियम घरात का केलेला आहे, याबाबत कुटुंबातील सदस्यांशी चर्चा करा.

***

# ६. विज्ञान, तंत्रज्ञान आणि तत्त्वज्ञान

६.१ विज्ञान आणि तत्त्वज्ञान यांचा सहसंबंध
६.२ तंत्रज्ञानाने उभे केलेले प्रश्न
६.३ विज्ञान आणि तंत्रज्ञान यांच्यातील सहसंबंध
६.४ पर्यावरणीय तत्त्वज्ञान आणि शाश्वत विकास संकल्पनेची ओळख
६.५ विज्ञान, तंत्रज्ञानासंबंधी तत्त्वज्ञानाची बदलती भूमिका.

## प्रस्तावना

विज्ञान आणि तंत्रज्ञान हे आजच्या काळातील परवलीचे शब्द आहेत. तंत्रज्ञानाने आपले जीवन व्यापलेले आहे. तंत्रज्ञानाच्या भलेबुरेपणाची चर्चा आपण नेहेमीच करत असतो. विज्ञान हा काही केवळ शाळा-महाविद्यालयीन अभ्यासक्रमातील विषय नाही. विज्ञान म्हणजे काय आणि ते जाणून घेतल्याने आपल्यावर नेमका कोणता परिणाम होऊ शकतो हे जाणून घेणे तत्त्वज्ञानाच्या विद्यार्थ्यांसाठी आवश्यक आहे. प्रस्तुत पाठात विज्ञान, तंत्रज्ञान आणि तत्त्वज्ञान या तीनही विषयांचे स्वरूप आणि त्यांचा एकमेकांशी असलेला संबंध स्पष्ट केला आहे. एकदा त्यांचे स्वरूप आणि आपापसातले नाते कळले म्हणजे आज आपल्या आजूबाजूला तंत्रज्ञानविषयक जे काही प्रश्न उभे राहिलेले दिसतात त्यांच्याकडे बघण्याचा दृष्टीकोन तयार होतो.

## ६.१ विज्ञान आणि तत्त्वज्ञान यांचा सहसंबंध

तत्त्वज्ञानाच्या वाटचालीचा ऐतिहासिक आढावा घेतला तर असे लक्षात येते की, काळानुरूप तत्त्वज्ञान विचारात घेत असलेले प्रश्न आणि त्यांना सुचवत असलेली उत्तरे यात फरक पडत गेला आहे. आधुनिक विज्ञानाचा उदय हा तत्त्वज्ञानाच्या प्रवासातला एक निर्णायक टप्पा आहे. गेल्या काही शतकांमध्ये 'काय आहे?' या सत्तामीमांसेतील मध्यवर्ती प्रश्नाचे उत्तर विज्ञानाने बऱ्याच अंशी मिळवलेले आहे. 'जे आहे ते कळते कसे?' याचे कोडे उलगडण्याकडे आजच्या विज्ञानाचा प्रवास खूप वेगाने चालू आहे. यामुळे आताच्या काळात तत्त्वज्ञानाचा अभ्यासविषय कोणता आहे? तत्त्वज्ञान आणि विज्ञान यांचा नेमका संबंध काय आहे? असे प्रश्न तत्त्वज्ञानाच्या अभ्यासकांना पडतात.

यासंबंधात वेगवेगळ्या तत्त्वज्ञांची मते वेगवेगळी आहेत. विज्ञान हे अनुभवाला येणाऱ्या भौतिक सृष्टीचा अभ्यास करते हे आपल्याला माहितीच आहे. भौतिक जग एवढेच वास्तव आहे असे मानणाऱ्यांना या जगाचे ज्ञान वैज्ञानिक पद्धती वापरूनच होऊ शकते हे सहसा मान्य असते. त्यांचे नीतिविषयक विचारही त्यांच्या जडवादी, विज्ञानवादी दृष्टिकोनावर आधारित असतात. त्यांना कुठलाही पारलौकिक संदर्भ नसतो.

काही तत्त्वज्ञ मात्र असे मानतात की, जे इंद्रियांच्या अनुभवाच्या कक्षेत येत नाही, ते अस्तित्वातच नाही असे म्हणायला भक्कम आधार नाही. त्यांच्या मते या जगाच्या पलीकडे अनुभवातीत म्हणजे ज्ञानेंद्रियांच्या अनुभवाच्या मर्यादांच्या पार असलेले अमूर्त, अतींद्रिय वास्तव आहे. त्यामुळे या वास्तवाचा, सत्‌चा अभ्यास विज्ञानाच्या कक्षेत येत नाही. 'काय आहे' या सत्तामीमांसेतील प्रश्नाचे त्यांचे उत्तर जडवाद नाकारते. त्याचमुळे 'कळते कसे' या ज्ञानमीमांसेतील प्रश्नाच्या संभाव्य उत्तराचीही ते वेगळी मांडणी करतात. अतींद्रिय वास्तवाचे ज्ञान होऊ शकते का? होऊ शकत असेल, तर कसे? त्यासाठी अंतःप्रज्ञा, गूढ अनुभूती यांना ज्ञानसाधने म्हणता येईल का हे प्रश्न विचारात घ्यावे लागतात. अतींद्रिय वास्तवाचे ज्ञान मिळवणे आणि त्या ज्ञानाच्या

आधारे जीवन कसे जगावे हे सांगण्याचे कार्य तत्त्वज्ञानाचे आहे अशी या तत्त्वचिंतकांची धारणा आहे. या अतींद्रिय वास्तवाशी माणसाचे काय नाते आहे हे समजल्याशिवाय, माणसाचे कल्याण कशात आहे आणि ते कसे साध्य करावे हे आपल्याला उमगणार नाही असे त्यांना वाटते. थोडक्यात, विज्ञानाची उपयोगिता आणि मूल्य मान्य करूनही, हे तत्त्वज्ञ असे मानतात की विज्ञानाला काही स्वाभाविक मर्यादा आहेत. तत्त्वज्ञान सत्तामीमांसा आणि ज्ञानमीमांसा या क्षेत्रातही काही वेगळे योगदान देऊ शकते.

भौतिक जगाचे सांगोपांग ज्ञान देणारे अभ्यासक्षेत्र म्हणून विज्ञानाला सर्वमान्यता मिळाल्यानंतर ज्ञानमीमांसेत विज्ञानाच्या पद्धतीशास्त्राची चर्चा खूप मोठ्या प्रमाणात चालू झाली. वैज्ञानिक पद्धती म्हणजे नक्की काय? तिची बलस्थाने आणि मर्यादा कोणत्या? ज्ञानाच्या सर्वच क्षेत्रांमध्ये या पद्धतीचा वापर शक्य आहे का? अशा प्रश्नांचा ऊहापोह सुरू झाला. निसर्गविज्ञानाच्या प्रगतीच्या प्रभावाखाली सामाजिक विज्ञानांचा विकास व्हायला लागला, तेव्हा या दोन्हींची पद्धत एकच असू शकते का, असावी का याबद्दल ज्ञानमीमांसेमध्ये खूप विचारमंथन सुरू झाले. पूर्वीच्या पाठात आपण मानव्यविद्या म्हणजे काय याची ओळख करून घेतली. या विद्यांमध्ये निसर्गविज्ञानाच्या पद्धतींचा अवलंब होत नाही, असे असताना ज्ञानाच्या एकूण क्षेत्रात या विद्यांचे स्थान काय आहे असाही प्रश्न निर्माण झाला.

वरील विवेचनातून हे सूचित होते की, विज्ञानाने तत्त्वज्ञानात विचारल्या जाणाऱ्या प्रमुख प्रश्नांचा ऊहापोह यशस्वीपणे केला हे खरे! तरीही काळानुरूप प्रवाही राहण्याच्या तत्त्वज्ञानाच्या गुणधर्मामुळे सत्तामीमांसा, ज्ञानमीमांसा या तत्त्वज्ञानाच्या शाखा आजही महत्त्वाच्या आहेत. तत्त्वज्ञानातील प्रश्नांना विज्ञानाने दिलेल्या उत्तरांची परस्परांशी सांगड घालून जगाकडे बघण्याचा एक सुसंगत, समावेशक दृष्टिकोन निर्माण करणे आणि त्या दृष्टिकोनाच्या आधारे एक जीवनदृष्टी निर्माण करणे हे आज तत्त्वज्ञानाचे एक उद्दिष्ट आहे. या जीवनदृष्टीचा एक महत्त्वाचा भाग अर्थातच मूल्यविचारांचा आहे. नीतिमीमांसा, सौंदर्यमीमांसा अशा तत्त्वज्ञानाच्या शाखांमध्ये हा मूल्यविचार प्रामुख्याने केला जातो. एकविसाव्या शतकात जगताना आपल्यापुढे जे महत्त्वाचे प्रश्न उभे राहिले आहेत ते या ना त्या प्रकारे विज्ञान आणि तंत्रज्ञान यांनी केलेल्या प्रगतीशी निगडित आहेत. त्यामुळे हे प्रश्न समजून घेण्यासाठी आणि त्यांच्याबद्दलची नैतिक भूमिका निश्चित करण्यासाठी मुळात आपण विज्ञान आणि तंत्रज्ञानाचे स्वरूप पुरेसे समजावून घेतले पाहिजे. तरच या प्रश्नांच्या मुळापर्यंत आपण पोहचू शकू आणि योग्य उत्तराची दिशा आपल्याला सापडू शकेल.

## ६.२ तंत्रज्ञानाने उभे केलेले प्रश्न

विज्ञान आणि तंत्रज्ञान यांनी प्रभावित जगात आज आपण राहतो. तंत्रज्ञानाने आपले जीवन व्यापलेले आहे. तंत्रज्ञानाच्या भलेबुरेपणाची चर्चा आपण नेहमीच करत असतो. तंत्रज्ञानाने जग जवळही आले आणि लांबही गेले. माणसे मोबाइलमध्ये डोके खुपसून बसली आहेत आणि कुणी-कुणाशी बोलत नाही असे दृश्य आपण नेहमी बघतो. आपण रस्त्यावरचे अपघात बघतो. तंत्रज्ञानाने आपल्याला कधी नाही एवढा वेग साध्य करून दिला. पण तो वेगच जिविताला मारक ठरतो आहे.

आज अस्त्रांची संहारकता देखील 'न भूतो' अशा प्रकाराने वाढलेली आहे. अशा अस्त्रांच्या प्रयोगाची शक्यता ही मानव जातीसमोर उभी असलेली मोठी भीती आहे.

प्रदूषणाचाही प्रश्न आहेच. कचऱ्याने आपला भवताल व्यापला आहे. आपले नैसर्गिक स्रोत खराब होत चालले आहेत, नष्ट होत चालले आहेत. अनेक प्रजाती नष्ट होण्याच्या मार्गावर आहेत. या सगळ्याचा

परिणाम माणसाच्या जीवनमानावर होतो आहे, आरोग्यावर होतो आहे.

हे आणि असे अनेक प्रश्न आपल्या कानावर नेहमीच पडत असतात. विज्ञान आणि तंत्रज्ञान यांचा जवळचा संबंध आहे हे आपण जाणतो. परंतु तंत्रज्ञानाने उभे केलेले प्रश्न समजावून घेताना विज्ञान म्हणजे नेमके काय आणि तंत्रज्ञान म्हणजे तरी नेमके काय हे जाणून घेणे आवश्यक आहे.

या पाठात विज्ञान, तंत्रज्ञान आणि तत्त्वज्ञान या तीनही विषयांचे स्वरूप आणि त्यांचा एकमेकांशी असलेला संबंध जाणून घेणार आहोत. एकदा त्यांचे स्वरूप आणि आपापसातले नाते कळले म्हणजे आज आपल्या आजूबाजूला तंत्रज्ञान, निसर्ग आणि माणूसविषयक जे काही प्रश्न उभे राहिलेले दिसतात त्यांच्याकडे बघण्याचा दृष्टिकोन तयार होतो.

आतापर्यंत, तत्त्वज्ञानात कोणते प्रश्न अभ्यासले जातात ते आपण पाहिले. काय आहे, ते कळते कसे आणि या दोन प्रश्नांच्या आकलनाने आपली कृती कशी प्रभावित होते हे आपण पाहिले. हे देखील पाहिले की प्रत्येक काळात या प्रश्नांची उत्तरे वेगवेगळी दिली गेली.

एकेकाळी निर्माण झालेल्या पुराकथा 'काय आहे' या प्रश्नाचे 'खरे' उत्तर देण्यासाठीच निर्माण झाल्या. आजच्या काळात, थॉरच्या पुराकथेने केलेली पावसाची कारणमीमांसा आपल्याला कल्पनेच्या राज्यातली सफर वाटेल. आपण तिचा पावसाचे 'वास्तव कारण' म्हणून स्वीकार करणार नाही. कारण आता विज्ञानाने पाऊस का आणि कसा पडतो याची वेगळी कारणमीमांसा दिलेली आहे. ती कारणमीमांसा सगळ्यांना पडताळून बघता येण्यासारखी असल्यामुळे जास्तीत जास्त लोकांना स्वीकारार्ह वाटते.

(विज्ञान हा शब्द इथे निसर्गविज्ञान (natural sciences) या अर्थाने वापरलेला आहे.)

| विज्ञान | तंत्रज्ञान | विज्ञान व तंत्रज्ञानाचे तत्त्वज्ञान |
|---|---|---|
| निसर्ग नियमांचा अभ्यास | भौतिक पदार्थांवर केली जाणरी प्रक्रिया | विज्ञान व तंत्रज्ञान या दोन्हींचे स्वरूप, कार्य आणि उद्‌दिष्टाची चिकित्सा |

## वस्तुनिष्ठ, व्यक्तिनिष्ठ आणि आंतरव्यक्तिनिष्ठ वास्तव

विज्ञान म्हणजे वस्तुनिष्ठ वास्तवाविषयीच्या नियमांचा अभ्यास. **वस्तुनिष्ठ वास्तव** म्हणजे काय? सगळ्यांना पडताळणीची शक्यता असली म्हणजे आपण त्या वास्तवाला वस्तुनिष्ठ वास्तव असे म्हणू शकतो. असे वास्तव केवळ कुण्या एकाच्या मनातली कल्पना नसते किंवा सगळ्यांनी मिळून विश्वास ठेवला आहे अशीही कुठली कल्पना नसते. पंचेंद्रिये आणि साधने (उपकरणे) वापरून जे कोणालाही पडताळून बघता येते त्याला वस्तुनिष्ठ जग किंवा वास्तव असे म्हणता येते.

समजा कुणी असे म्हणाला की त्याला इतका आनंद झालाय की तो तरंगतो आहे तर आपण असं नाही म्हणत की, 'असा कसा तरंगतो आहे? तो तर चांगला बसलेला दिसतो आहे, गुरुत्वाकर्षण शक्ती त्याच्यावर काम करते आहे.' पण आपण तो खरेच तरंगतो आहे असेही म्हणत नाही. आपल्याला हे समजते की ती त्याची **व्यक्तिनिष्ठ भावना** आहे किंवा आनंद व्यक्त करण्याची पद्‌धत आहे.

वस्तुनिष्ठ, व्यक्तिनिष्ठ याप्रमाणेच **आंतरव्यक्तिनिष्ठ** वास्तव असते. याचे अस्तित्व अनेक व्यक्तींनी मानण्यावर अवलंबून असते.

उदाहरणार्थ, चलन. आपण जी कागदी नोट चलन म्हणून वापरतो त्यातील कागद ही भौतिक वस्तू असली तरी त्या कागदाला मिळालेले मूल्य हे आंतरव्यक्तिनिष्ठ वास्तवाचा भाग आहे. सगळ्यांना मान्य असलेले ते मूल्य असले तरी ते गुरुत्वाकर्षणशक्ती प्रमाणे निसर्गाचा, वास्तव जगाचा भाग नसते. माणसांनी ठरवलेले, मानलेले मूल्य असते. यामुळे त्यात बदल होऊ शकतात. काय वस्तुनिष्ठ आहे आणि काय मानीव हे कळले म्हणजे काय बदलू शकते आणि काय नाही हे आपल्याला कळते.

**चला बोलूया!**

वस्तुनिष्ठ, व्यक्तिनिष्ठ आणि आंतरव्यक्तिनिष्ठ वास्तवाची उदाहरणे आपल्या सहाध्यायीला सांगा.

## विज्ञानाचा प्रवास

विज्ञान असे नियम शोधते की जे सर्वत्र लागू होतात, सर्व काळात लागू होतात. त्यांना 'सार्वत्रिक (वैश्विक) निसर्गनियम' असेच म्हणतात.

पण वस्तुनिष्ठ जगातील असे नियम हाती येणे हे एकदम घडले नाही. कल्पनेच्या जगातून वस्तुनिष्ठ जगाकडे येण्याचा आपला एक प्रवास आहे. याला विज्ञानाची वाटचाल असे म्हणता येईल. पुराकथा, धार्मिक समजुती आणि तत्वज्ञान यांतून विज्ञानाने आपली वाट वेगळी केली. तुम्हाला माहीत आहे, पूर्वी माणसांच्या काही प्रचलित समजुती होत्या आणि त्यांना धार्मिक मान्यताही होती. उदाहरणार्थ, पृथ्वी स्थिर असून सूर्य पृथ्वीभोवती फिरतो अशी समजूत होती. सोळाव्या शतकात गॅलिलिओने या समजुतीला धक्का दिला. गॅलिलिओला यासाठी पुष्कळ त्रास सहन करावा लागला. अशा अनेक प्रचलित अवास्तव कल्पना आणि समजुती यांमधून विज्ञानाने खरे काय आहे हे दाखवून दिले आहे.

परंतु आजही विज्ञानमत हे काही सर्वमान्य मत नाही. आजही वस्तुनिष्ठ जगातील प्रश्नांना कल्पनेच्या जगातली उत्तरे दिली जातात, माणसे बरे होण्यासाठी मांत्रिकाकडे जातात, जादूटोण्यावर विश्वास ठेवतात, मांजर आडवे जाण्याला अशुभ मानतात, हे आपण पाहतो. अशावेळी विज्ञान म्हणजे काय, ते काम कसे करते, त्याने आजवर कोणती माहिती आपल्यासमोर ठेवली आहे, तिचा वापर कसा होतो, त्याने आपले जीवन कसे प्रभावित होते हे जाणून घेणे गरजेचे आहे.

विज्ञानाने जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात, 'काय आहे' आणि 'ते कळते कसे' याची उत्तरे पुष्कळ अंशी दिली आहेत. भौतिक विज्ञानाने हे सांगितले आहे की विश्व कणांचे बनले आहे. त्या कणांमध्ये क्रिया-प्रतिक्रिया चालतात. त्यातून मूलद्रव्ये (elements) बनतात. जीवशास्त्राने हे सांगितले आहे की भौतिक पदार्थांतूनच पृथ्वीवरील पहिल्या सजीव रेणूची (डीएनए) निर्मिती झाली. सजीव सृष्टीची वाटचाल कशी होते हे उत्क्रांतीच्या नियमाने सांगितले.

अजूनही विज्ञानाचा प्रवास चालूच आहे. विश्वाचा पसारा समजावून घेणे, अणूचे अंतरंग उलगडणे अजूनही पुरते झालेले नाही. हा प्रवास म्हटले तर न संपणारा आहे. विज्ञानाने कुठे थांबावे हा प्रश्न काही विज्ञानाच्या अखत्यारीतला नाही. मूलभूत नियमांचा उलगडा झाल्यानंतरही विज्ञानाची वाटचाल चालूच राहिली. त्या वाटचालीचे उद्दिष्ट ठरवणे ही गोष्ट काही विज्ञानाच्या प्रांतातली नाही. याचा विचार तत्वज्ञानात केला जातो.

तंत्रज्ञान आणि विज्ञान यांचा जवळचा संबंध आहे असे दिसते. काही वेळा तर तंत्रज्ञान म्हणजेच विज्ञान अशीही समजूत आढळून येते. आपण तंत्रज्ञानाने वेढलेल्या जगात राहतो. जीवनाचा असा कोणताही कोपरा नाही जो तंत्रज्ञानाने स्पर्शिलेला नाही. तंत्रज्ञान नसेल तर आपण कसे जगू असा प्रश्न कुणालाही पडेल. आपण हेही अनुभवतो की तंत्रज्ञान कधी सुखावह होते तर कधी दुःखकारक. कधी ते तारक ठरते तर कधी मारक. अशा परिस्थितीत तंत्रज्ञानविषयक धोरण काय असावे हे देखील ठरवावे

लागते. तंत्रज्ञानाने उभे केलेले प्रश्न तंत्रज्ञानच सोडवू शकते की त्यासाठी त्याला विज्ञान आणि तत्त्वज्ञानाची गरज आहे? या प्रश्नाची उकल करण्यासाठी आधी तंत्रज्ञानाची नीट ओळख करून घेऊया. विज्ञान आणि तंत्रज्ञान यांच्यातील सहसंबंध तपासूया आणि तत्त्वज्ञान या दोन्हींच्या बाबतीत कोणती भूमिका घेते हे बघूया.

**चला जमवूया!**

तंत्रज्ञान तारक वा मारक ठरले अशा आशयाच्या घटनांचा वृत्तांत मिळवा व त्याचे भित्तिपत्रक तयार करून वर्गात लावा.

**तंत्रज्ञान म्हणजे काय?**

तंत्रज्ञान म्हणजे द्रव्यावर (कच्चा माल किंवा matter) केली जाणारी प्रक्रिया.

उदा., मातीचे मडके, लाकडाचा तराफा, लोकरीचे वस्त्र या सगळ्यांमध्ये मूळ द्रव्यावर कमी-अधिक प्रमाणात प्रक्रिया केलेली दिसते. आदिमानवाने जेव्हा दगड तासले आणि त्यापासून दगडी कुऱ्हाड बनवली तेव्हा ते तंत्रज्ञानच होते. शेतीसाठी जमीन सपाट करणे हे देखील तंत्रज्ञानच. तिथपासून सुरुवात करून आजच्या स्मार्टफोनपर्यंत सारे काही या अर्थाने तंत्रज्ञान आहे.

**चला लिहूया!**

दैनंदिन जीवनातील तंत्रज्ञानाच्या वापराची उदाहरणे लिहा.

## ६.३ विज्ञान आणि तंत्रज्ञान यांचा संबंध

माणूस जेव्हा दगडाची अवजारे बनवत होता तेव्हा त्याला निसर्गनियम कोणते आहेत आणि ते कसे काम करतात याची कल्पना होती का? त्याची जरुरी नव्हती. त्यांच्या आकलनाशिवायही दगडावर प्रयोग करत राहून अवजार बनू शकते, तंत्रज्ञान पुढे जाऊ शकते. परंतु द्रव्यावर असे प्रयोग करत असतानाच द्रव्यविषयक काही मूलभूत तथ्ये माणसांच्या लक्षात येऊ लागली. उदा., अनेक तऱ्हांच्या पदार्थांवर काम करता करता पृथ्वीवर ११८ मूलद्रव्ये आहेत हे कळले. त्यांचीच विविध मिश्र रूपे आणि विविध अवस्था आपल्याला आजूबाजूला बघायला मिळतात. आपण हे आवर्तसारणीच्या माध्यमातून जाणतो. पदार्थांवर केली जाणारी प्रक्रिया हा तंत्रज्ञानाचा भाग आहे. पण आवर्तसारणी हा मूलभूत विज्ञानाचा भाग आहे.

**चला शोधूया!**

आवर्तसारणी म्हणजे काय? आवर्तसारणीचे महत्त्व काय?

एकदा आवर्तसारणी हाती आल्यावर तिचा उपयोग विविध तऱ्हांनी होऊ शकतो हे लक्षात आले. हे पदार्थ एकमेकांबरोबर कसे मिसळणार, त्यांचे गुणधर्म काय असणार हे समजणे सोपे झाले. यातून तंत्रज्ञानाने नव्या वाटा चोखाळल्या. याचप्रमाणे गुरुत्वाकर्षणाचा नियम समजल्यावर अवकाशात उपग्रह पाठवणे शक्य झाले. तंत्रज्ञान आणि विज्ञान यांची जोडगोळी अशी काम करते. एकमेकांना प्रभावित करते.

### तंत्रज्ञान आणि माणूस

आपण मगाशी पाहिले की तंत्रज्ञान म्हणजे द्रव्यावर केली जाणारी प्रक्रिया. ही प्रक्रिया काही आपली आपण होत नाही. तिच्यासाठी कुणालातरी काम करावे लागते. दुसरे असे की प्रक्रिया करताना त्या प्रक्रियांचा भाग म्हणून काही उपपदार्थांची निर्मिती (by-products) अटळ असते. उदाहरणार्थ, चुलीवर पाणी गरम करायचे तर धूर, राख हे उपपदार्थ निर्माण होतात. नकोशा उपपदार्थांना आपण 'कचरा' म्हणून संबोधतो. किंवा आपण गाडी चालवतो तेव्हा पेट्रोल/डीझेलच्या ज्वलनातून धूर निर्माण होतो. हा धूर आपल्याला त्रास देतो म्हणून आपण त्याला प्रदूषण म्हणतो. इलेक्ट्रिक वाहने आपल्या डोळ्यांसमोर धूर करत नाहीत. त्यामुळे आपल्याला ती स्वच्छ वाटतात. पण वीजआधारित तंत्रज्ञानासाठी आपल्या डोळ्यांच्या

पलीकडे खूप जास्त प्रमाणात संसाधनांची उलथापालथ होत असते, प्रदूषणात प्रचंड भर पडत असते. तंत्रज्ञान जितके गुंतागुंतीचे तितके उपपदार्थ अधिक. मग त्यांची विल्हेवाट लावणे आले. या सगळ्यांत शारीरिक/मानसिक हानीलासुद्धा तोंड द्यावे लागते.

**चला बोलूया!**

वस्तू तयार करताना निर्माण होणाऱ्या उपपदार्थांच्या उदाहरणांची गटात चर्चा करा.

गुंतागुंतीच्या तंत्रज्ञानातील अनेक टप्पे आणि त्यातून उत्पन्न होणाऱ्या समस्या आपल्याला माहीत नसतात. परिणामी आपण करतो आहोत ते कष्ट आणि सोसतो आहोत ती हानी आपल्याला नेमके काय मिळवून देते आहे हे ठरवता येत नाही. तंत्रज्ञानाकडून आपल्या काय अपेक्षा असतात? सुरक्षितता, आराम आणि मनोरंजन. आपण घरात राहतो. घर आपल्याला नैसर्गिक अनिश्चिततेपासून सुरक्षितता देते. पंखा आराम देतो. टीव्ही रंजन करतो. यासाठी आपण काही किंमतही देतो. किंमत म्हणजे कष्ट आणि हानी या स्वरूपात द्यावी लागलेली किंमत. आपण काय किंमत देतो आणि काय मिळवतो याचा हिशोब सारखा करावा लागतो. दरवेळी तो करता येतो का? आणि केला तरी त्याप्रमाणे वागता येते का? आपला अनुभव आणि निरीक्षण काय आहे?

**चला लिहूया!**

मोबाइल फोन या तंत्रज्ञानासाठी कष्ट आणि हानी स्वरूपात द्यावी लागणारी किंमत आणि त्यापासून मिळणारे फायदे लिहा.

कुणी म्हणेल तंत्रज्ञानाला उत्तर तंत्रज्ञानाने! विजेवर चालणारे गीझर आल्याने लाकडे गोळा करून आणण्यातले कष्ट कमी होतात. पण वर स्पष्ट केल्याप्रमाणे खूप लोक वेगवेगळ्या प्रकारे श्रम करून तांत्रिक उपकरणे तयार करतात. त्यांचा वापर,

| अ.क्र. | सोपे तंत्रज्ञान | जटिल तंत्रज्ञान |
|---|---|---|
| १. | स्रोतावर केल्या जाणाऱ्या प्रक्रियांची संख्या कमी | स्रोतावर केल्या जाणाऱ्या प्रक्रियांची संख्या जास्त |
| २. | प्रक्रियांमधून निर्माण होणारे उपपदार्थ (by-products) कमी | प्रक्रियांमधून निर्माण होणारे उपपदार्थ (by-products) जास्त |
| ३. | कष्ट अथवा हानी स्वरूपात होणारा परिणाम थेट आणि तात्काळ असतो. | कष्ट अथवा हानी स्वरूपात होणारा परिणाम अप्रत्यक्ष आणि उशिराने होऊ शकतो. |
| ४. | तंत्रज्ञानासाठी लागणाऱ्या उपकरणाची निर्मिती, त्याचा वापर, देखभाल व दुरुस्तीसाठी फारसे मनुष्यबळ लागत नाही. | तंत्रज्ञानासाठी लागणाऱ्या उपकरणाची निर्मिती, त्याचा वापर, देखभाल व दुरुस्तीसाठी अनेक माणसांना एकत्र यावे लागते. यातून ताण आणि तडजोडी अनिवार्य होतात. |

देखभाल, दुरुस्ती आणि विल्हेवाट यांतच माणसांचा वेळ आणि श्रम खर्ची पडत राहतात. यातून कष्ट करणाऱ्यांचे वर्ग तयार होतात. कुणाला शारीरिक श्रम अधिक करावे लागतात तर कुणाला मानसिक. पण प्रत्येक जण या यंत्रांनी जोडलेल्या जगड्व्याळ यंत्रणेचा भाग होत राहतो.

आपण एक उदाहरण बघू. पूर्वी माणसं चुलीवर पाणी तापवत. अजूनही अनेक ठिकाणी चूल वापरली जाते. चुलीवर पाणी तापवण्यासाठी काय करावे

लागते? लाकडे गोळा करून आणावी लागतात, चूल पेटवावी लागते इत्यादी. यामध्ये काही कष्ट आहेत. लाकडे गोळा करण्याची जबाबदारी कोणाला तरी घ्यावी लागते. चुलीतून निर्माण झालेला धूर कुणाला तरी सोसावा लागतो. अशा प्रकारची हानीसुद्धा आहे. चुलीच्या प्रकाशात अनेकांची जेवणे होतात, अभ्यास होतो. म्हणजे चूल या तंत्रज्ञानाचा वेगवेगळ्या माणसांवर वेगवेगळा परिणाम होतो. त्यासाठी करावे लागणारे कष्ट आणि उत्पन्न होणारे धोके आपल्याला थेट अनुभवता येतात.

याउलट, विजेवर चालणारे गीझर किंवा हीटर कसे काम करतात पाहू. वीज कशी निर्माण होते? आजमितीस, आपली जास्तीत-जास्त वीजनिर्मिती कोळशावर आधारित आहे. कोळसा खाणीतून काढायचा. त्यावर प्रक्रिया करायची, तो जाळायचा, त्यावर पाणी तापवायचे. पाण्याची उच्च दाबावर वाफ बनवायची, या वाफेचा उपयोग जनित्र फिरवायला करायचा. जनित्र फिरले की वीजनिर्मिती होते. एवढा सगळा प्रवास आहे.

वीज साठवायला लागते, दूरवर पोचवायला लागते. यासाठी प्रचंड यंत्रणा लागते. अनेक लोकांना अत्यंत धोकादायक, अनारोग्यकारक स्थितीत काम करावे लागते. त्यातून उत्पन्न झालेली राख आणि धूर यांची विल्हेवाट कशी लावायची हा मोठा प्रश्न असतो. गीझर या उपकरणाची निर्मिती, देखभाल दुरुस्ती यासाठी अशीच लांबलचक प्रक्रिया आहे. अशा गुंतागुंतीच्या यंत्रणेत अनेक लोकांना एकत्र यावे लागते, मनाविरुद्ध काम करावे लागू शकते, अनेक ताण-तणावांना सामोरे जावे लागते. तंत्रज्ञानाच्या वापरातून निर्माण झालेल्या प्रश्नांची सोडवणूक करण्यासाठी अनेकदा पुढचे तंत्रज्ञान जन्माला येते. पण प्रत्येक तंत्रज्ञानाचे आपले असे प्रश्न असतातच. आपण हे पाहणे गरजेचे असते की, कोणते तंत्रज्ञान कमी प्रश्न निर्माण करते आणि कोणते जास्त?

**सोपे तंत्रज्ञान: निर्माण होणाऱ्या समस्या कमी**



चूल

**जटिल तंत्रज्ञान: निर्माण होणाऱ्या समस्या जास्त**



ऊर्जा निर्मिती प्रकल्प

**पर्यायी तंत्रज्ञान**




निर्धूर चूल

चुलीच्या उदाहरणात आपण बघतो की, अवघड कामे अनेकदा स्त्रियांना करावी लागतात. लांबवर

लाकडे आणायला जावे लागते, धूर सोसावा लागतो हे प्रश्न जर वापरणाऱ्या सगळ्यांचे प्रश्न बनले तर काय होईल? कोणत्या सुधारणा चूल तंत्रज्ञानात करता येतील? वीजनिर्मितीचे प्रश्न टाळायचे आहेत पण पाणी तर गरम करायचे आहे, अशा स्थितीत कोणते पर्याय वापरून बघता येतील? जगभरात अनेक ठिकाणी सोप्या, स्थानिक गरजा ओळखणाऱ्या तंत्रज्ञानावर काम सुरू आहे. तंत्रज्ञानाचा विचार केवळ उपकरणांपुरता मर्यादित नाही, तर ते वापरणारी माणसे, त्यांच्यावर होणारे परिणाम, त्यांच्यात निर्माण होणारे भेद हे सगळे विचार करून होणारी तंत्रज्ञानाची निर्मिती ही **शाश्वत विकासाची** वाट आहे.

**तंत्रज्ञानाचे माणसावर होणारे परिणाम**




**चला करू या!**

तंत्रज्ञानाच्या प्रगतीमुळे झालेल्या बदलांचे चित्र/तक्ता एखाद्या उदाहरणाच्या साहाय्याने तयार करा.

## विज्ञान, तंत्रज्ञान आणि अर्थशास्त्र

तुम्ही म्हणाल, कष्ट आणि हानीच्या बदल्यात माणसांना काही मिळतेसुद्धा. पैसे मिळतात. पैसे तर सगळ्यांत महत्त्वाचे. माणसाला लागणाऱ्या गोष्टींपैकी हवा सोडून सगळ्याच गोष्टींना आता पैसे मोजावे लागतात. आपण पैसे कशाचे देतो? वस्तू आणि सेवा यांचे आपण पैसे देतो. वस्तू म्हणजे द्रव्य आणि सेवा म्हणजे उर्जा. वस्तू द्रव्यावर प्रक्रिया करून बनतात आणि या प्रक्रिया करणारी आणि सेवा पुरवणारी माणसे किंवा प्राणी असतात. ती अन्न खाऊन मिळालेल्या ऊर्जेवर काम करतात. त्यांचे काम करणारी यंत्रे निर्माण झाली की प्रश्न सुटेल असे वाटू शकते. पण ही यंत्रे बनवणे, वापरणे, त्यांची देखभाल करणे आणि ती निरुपयोगी झाल्यावर त्यांची विल्हेवाट लावणे यासाठीही माणसेच लागतात. अर्थशास्त्र ज्या दोन मूलभूत गोष्टींवर आधारलेले आहे त्या वस्तू आणि सेवा या दोन गोष्टींवर भौतिक जगाच्या नियमांचे नियंत्रण असते. या नियमांचे ज्ञान आपल्याला विज्ञानातून मिळते. भौतिक विज्ञान आणि अर्थशास्त्र यांचे नाते असे आहे.

तंत्रज्ञानाने माणसाचे प्रश्न सोपेही केले आणि प्रश्न उभेही केले. आज स्थिती अशी आहे की तंत्रज्ञानाखेरीजचे जगणे कसे असेल याची आपल्याला कल्पनाही करता येत नाही. वरील विवेचनाचा अर्थ असा अजिबात नाही की तंत्रज्ञान वाईट आहे किंवा चुकीचे आहे. माणसाच्या इतिहासाकडे पाहिले तर असे दिसून येते की काही प्रकारचे तंत्रज्ञान त्याच्या इतके अंगवळणी पडले आहे की त्याशिवाय जगणे त्याला शक्य नाही. उदा., शिजवलेले अन्न, कपडे, घर या सगळ्या मूलभूत बाबी आहेत आणि त्यांच्याशिवाय राहणे आता शक्य नाही किंवा फार थोड्यांना शक्य आहे. याचा अर्थ असा की या तंत्रज्ञानासाठी जे आवश्यक कष्ट आहेत ते करावेच लागणार.

**चला बोलूया!**

तंत्रज्ञानाच्या प्रगतीमुळे झालेल्या बदलांचे चित्र/तक्ता एखाद्या उदाहरणाच्या सहाय्याने तयार करा. (कशा प्रकारचे अन्न, कशा प्रकारचे कपडे आणि कशा प्रकारचे घर याच्याही अनेक शक्यता आहेत. आपण त्यात निवड करतो का, करू शकतो का, की आजूबाजूचे जे करतात तेच किंवा तेवढेच आपण करतो? निवड कोणत्या निकषांवर करायची? गटांत चर्चा करा)

या खेरीजही अनेक प्रकारच्या तंत्रज्ञानाने आपले जीवन वेढले आहे. ज्यातले बरेचसे तंत्रज्ञान अजून

आपल्या अंगवळणी पडलेले नाही. उदाहरणार्थ, गाडी चालवत असताना मेंदूला एका वेळी दोन गोष्टी करता येत नाहीत. त्यामुळे गाडी चालवताना फोनवर बोलणे, मेसेज करणे, वाचणे आणि तत्सम गोष्टी अपघातांना निमंत्रण देणाऱ्या ठरू शकतात. आपल्या बाबतीत असे काही घडणार नाही हा फक्त समज असतो. आपल्याला तंत्रज्ञान आणि आपला जीवशास्त्रीय वारसा माहीत हवा. आपण सहसा फक्त तंत्रज्ञानाच्या सोयीच्या बाजू बघतो. साकल्याने विचार करायला आपण शिकलेले नसतो.

### ६.४ पर्यावरणीय तत्त्वज्ञान आणि शाश्वत विकास या संकल्पनेची ओळख

आपण पाहिले की माणसाने तंत्रज्ञान वापरायला सुरुवात काही काल-आज नाही केली. तो हजारो पिढ्यांचा इतिहास आहे. परंतु सुरुवातीच्या काळात शरीर-बाह्य ऊर्जेचा म्हणजे काडीकचरा, कोळसा, तेल जाळून जी उर्जा मिळते तिचा वापर अगदी नगण्य होता. धातुयुगाचा प्रारंभ साधारण चार हजार वर्षांपूर्वी झाला आणि तेव्हापासून आजूबाजूच्या निसर्गात फार मोठ्या प्रमाणात आणि जलदगतीने बदल होऊ लागले. अठराव्या शतकाच्या अखेरीस वाफेच्या शक्तीचा यांत्रिक उर्जेसाठी कसा उपयोग करून घेता येईल याचा शोध लागला आणि बदलाचा वेग कमालीचा वाढला. त्या पाठोपाठ विद्युतऊर्जेवर आधारित तंत्रज्ञान जन्माला आले आणि त्याने संपूर्ण तंत्रज्ञान बदलून टाकले. आता विद्युतऊर्जा नसेल तर आपण जगू शकणार नाही अशी भीती माणसांना वाटते.

या संपूर्ण प्रक्रियेत पृथ्वीवरील सजीवसृष्टीचे नाजूक जाळे फार मोठ्या प्रमाणात तुटले. परिसंस्था डबघाईला आल्या. आजूबाजूची हवा, पाणी, माती खराब होऊ लागली. माणसांची स्थिती यामुळे अधिकच बिकट झाली, परंतु या सर्व गोष्टींचा अंदाज आधी आला नाही. खूप मोठ्या प्रमाणावर बदल होऊन गेल्यानंतरच हे लक्षात आले. आता चक्रे उलटी कशी फिरवायची? असा प्रश्न भेडसावतो. जटील तंत्रज्ञानाचा इतर सजीवसृष्टीवर काय परिणाम होतो याचा विचार किंवा या तंत्रज्ञानाचा पुढील पिढ्यांवर काय परिणाम होणार आहे याची चर्चा पाश्चात्त्य जगतात सत्तरच्या दशकापासून अधिक प्रमाणात सुरू झाली.

**माहित आहे का तुम्हांला?**

सत्तरच्या दशकात अमेरिकेत उद्योगांचे जीवसृष्टीवर होणारे परिणाम या विचाराने जोर पकडला. याच्या अध्वर्यू होत्या राचेल कार्सन. त्यांनी लिहिलेल्या 'सायलेंट स्प्रिंग' या एकाच पुस्तकाने हा विषय सामान्यांपर्यंत पोचवला आणि एक मोठी चळवळ उभी राहिली. रासायनिक कीटकनाशकांचे विशेषतः DDT चे घातक परिणाम असा या पुस्तकाचा विषय होता. त्यातील वस्तुनिष्ठ निरीक्षणांमुळे या पुस्तकाची दखल उद्योगजगताला तसेच अमेरिकेतील तत्कालीन राजकीय नेत्यांनाही घेणे भाग पडले. DDT वर बंदी आणली गेली.

जग कसे आहे (सजीव-निर्जीव सृष्टीचे जाळे आहे), ते आपल्याला कसे कळते (साधने आणि प्रयोग यांच्या माध्यमातून) आणि त्याने आपली कृती कशी प्रभावित होते (DDT वर बंदी) याचे अलीकडच्या काळातील हे उत्तम उदाहरण आहे.



राचेल कार्सन

**चला बोलू या!**

परिस्थिती पूर्ववत तर नाही होऊ शकणार, पण मग शाश्वत विकासाच्या दृष्टीने कोणते प्रयत्न करता येतील? व्यक्तिगत पातळीवर कोणते आणि सामूहिक पातळीवर कोणते? याची चर्चा करा.

## ६.५ विज्ञान, तंत्रज्ञानासंबंधी तत्त्वज्ञानाची बदलती भूमिका

तत्त्वज्ञान विषयात वस्तुनिष्ठ जगातील प्रत्यक्ष हस्तक्षेप अभिप्रेत नसतो. कारण तसे केले तर तत्त्वज्ञान हे तत्त्वज्ञान न राहता विज्ञान होईल. तंत्रज्ञानाचा मानवकेंद्री विचार, म्हणजे माणसाच्या दृष्टीने काय हितावह आहे, काय नाही आणि ते कसे ठरवायचे हा विचार तत्त्वज्ञानाच्या कक्षेत येतो. विज्ञान जी साधने प्रयोगासाठी वापरते त्यांचा पुरेसेपणा आणि त्यांचा भलेबुरेपणा याची चर्चा तत्त्वज्ञानाच्या प्रांतात होते. उदाहरणार्थ, प्राण्यांवर केले जाणारे प्रयोग नैतिकदृष्ट्या योग्य की अयोग्य हा मूल्यविचार झाला. हा नैतिक तत्त्वज्ञानाच्या प्रांतातील विषय आहे. या तऱ्हेने विज्ञान आणि तत्त्वज्ञान या दोन्हींतील संबंध आपल्याला समजावून घेता येतो.

तत्त्वज्ञानाची जिज्ञासा; काय आहे, ते कळते कसे या प्रश्नांपुरती मर्यादित नाही हे आपण पाहिलेच आहे. जे आहे, त्याला काही अर्थ आहे का? त्याच्या असण्यामागे काही हेतू आहे का, असू शकतो का? त्याला काही मूल्य आहे का? असेल तर कुठल्या प्रकारचे? ते निश्चित कसे करायचे हे जाणून घेण्याची आसही तत्त्वज्ञाला असते. काय आहे याचा संपूर्ण उलगडा जरी विज्ञानाने केला, तरी काय असावे? या प्रश्नाचे उत्तर तत्त्वज्ञानाला शोधावे लागते.

इथे हे लक्षात ठेवणे आवश्यक आहे, की ज्ञानाच्या विकासाच्या ज्या टप्प्यावर आपण आज पोचलो आहोत, त्या टप्प्यावर कुठलेच ज्ञानक्षेत्र इतर ज्ञानक्षेत्रांच्या प्रभावापासून मुक्त राहू शकत नाही. सर्व ज्ञानशाखा/विद्याशाखा एकमेकींशी अपरिहार्यपणे जोडल्या गेल्या आहेत. त्यामुळे प्रत्येक विद्याशाखेला इतर शाखांमध्ये काय घडते आहे याची जाण असावी लागते. त्यासाठी त्यांच्याशी जोडून घ्यावे लागते. तत्त्वज्ञानाच्या बाबतीत या गोष्टीला अधिकच महत्त्व आहे. कारण सुरुवातीपासूनच जगाचा साकल्याने विचार करण्याचा प्रयत्न तत्त्वज्ञानाने जाणीवपूर्वक केला आहे. साहजिकच काळाला सुसंगत अशा प्रकारे तत्त्वचिंतन करताना विज्ञान आणि तंत्रज्ञानाशी जोडून घेणे तत्त्वज्ञानासाठी जरुरीचे आहे. त्यासाठीच या पाठात आपण विज्ञान आणि तंत्रज्ञान यांचे स्वरूप समजावून घेतले आहे. पुढच्या वर्षी परिसर विज्ञान, वैद्यकशास्त्र आणि सामाजिक विषमता या संदर्भातल्या प्रमुख प्रश्नांची चर्चा आपण तात्त्विक दृष्टिकोनातून करणार आहोत.

**शब्दसूची**

अनुभवातीत – Transcendental
अतींद्रिय – Extra-sensory
प्रजाती – Species
भौतिक पदार्थ/द्रव्य – Matter
वस्तुनिष्ठ – Objective
व्यक्तिनिष्ठ – Subjective
आंतरव्यक्तिनिष्ठ – Inter-subjective
निसर्गनियम – Laws of nature
आवर्तसारणी – Periodic table
हानी – Harm
जनित्र – Generator
वस्तू आणि सेवा – Goods & Services
प्रक्रिया – Process
वारसा – Inheritance
धातुयुग – Metal age

जटिल तंत्रज्ञान - Complicated techonology
शरीर-बाह्य उर्जा - Body-external energy
परिसंस्था - Ecosystem
मानवकेंद्री - Humancentric/ Anthropocentric

## स्वाध्याय

**प्र.१ कंसांतील योग्य पर्याय निवडून पुढील विधाने पूर्ण करा.**

(अ) पंचेंद्रिये आणि साधने वापरून जे सगळ्यांना पडताळून बघतो येते त्याला ............ जग असे म्हणता येते.
(वस्तुनिष्ठ, व्यक्तिनिष्ठ, काल्पनिक)

(ब) जे सर्वत्र, सर्व काळात लागू होतात त्यांना ............ नियम म्हणतात.
(मानवी, सार्वत्रिक निसर्गनियम, उत्क्रांती)

(क) ............ म्हणजे द्रव्यावर केली जाणारी प्रक्रिया होय.
(तत्वज्ञान, विज्ञान, तंत्रज्ञान)

(ड) ............ जगाचे सांगोपांग ज्ञान देणारे अभ्यासक्षेत्र म्हणजे विज्ञान.
(काल्पनिक, सैद्धांतिक, भौतिक)

**प्र.२ फरक स्पष्ट करा.**

(अ) सोपे व जटील तंत्रज्ञान
(ब) विज्ञान व तत्वज्ञानाचे कार्य
(क) वस्तुनिष्ठ व व्यक्तिनिष्ठ वास्तव

**प्र.३ टीपा लिहा/खालील विषयांवर तुमचे मत सांगा.**

(अ) तंत्रज्ञानाने उभे केलेले प्रश्न
(ब) स्वास्थ्यपूर्ण जीवन जगण्यासाठी विज्ञानाचे महत्त्व
(क) आंतरव्यक्तिनिष्ठ वास्तव : खरे वा काल्पनिक

**प्र.४ विज्ञान आणि तंत्रज्ञानाचा मानवी जीवनावरील प्रभाव याची सविस्तर चर्चा करा.**

**प्र.५ खालील विषयावर संवाद लेखन करा.**

(अ) पर्यावरणपूरक सण साजरे करण्यासाठी मित्र-मैत्रीणींसोबत केलेली चर्चा/संवाद.
(ब) दूरध्वनीच्या/दूरचित्रवाणीच्या वापराचे फायदे आणि तोटे.

### उपक्रम

दैनंदिन जीवनात एखाद्या तंत्रज्ञानाचा/आविष्काराचा त्याग करूनही कोणत्याही अडचणींशिवाय जीवन व्यतीत करणाऱ्या व्यक्तींच्या सत्यकथा शोधा.

***

## विचार खाद्य



इतर अध्ययन विषयांप्रमाणेच तत्त्वज्ञानाचे मूळ उद्दिष्ट ज्ञान मिळवणे असे असते. हे कोणत्या प्रकारचे ज्ञान असते? ते ज्ञान, जे इतर विज्ञान विषयात एकसंधता आणि व्यवस्था निर्माण करते. ते ज्ञान, जे आपल्या समजुती, धारणा, विश्वास यांच्या कठोर परीक्षणातून निर्माण झालेले असते. असे असले तरी तत्त्वज्ञानात ज्या प्रश्नांचा ऊहापोह केला जातो त्या प्रश्नांना तत्त्वज्ञान काही ठोस उत्तर देऊ शकले असे मात्र म्हणता येणार नाही. तुम्ही जर एखाद्या गणितज्ञाला विचारले किंवा एखाद्या खनिज शास्त्रज्ञाला, एखाद्या इतिहास तज्ञाला किंवा अन्य कोणत्याही विषयाच्या तज्ञाला विचारलं की तुमच्या विषयात आता नेमके कोणते तथ्य हाती आले आहे तर तुमची ऐकण्याची तयारी असेल तोवर तो तज्ञ तुम्हाला त्याच्या विषयाबद्दल सांगत राहू शकतो. हाच प्रश्न जर तुम्ही एखाद्या तत्त्वज्ञाला विचाराल आणि जर तो प्रामाणिक असेल, तर तो हे मान्य करेल की इतर विद्याशाखांना जशी आपल्या प्रश्नांची उत्तरे गवसलेली आहेत तसे काही तत्त्वज्ञानाचे झालेले नाही. हे असे का? या प्रश्नांचे अर्धे उत्तर असे आहे की एखाद्या विषयातील वस्तुनिष्ठ तत्त्वे ज्या क्षणी गवसतात त्याक्षणी तो विषय तत्त्वज्ञानाच्या प्रांतातील उरत नाही. त्याचे एक वेगळे विज्ञान बनते. अंतरिक्षाचा अभ्यास एकेकाळी तत्त्वज्ञानाचा प्रांत होता. आता तो खगोल विज्ञानाचा विषय आहे. न्यूटनच्या महान ग्रंथाचं नाव 'द मॅथेमॅटिकल प्रिन्सिपल्स ऑफ नॅचरल फिलॉसॉफी' असे होते. मानवी मनाचा अभ्यास एकेकाळी तत्त्वज्ञानाच्या अंतर्गत केला जात असे, तो आता मानसशास्त्राच्या अंतर्गत केला जातो. त्यामुळेच, तत्त्वज्ञानातील संदिग्धता ही फसवी असते. ज्या प्रश्नांची निःसंदिग्ध उत्तरे मिळतात ते वेगळे विज्ञानविषय होतात. ज्या प्रश्नांची सद्यस्वरूपात निश्चित उत्तरे मिळत नाहीत त्या गाळीव प्रश्नांतून तत्त्वज्ञानाचा अभ्यासविषय तयार होतो.

**संदर्भः रसेल बर्ट्रांडः प्रॉब्लेम्स् ऑफ फिलॉसॉफी, प्रकरण १५ 'Value of Philosophy' मूळ प्रकाशन वर्ष १९१२**

## विचार करणं



मला विचार करायला आवडतं

पण ज्या कल्पना आधीच सिद्ध आहेत

त्यांच्याशी विनाकारण खेळ करायला

किंवा त्यांची मोडतोड करायला नाही आवडत

असं करून आपण काही खूप मोठं करतोय असं मुळीच नाही.

विचार करणं म्हणजे काय?

अज्ञाताला जाणिवेच्या प्रदेशात वर येऊ देणं

विवेकाच्या दगडावर विधानं तासून घेणं

जीवनाशी डोळा भिडवणं

आणि शक्य आहे ते सर्व जाणून घेणं म्हणजे विचार.....

आपल्या अनुभवाला तपासणं आणि निष्कर्षाप्रत येणं म्हणजे विचार.....

विचार करणं म्हणजे चलाखी नाही, बौद्धिक कसरत नाही

पळवाटा काढणंही नाही.

समग्र जाणिवेच्या पातळीवर माणसानं संपूर्णपणे असणं म्हणजे विचार.....

**– डी.एच.लॉरेन्स**

## करून बघू!

१) एखादया व्यक्तिबद्दल आपल्याला असे वाटत असते की ती अतिशय चांगली व्यक्ती आहे. कुठल्या कारणाने अथवा त्या व्यक्तीच्या कोणत्या गुणांमुळे आपल्याला असे वाटत असते?

२) जरा सगळे विचार करू या. तुम्ही कशाचा विचार करता आहात?

तुम्ही ज्याविषयी विचार करता आहात त्याविषयी तुम्ही विचार करू शकता का?

आपल्याला कुतुहल वाटते आहे का बघू. कशाविषयी कुतुहल वाटते आहे तुम्हाला?

आपल्याला जे कुतुहल वाटते आहे त्याबद्दल तुम्हाला कुतुहल वाटू शकते का?

३) जे खरेच 'आहे' अशा कशाचा तरी विचार करू.

ते खरे नाही असे होऊ शकते का?

जे मुळीच खरे नाही अशा कशाचा तरी विचार करू

ते खरे आहे असे होऊ शकते का?

४) विचारूया

-कसे


-का

-कधी

-कोण


-जर






सुख आणि स्वातंत्र्य यांचा आरंभ एका तत्त्वाच्या स्पष्ट आकलनामधून होतो. काही गोष्टींवर आपले नियंत्रण असते आणि काहींवर नसते.

– एपिक्टेटस



जीवनातील सर्वांत कठीण गोष्ट म्हणजे स्वत:ला जाणणे.

– थेलिस



ज्या व्यक्तीने कधीच चूक केलेली नाही, त्या व्यक्तीने काहीच नवीन करून बघण्याचा प्रयत्न केलेला नाही.

– अल्बर्ट आइनस्टाईन



आपल्या अज्ञानाची व्याप्ती कळणे म्हणजे खरे ज्ञान.

– कन्फ्यूशियस

# इयत्ता ९ ली ते १२ वी ई-लर्निंग साहित्य

## मराठी, इंग्रजी माध्यमांमध्ये उपलब्ध

ebalbharati

वैशिष्ट्ये

- विषय योजनेनुसार निर्धारित करण्यात आलेल्या विषयांचा समावेश.
- पाठ्यपुस्तकावर आधारित परिपूर्ण ई-लर्निंग साहित्य.
- दृक-श्राव्य स्वरूपात.
- पाठनिहाय आशयाचे सादरीकरण व आवश्यकतेनुसार प्रश्नांचा समावेश.
- विविध कृती, चित्रे, आकृत्या इत्यादींचा समावेश.
- सहज व सोप्या अध्ययनासाठी ॲनिमेशनचा वापर.
- स्वाध्यायांचा समावेश.

पाठ्यपुस्तक मंडळ, बालभारती मार्फत इयत्ता ९ ली ते १२ वी च्या मराठी व इंग्रजी माध्यमाच्या विद्यार्थ्यांसाठी ई-लर्निंग साहित्य (Audio-Visual) उपलब्ध करून देण्यात येत आहे.

ई-लर्निंग साहित्य घेण्यासाठी....

- वरील Q.R.Code स्कॅन करून ई-लर्निंग साहित्य मागणीसाठी नोंदणी करा.
- Google play store वरून ebalbharati app डाऊनलोड करून ई लर्निंग साहित्यासाठी मागणी नोंदवा.
- पाठ्यपुस्तक मंडळाच्या www.ebalbharati.in, www.balbharati.in या संकेतस्थळांवर भेट द्या.




महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे

तत्त्वज्ञान इ. ११ वी (मराठी माध्यम)

₹ ८५.००